


सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सदाफुलीसह




सोलापूर | बुधवार, १९ मार्च २०२५ । युगाब्द ५१२६ । वर्ष ४१ वे अंक १३० । पाने १२+८ । किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


# नागपुरात तणावपूर्ण शांतता, ५० समाजकंटकांना अटक

**महानगर पालिकेने जमा केले दोन ट्रॉली दगड-विटा** | **महाल परिसरात कलम १४४ लागू, नागरिकांचे सहकार्य** | **जाळपोळ व दगडफेक पूर्वनियोजितच असल्याचे उघड** | **मंगळवारी सकाळी दिसली घटनाक्रमाची भीषणता** | **'मास्टरमाईंड' शोधण्यासाठी पोलिसांची मोहीम जारी**








◆ **नागपूर, १८ मार्च**

सोमवारी रात्री हिंदू समुदायाच्या घरांना, वाहनांना लक्ष्य करून झालेली जाळपोळ, दगडफेक आणि हिंसाचार झाल्यानंतर नागपुरात मंगळवारी तणावपूर्ण शांतता आहे. ज्या महाल परिसरात हा घटनाक्रम घडला, त्या भागात पोलिसांनी कलम १४४ लागू केल्याने परिस्थिती नियंत्रणात राहिली. ज्यांनी जाळपोळ आणि दगडफेक केली, अशा ५० पेक्षा जास्त समाजकंटकांना पोलिसांनी अटक केली असून, मंगळवारी दिवसभर त्यांची कसून चौकशी करण्यात आली. त्याचप्रमाणे, ठरवून करण्यात आलेल्या हिंसाचारामागचा 'मास्टरमाईंड' कोण, हे शोधून काढण्यासाठी पोलिस परिश्रम घेत आहेत.

सोमवारच्या घटनेनंतर शहरात शांतता आणि तणाव असला, तरी हिंदूंमध्ये प्रचंड संतापाची लाट होती. कारण नसताना घडवून आणलेल्या या हिंसाचारामुळे फक्त हिंदूंच्याच मालमत्तेचे नुकसान झाले असल्याने नागरिकांच्या संयमाचा बांध फुटल्याचे पाहायला मिळाले. शहरात हिंदू बांधवांमुळे तीव्र प्रतिक्रिया उमटल्या असून, समाजकंटकांना कठोर शासन करण्याची मागणी होत आहे.

घटनेची पुनरावृत्ती होऊ नये, या दृष्टीने महाल परिसरात मोठा पोलिस बंदोबस्त लावल्याचे पाहायला मिळाले. पोलिस आणि समाजधुरिणांनी परिसरात फिरून शांतता राखण्याचे आवाहन केले. नागपूर शहर पोलिसांच्या मदतीला ग्रामीण पोलिसांचीही कुमक पाठविण्यात आल्याने मंगळवारी परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणात राहिली.

सोमवारच्या रात्री झालेली जाळपोळ आणि दगडफेक किती भयानक होती, याचे प्रत्यंतर मंगळवारी सकाळी घटनास्थळाला भेट दिली असता आले. जागोजागी दगड-विटांचा खच पडला होता, जळालेली दुचाकी वाहने, काचा फुटलेल्या आणि चेपलेल्या कार हा हिंसाचार कसा पूर्वनियोजित होता, हे दाखवून देत होत्या.

महानगर पालिका प्रशासनाने मंगळवारी सकाळपासूनच समाजकंटकांनी फेकलेले दगड आणि विटा उचलण्यास प्रारंभ केला. पाहता-पाहता दोन ट्रॉली दगड गोळा झाले. समाजकंटकांनी नियोजन करून दगडफेक आणि जाळपोळ केली, हे यावरून स्पष्ट होते.

शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी ११ पोलिस ठाण्यांच्या हद्दीत संचारबंदी लागू करण्यात आली असून, आदेशाचा भंग करणारे भारतीय न्याय संहिता २०२३ कलम २२३ अन्वये शिक्षेस पात्र राहतील, असे पोलिसांकडून सांगण्यात आले आहे. ◀(तभा वृत्तसेवा)

### " अफवांवर विश्वास ठेवू नका



शहरात शांतता कायम ठेवा. अफवांवर विश्वास ठेवू नका. अफवा पसरविताना कोणी आढळल्यास पोलिसांना माहिती द्या, त्याच्यावर कारवाई केली जाईल. याशिवाय कमांड कंट्रोल सेंटर, समाजमाध्यमे, व्हिडीओ यावरून ओळख पटवून कारवाई केली जात आहे. आतापर्यंत पन्नासपेक्षा अधिक लोकांना अटक केली आहे तसेच पाच लोकांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. शहरातील परिस्थिती नियंत्रणात आहे.

**डॉ. रवींद्रकुमार सिंगल,** पोलिस आयुक्त

---

### महत्त्वाचे

## मतदार कार्डलाही मिळणार 'आधार'

**नवी दिल्ली :** येत्या काही महिन्यांत मतदार कार्डाची आधारसोबत जोडणीसाठी वेगात मोहीम घेतली जाईल. निवडणूक आयोगाने मतदार कार्ड आधारसोबत जोडण्यासाठी घटनेतील तरतुदीनुसार आणि सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार हा निर्णय घेतला आहे. निवडणूक आयोग आणि गृह मंत्रालयाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. मतदार व आधार कार्डच्या जोडणीसाठी यूआयडीएआय आणि निवडणूक आयोगातील तज्ज्ञांमध्ये तांत्रिक मुद्यावर लवकरच सल्लामसलत सुरू होणार आहे. निवडणूक आयोगाचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांच्या नेतृत्वात निवडणूक आयुक्त डॉ. सुखबीरसिंग संधू व डॉ. विवेक जोशी यांच्यासोबत आयोगाच्या मुख्यालयात केंद्रीय गृह सचिव, विधि मंत्रालयाचे सचिव, इलेक्ट्रॉनिक आणि माहिती व तंत्रज्ञान मंत्रालयाचे सचिव, यूआयडीएआयचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि निवडणूक आयोगाच्या तंत्रज्ञान तज्ज्ञांसोबत महत्त्वपूर्ण बैठक घेण्यात आली.



## जात-धर्म न पाहता दंगेखोरांवर कारवाई करू

**पोलिसांवरील हल्ले खपवून घेणार नाही** | **मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा इशारा**

◆ **मुंबई, १८ मार्च**

कोणीही दंगा करण्याचा पयत्न केला तर, त्यांची जात, धर्म न पाहाता कठोर कारवाई केली जाईल आणि पोलिसांवरील हल्ला तर कदापि सहन केला जाणार नाही. हल्लेखोरांना कुणालाही सोडले जाणार नाही, असा कडक इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला.

नागपूरमध्ये सोमवारी रात्री घडलेल्या हिंसाचाराच्या घटनेचे पडसात विधिमंडळात उमटले. नागपुरात झालेल्या दगडफेक, जाळपोळीच्या घटनेबाबत मुख्यमंत्री फडणवीस यांनी विधानसभेत निवेदन दिले. नागपुरात नेमके काय घडले, यासाठी जबाबदार कोण, पोलिसांनी याबाबत काय कारवाई केली, याची सविस्तर माहिती मुख्यमंत्र्यांनी विधानसभेत दिली.



नागपुरातील महाल परिसरात सकाळी साडेअकरा वाजता बजरंग दल आणि विश्व हिंदू परिषदेच्या कार्यकर्त्यांनी औरंगजेबाची कबर हटवण्यासंदर्भात आंदोलन केले. 'औरंगजेबाची कबर हटाव' असे नारे त्यांनी दिले. यावेळी आंदोलकांनी गवताची पेंढी असलेली प्रतिकात्मक कबर जाळली. त्यानंतर गणेशपेठ पोलिसांनी बजरंग दल आणि विश्व हिंदू परिषदेच्या कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल केले. सकाळची घटना घडल्यानंतर मधल्या वेळेत शांतता होती. मात्र सायंकाळी काही लोकांनी जाणीवपूर्वक हल्ला केल्याचे लक्षात येत आहे. ट्रॉली भरून दगड तिथे आढळले, शस्त्रे आढळली, काही ठराविक घरांना लक्ष्य केले गेले. निश्चित यात सुनियोजित कट दिसत आहे. नमाज आटोपून निघालेला एक जमाव एकत्र झाला. जमावाने तेथे जोरदार नारेबाजी केली. यावेळी परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांना बळाचा वापर करावा लागला. याआधी बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांविरुद्ध त्यांची तक्रार दाखल करून घेण्यात आली. मात्र, एकीकडे पोलिसात तक्रार दाखल करीत असाताना दुसरीकडे हंसापुरी भागात जमाव जमू लागला. हातात काठ्या घेत दगडफेक करण्यात आली. या घटनेत १२ दुचाकीचे नुकसान झाले, तर काही लोक जखमी झाले, अशी माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी सभागृहात दिली. ◀(तभा वृत्तसेवा)

## शांततेची संस्कृती जपण्यासाठी सहकार्य करा

◆ **नागपूर, १८ मार्च**

आपल्या महानगराची संस्कृती व येथील सर्व धर्मीयांमधील सौहार्दता आजवर शांततेला जपत आली आहे. आपली परंपरा शांतता व सहिष्णूतेची आहे. या समृद्ध वारशाला गालबोट लागू नये यासाठी सर्व जनतेने काळजी घेतली पाहिजे. सर्व समाजबांधवांनी सौहार्दता व शांततेच्या संस्कृतीला जपण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन महसूल मंत्री व नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.



चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज सकाळी नागपूर येथे पोलिस आयुक्त कार्यालयात वरिष्ठ अधिकाऱ्यांची भेट घेऊन परिस्थितीचा आढावा घेतला. या घटनेला जबाबदार समाजकंटकांना पोलिस लवकरच शोधून काढतील. समाजमाध्यमांवर ज्यांनी वातावरण बिघडविण्याचे काम केले आहे, अशांना शोधून काढण्यासाठी पोलिस अधिक तपास करतील. सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासले जातील, असे त्यांनी सांगितले.

कोणत्याही स्थितीत नागपूरच्या शांततेला गालबोट लागणार नाही यादृष्टीने सर्वांनी दक्षता घेतली पाहिजे. या घटनेत ज्यांचे नुकसान झाले, त्याचे तत्काळ पंचनामे सुरू झाले असल्याचे बावनकुळे म्हणाले. ◀(तभा वृत्तसेवा)

## एक बाहेर केला, दुसरा बाहेर फिरणार नाही

**उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा काँग्रेसला इशारा** | **महापुरुषांचा अवमान करण्याच्या घटनांमध्ये वाढ**

◆ **मुंबई, १८ मार्च**

मुख्यमंत्र्यांची तुलना औरंग्यासोबत करणे म्हणजे एकप्रकारे देशद्रोहच आहे. त्यामुळे तत्काळ माफी मागायला सांगा; अन्यथा एक इथला बाहेर केला, दुसरा जो बाहेर आहे, तो फिरणारही नाही, असा सज्जड दम उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काँग्रेसला दिला.

सदस्य अर्जुन खोतकर यांनी माहितीच्या मुद्द्याद्वारे जालना शहरात छत्रपती संभाजी महाराजांच्या पुतळ्याची विटंबना केल्याची माहिती देत कारवाईची मागणी केली. यावर शिंदे म्हणाले, अलिकडे महापुरुषांचा अवमान करण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. त्याचवेळी औरंगजेबाचे उदात्तीकरण सुरू झाले आहे. आमदार अबू आझमी यांनी औरंगजेब उत्तम प्रशासक होता, असे वक्तव्य केले होते. या वक्तव्यानंतर आझमींना सभागृहाबाहेर केले. आता



मुख्यमंत्र्यांची तुलना औरंग्यासोबत करणाऱ्या काँग्रेस प्रदेशाध्यक्षाने केलेला प्रकार गंभीर आहे. त्याने माफी मागितली मागायलाच हवी; अन्यथा एक बाहेर आहे, पण या दुसऱ्याला बाहेर फिरू देणार नाही, असा इशारा दिला.

**पेट्रोल बॉम्ब कुठून आले?**

मोमीनपुरा, महाल भागात जमावाने काही घरांना लक्ष्य केले. जाळपोळही केली. मोठ्या प्रमाणावर मालमत्तेचे नुकसान केले. काही लोकं सुदैवाने वाचली. ज्यावेळी हिंसाचार होत होता, त्यावेळी तिथे पोलिस आले. त्यांच्यावर ही दगडफेक झाली. चार डीसीपी या हल्ल्यात गंभीर जखमी झाले. काही लोकांनी पोलिसांवर कुऱ्हाडीने वार केले. या हल्ल्यात पेट्रोल बॉम्ब टाकले गेले. हे पेट्रोल बॉम्ब आले कुठून? असा सवाल शिंदे यांनी केला.

**पूर्वनियोजित कट**

मोमीनपूरात मोठ्या प्रमाणात गाड्या पार्क केल्या जातात, पण दंगलीच्या वेळी एकही गाडी तिथे पार्क नव्हती. त्यानंतर नियोजन पद्धतीने दगडफेक केली गेली. या हल्ल्यात लहान मुलांकडेही पाहिले नाही. यात पाच वर्षांची मुलगी सुदैवाने बचावली. तेथील हॉस्पिटलही लक्ष्य केले गेले. हॉस्पिटलमध्ये असलेल्या देवी-देवतांची विडंबना केली गेली. या प्रकराची घटना समाजकंटकांनी केली. हा सगळा प्रकार अचानक घडलेला नसून, हा पूर्व नियोजित कट होता, असेही शिंदे म्हणाले. ◀(तभा वृत्तसेवा)

---

## दंगे भडकविणाऱ्यांवर एनएसए अंतर्गत कारवाई करा

**। विश्व हिंदू परिषदेची मागणी । कलमा जाळल्या हा केवळ दुष्प्रचार**

◆ **नागपूर, १८ मार्च**

औरंगजेबाची कबर हटविण्यासाठी सोमवारी महाल परिसरात झालेल्या आंदोलनानंतर दोन गटांत संघर्ष झाला. अफवा पसरवून मोठ्या प्रमाणात जाळपोळ व दगडफेक करण्यात आली. हा हिंसाचार करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी तसेच दंगे भडकविणाऱ्यांवर राष्ट्रीय सुरक्षा कायद्यांतर्गत कारवाई करण्याची मागणी विश्व हिंदू परिषदेचे विदर्भ प्रांत सहमंत्री देवेश मिश्रा यांनी केली.




पत्रपरिषदेत माहिती देताना देवेश मिश्रा. यावेळी उपस्थित राजकुमार मिश्रा, नवीन जैन, अमोल ठाकरे, निरंजन रिसालदार.

यासंदर्भात विश्व हिंदू परिषदेच्या वतीने पोलिस आयुक्तांना निवेदन सादर करून पत्रपरिषदेत ही माहिती देण्यात आली. मिश्रा म्हणाले, हा संपूर्ण प्रकार पूर्वनियोजित आहे. कलमा जाळल्याच्या मुद्यावर ते म्हणाले, विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी केवळऔरंगजेबाच्या प्रतिकात्मक कबरीचे दहन केले. कुठल्याही कलमा आम्ही जाळल्या नाही. पण, याप्रकारचा दुष्प्रचार करून या हिंसक कारवाया करण्यात आल्या. शिवाजी महाराज आणि संभाजी महाराजांच्या महाराष्ट्रात अशा प्रकारचा हिंसाचार निंदनीय असून, हा प्रकार करणाऱ्यांवर एनएसए अंतर्गत कठोर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली. तसेच औरंगजेबप्रेमी समुदाय मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरत असताना पोलिस प्रशासनाने त्वरित बंदोबस्त व कारवाई न केल्याने नाराजीही व्यक्त केली.

माध्यमांशी बोलताना विहिंपचे नागपूर महानगर मंत्री अमोल ठाकरे म्हणाले, इतिहास जपायचा असेल, तर आम्ही तो शिवरायांचा जपू. अन्याय व गुलामगिरीची आठवण करून देणाऱ्या औरंगजेबाची कबर आम्ही एक दिवस अरबी समुद्रात फेकणारच. पत्रपरिषदेला विहिंपचे राजकुमार शर्मा, हेमंत तांबेकर, नंदकिशोर दंडारे, बजरंग दलाचे नवीन जैन, रिषभ अरकेल आदी उपस्थित होते. ◀(तभा वृत्तसेवा)

## जिल्हाधिकारी कार्यालयात शेतकऱ्याचा आत्महत्येचा प्रयत्न


### शेती नावावर केल्यानंतरही मुले सांभाळत नसल्याने उचलले टोकाचे पाऊल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ मार्च-**

येथील जिल्हाधिकारी कार्यालयात मंगळवारी ७० वर्षीय शेतकऱ्याने कीटकनाशक प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला. ही घटना मंगळवारी दुपारी १२:३० च्या सुमारास घडली. सोपान वासुदेव राऊत (वय ७० रा अरण ता माढा) असे आत्महत्येचा प्रयत्न केलेल्या व्यक्तीचे नाव आहे. शेती नावावर करून घेतल्यानंतर मुलांकडून सांभाळ होत नसल्याच्या नैराश्यातून सोपान राऊत यांनी हे टोकाचे पाऊल उचलल्याची चर्चा होती.

शेतकरी सोपान राऊत हे मंगळवारी जिल्हाधिकारी कार्यालयात दाखल झाले. तत्पूर्वी त्यांनी रखवालदाराकडे कार्यालयात येताना रजिस्टरला नोंद केली. तेथे त्यांनी जिल्हाधिकारी साहेबांना भेटण्याकरिता आलो असे सांगितले. त्यानंतर ते जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात थांबून राहिले. दरम्यानच्या काळात तेथे असणारी गर्दी व इतरांचे लक्ष नसल्याचे पाहून सोपान यांनी पिशवीत आणलेले कीटकनाशक प्राशन केले. यानंतर ते तेथून जवळच पाणी पिण्यासाठी गेले. त्यावेळी जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयाबाहेरील रखवालदाराच्या लक्षात ही बाब आली. त्यांनी तातडीने नायब तहसीलदार बालाजी बनसोडे यांना याबाबत माहिती दिली. नायब तहसिलदार बनसोडे यांनी तात्काळ त्यांना उपचाराकरिता शासकीय रुग्णालयात





दाखल केले. दरम्यान सोपान राऊत हे शुद्धीवर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

माढा तालुक्यातील अरणगाव येथील सोपान राऊत यांनी त्यांच्या मुलांच्या नावे शेती केली. दरम्यान यापूर्वी मुलांकडून त्यांचा सांभाळ केला जात होता. परंतु शेती मुलांच्या नावावर झाल्यापासून मुले वडील सोपान राऊत यांच्याकडे दुर्लक्ष करू लागले. ही बाब सोपान राऊत यांच्या लक्षात आली. परंतु मुले आहेत आज ना उद्या सुधारतील माझा सांभाळ करतील, अशी त्यांची भाबडी आशा होती. परंतु अनेक महिने झाल्यानंतरही मुलांकडून सोपान राऊत यांचा आभाळ होत नसल्याने त्यांनी कुर्डूवाडी प्रांत कार्यालयात मुलांच्या नावे केलेली शेती परत स्वतःच्या नावे व्हावी याकरिता तक्रार केली होती. या तक्रारीबाबत कुडूवाडी प्रांत कार्यालयात सुनावणी झाली असल्याचे समजते.

परंतु तेथील प्रांतांची बदली झाल्याने सोपान राऊत यांचे प्रकरण निकालासाठी प्रलंबित राहिले. यानंतर सोपान राऊत यांनी पत्र देऊन जिल्हा प्रशासनाला सूचित केले होते. त्यानंतर ते मंगळवारी जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकाऱ्यांना भेटण्यासाठी आले होते. परंतु भेट होण्यापूर्वीच त्यांनी कीटकनाशक प्राशन केल्याची चर्चा आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# एकतेचे अमृत हाच महाकुंभाचा प्रसाद : मोदी

**नवी दिल्ली, १८ मार्च**

अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या टप्प्याच्या पाचव्या दिवशी मंगळवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महाकुंभमेळ्यासंदर्भात संसदेत भाषण केले. ते म्हणाले की महाकुंभात अनेक अमृत निघाले आहेत.

एकतेचा अमृत हा त्याचा पवित्र प्रसाद आहे. पंतप्रधान म्हणाले की, आपल्या देशात अनेक लहान- मोठ्या नद्या आहेत; त्यापैकी काही संकटाचा सामना करत आहेत. कुंभमेळ्याने आपल्याला दाखवून दिले की नदी महोत्सवांचा विस्तार करण्याची गरज आहे. येणाऱ्या पिढीला पाण्याचे महत्त्व कळेल, स्वच्छतेवर भर दिला जाईल आणि नद्यांचे संरक्षण केले जाईल. आम्हाला खात्री आहे की महाकुंभातून निर्माण होणारे अमृत हे आमचे संकल्प साध्य करण्यासाठी एक मोठे माध्यम बनेल. महाकुंभावर प्रश्न उपस्थित करणाऱ्यांना त्यांची उत्तरे मिळाली आहेत. देशाच्या कानाकोपऱ्यात आध्यात्मिक चेतना उदयास आली आहे. महाकुंभात राष्ट्रीय जाणीव दिसून आली आणि महाकुंभाचा उत्साह आणि उत्साह जाणवला. देशाच्या सामूहिक जाणिवेचे परिणाम महाकुंभमेळ्यादरम्यान दिसून आले. तरुण पिढीनेही महाकुंभाशी पूर्ण भावनेने नाते जोडले. मॉरिशसच्या त्यांच्या भेटीचा संदर्भ देत पंतप्रधान मोदी म्हणाले की, त्रिवेणीचे पवित्र पाणी तेथील गंगा तलावात ओतण्यात आले.

विविधतेत एकता ही आपली सर्वात मोठी ताकद आहे. या विशेषतेला समृद्ध करत राहण्याची जबाबदारी आपली आहे. देश पुढील १००० वर्षांसाठी सज्ज मोदी म्हणाले- गेल्या वर्षी अयोध्येत राम मंदिराच्या अभिषेकात मी पाहिले की देश पुढील १००० वर्षांसाठी कसा तयार होत आहे. एका वर्षानंतर महाकुंभाच्या आयोजनाने हे दाखवून दिले आहे.

# पोटखराब क्षेत्र लागवडीलायकमध्ये रुपांतरीत करण्यास शासन मान्यता

## ● जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद; जिल्ह्यातील शेतकरी बांधवांतून समाधानाचे वातावरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ मार्च-**

शेतकऱ्यांनी पोट खराब क्षेत्र (वर्ग अ) लागवडीखाली आणले असल्यास लागवडीलायक मध्ये रुपांतरीत करण्यास शासनाने मान्यता दिली असल्याने शेतकरी बांधवांना एक प्रकारे दिलासा मिळाल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली.



राज्यातील अधिकार अभिलेखामधील वर्ग अ पोटखराब क्षेत्र ब-याच शेतक-यांनी सुधारणा करुन लागवडीयोग्य आणलेले आहे. याबाबत पोटखराब क्षेत्र लागवडीखाली वर्ग करुन मिळणेबाबत जिल्हाधिकारी व जमाबंदी आयुक्त कार्यालयाकडे अर्ज प्राप्त होत असतात. त्याबाबत शासनाकडे सादर केलेल्या प्रस्तावाप्रमाणे शासनाने नियमामध्ये बदल करून पोट खराब क्षेत्र लागवडीलायक मध्ये रुपांतरीत करण्यास मान्यता दिली आहे. सद्यस्थितीत पोटखराब म्हणून नोंद असलेले क्षेत्र धारकास लागवडीखाली आणता येते. परंतु त्यावर महसूलाची आकारणी करता येत नाही. तथापि राज्यामध्ये मोठ्या प्रमाणावर शेतजमिनीमधील पोटखराब क्षेत्र मोठ्या कष्टाने शेतक-यांनी लागवडीखाली आणले असते. लागवडीखाली आणलेले पोटखराब वर्ग अ क्षेत्र लागवडी योग्य क्षेत्रामध्ये समाविष्ठ करुन त्यास आकारणी बसविल्यास शासनाच्या महसूलामध्ये वाढ होऊन अधिकार अभिलेख अद्ययावत होतील व शेतक-यांचे प्रश्न सुटतील त्यानुसार महाराष्ट्र जमीन महसूल (जमिनीच्या वापरावर निर्बंध)नियम १९६८ मधील नियम २ (२) मध्ये सुधारणा करण्यासाठी जमाबंदी आयुक्त कार्यालयाकडून शासनाकडे प्रस्ताव सादर केला होता. त्या अनुषंगाने महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील कलम ४३ खालील महाराष्ट्र जमीन महसूल (जमिनीच्या वापरावर निर्बंध) नियम १९६८ नियम २ (२) वर्ग (अ) खाली येणारी जमीन, धारकाने कोणत्याही वेळी लागवडीखाली आणल्यास लागवडीखालील क्षेत्राच्या आकारणीच्या प्रमाणात आकारणी करावयाची कार्यपध्दती जमाबंदी आयुक्त कार्यालयाकडून निश्चित केली जाईल. शासन स्तरावर हा प्रस्ताव मंजूर केल्याने सुधारणे मुळे शेतकाऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

**शेतकऱ्यांना होणार हा फायदा**

सदर सुधारणा केलेल्या लागवडीयोग्य क्षेत्राच्या नोंदी अधिकार अभिलेखामध्ये न घेतल्यामुळे शेतक-यांना पीक कर्ज, पीक विमा, नैसर्गिक आपत्तीत पिकांच्या होणा-या नुकसानीचा मोबदला, भूसंपादन मोबदला, खरेदी विक्रीतील मोबदला इ. आर्थिक नुकसान संभवत होते. तसेच पिकाखाली असलेल्या पोटखराब क्षेत्रातील शेती उत्पादनाचा नियोजनाच्या कामात विचार केला जात नव्हता. आता मात्र या नवीन नियमामुळे शेतकऱ्यांना वरील फायदे होणार आहेत.

# शिंदेंची भाषा सपकाळांवर हल्ल्यासाठी चिथावणी देणारी

**मुंबई, दि. १८ मार्च**

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी औरंगजेबाच्या कारभाराची व देवेंद्र फडणवीस यांच्या कारभाराची तुलना केली पण त्याचा विपर्यास करून सपकाळ यांच्यावर अत्यंत खालच्या पातळीवर टीका केली जात आहे.

हर्षवर्धन सपकाळ यांची जीभ कापली काय, डोळे फोडले, काय?अशी चिखवणीखोर विधाने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली आहेत, हे अत्यंत आक्षेपार्ह असून हर्षवर्धन सपकाळ यांच्यावर हल्ला व्हावा, अशी भडकाऊ विधाने शिंदे करत आहेत, असे प्रदेश काँग्रेस कमिटीचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी म्हटले आहे. प्रशांत कोरटकर, राहुल सोलापूरकर यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचा अपमान केला त्यावेळी साधा निषेध तरी केला का? सातत्याने धार्मिक तेढ निर्माण करणारे, भडकाऊ भाषा वापरणाऱ्या नितेश राणेंवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याची धमक शिंदे यांच्यामध्ये आहे का?असा सवाल लोंढे यांनी केला आहे.

# ‘बर्ड फ्लू’ संबंधीत प्रतिबंधात्मक उपाययोजनांची अंमलबजावणी करा

- जिल्हाधिकारी आशीर्वाद
- बर्ड फ्लू बाधीत क्षेत्रातील चिकन दुकाने बंद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ मार्च-**

बर्ड फ्लू प्रतिबंध आणि नियंत्रणासाठी राष्ट्रीय कृती आराखडा २०२१ नुसार उपरोक्त दोन्हीही परिसर हे दक्षता झोन म्हणून जाहीर करण्यात आलेला आहे. तरी सर्व शासकीय विभागांनी या क्षेत्रात व अन्य भागात बर्ड फ्ल्युचा संसर्ग होऊ नये यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले.



दरम्यान, बाधित क्षेत्रातील चिकन शॉप बंद करण्यात आलेले आहेत. या परिसरातून चिकन खरेदी करू नये. तसेच कोणत्याही ठिकाणाहून चिकन खरेदी केल्यानंतर ते १०० डिग्री तापमानावर व्यवस्थित शिजवून खावे, असेही त्यांनी आवाहन केले आहे. जिल्ह्यात बर्ड फ्ल्यू चा संसर्ग होऊ नये या अनुषंगाने करावयाच्या उपाय योजनेच्या दृष्टीने आयोजित आढावा बैठकीत जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद मार्गदर्शन करत होते. यावेळी पोलीस शहर उपायुक्त दिपाली काळे, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉक्टर व्हि डि. येवले, जिल्हा परिषदेचे पशुसंवर्धन अधिकारी डॉ एन. एल. नरळे, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन डॉ. भास्कर पराडे, अन्न व औषध प्रशासनाचे सहाय्यक आयुक्त साहेबराव देसाई, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुहास माने, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे डॉ. संतोष भोई यांच्यासह सर्व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशीर्वाद पुढे म्हणाले की महानगरपालिका हद्दीतील छत्रपती संभाजी नगर तलाव परिसर व किल्ला भाग परिसर हे बाधित क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने अन्न व औषध प्रशासन विभाग व पोलीस विभागाने या परिसरातील सर्व चिकन शॉप बंद करावेत. महापालिकेने या परिसराचे निर्जंतुकीकरण करून घ्यावे. या परिसरात सर्वसामान्य नागरिकांच्या माहितीसाठी बॅनर्स लावावे तसेच महापालिकेने या ठिकाणी माहिती देण्यासाठी कर्मचारी नियुक्त करावेत. त्याचप्रमाणे पशुसंवर्धन विभागाने या भागातील घरगुती प्राणी पक्षी यांचे सर्वेक्षण पूर्ण करून घ्यावे व त्यातील आजारी प्राण्यांचे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेकडे पाठवावे, असेही त्यांनी निर्देशित केले.



# संघर्ष केल्याशिवाय यश मिळत नाही : माजी महापौर यन्नम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ मार्च-**

प्रत्येकाच्या आयुष्यात संकटे येतातच. त्याशिवाय यशस्वी होता येत नाही. आजच्या काळात स्त्रीयांनी चूल, मूल व चार भिंतीत न अडकता अनेक क्षेत्र काबीज केले असल्याचे प्रतिपादन माजी महापौर श्रीकांचना यन्नम यांनी केले.

श्री मार्कंडेय सोशल फाउंडेशन संचलित पद्मशाली सखी संघमच्या वतीने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून रविवारी पूर्व भागातील श्रीराम मंदिरात झालेल्या पद्मशाली समाजातील कर्तबगार महिलांचे गौरव सोहळा समारंभात त्या बोलत होत्या. यावेळी अंबिका गुंडला, मंजुषा मुडदिड्डी, कल्याणी पेनगोंडा, मीनाक्षी श्रीराम व श्वेता गोटीपामूल यांच्या सन्मान करण्यात आला. कर्तबगार महिलांना गौरवपत्र, प्रेरणादायी पुस्तके, गुलाब फूल व सोलापूरी टॉवेल देऊन सन्मानित करण्यात आले. समन्वयिका कला चन्नापट्टण यांनी सूत्रसंचालन करत आभार मानले. शालिनी दोरनाल (कॅनडा) व सुजाता गोल्ला (मुंबई) यांच्या रोशन टी हाऊसतर्फे अल्पोपहार देण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ममता मुदगुंडी, गीता भूदत्त, सुनिता क्यामा (निलम), हेमा मैलारी, वनिता सुरम, पल्लवी संगा, प्रा.सपना मिठ्ठापल्ली, पद्मा मेडपल्ली, विद्या श्रीगादी, पूजा चिप्पा, आरती बुधारम, सुरेखा भिमनपल्ली, श्रीनिवास कामूर्ती, किशोर व्यंकटगिरी, श्रीनिवास पोटाबत्ती यांचे सहकार्य मिळाले.

# झेडपीच्या पुढाकाराने वळसंगची पाणी टंचाई होणार दूर

**▸▸ सीईओ जंगम यांनी केली वळसंग योजनेची पाहणी**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ मार्च-**

सोलापूर जिल्हा परिषदेने पुढाकार घेतल्यामुळे वळसंगच्या ग्रामस्थांची तहान ऐन उन्हाळ्यात भागली आहे. सिईओ कुलदीप जंगम यांनी पुढाकार घेतलेले वळसंग गावाचा पाणी प्रश्न मार्गी लागला आहे. कुरनूर धरणातून उचल पाणी असल्यामुळे ग्रामस्थांनी पाणी शुध्द करून पिण्याचे आवाहन सिईओ कुलदीप जंगम यांनी केले आहे.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी आज दक्षिण सोलापूर तालुक्यातील वळसंग येथील पाणीपुरवठा योजनेस भेट देऊन कामाची पाहणी केली. याप्रसंगी उप अभियंता सुनील कटकधोंड, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे उपअभियंता सुनील देशपांडे, कनिष्ठ अभियंता गोरे, सरपंच जगदीश अंटद, उपसरपंच समीर कटरे, सदस्य मलकप्पा कोडले, श्रीशैल भुसणगी ,ग्रामसेवक राजकुमार जाधव, तसेच ग्रामस्थ सिद्धाराम वाघमारे, मोसीन फुलारी, सिद्धय्या मठपती व ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते. वळसंग येथे जलजीवन मिशन अंतर्गत कुरनूर येथील धरणातून पाणी वळसंग येथे आणण्यात येत आहे. यासाठी ग्रामपंचायतीस अनंत अडचणींचा सामना करावा लागला. कुरनूर धरणातून वळसंग येथे पाणी आणण्यासाठी काम सुरूवात होते परंतु कुरनूर धरणाजवळ इलेक्ट्रिशन पंप साठी वीज कनेक्शनची सुविधा नसल्यामुळे एमएसईबी आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्यामध्ये अडचणी येत असल्यामुळे उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर व उपजिल्हाधिकारी सुमंत शिंदे यांच्यासमोर विजमंडळाचे अधिकारी यांचे समवेत बैठक घेऊन चर्चा केली. कुरनूर येथे वीज मंडळाने विद्युत पुरवठा तातडीने करून काम पुर्ण केले. मात्र कुरनूर ते वळसंग या मार्गावर तीर्थ येथे काही शेतकऱ्यांनी पाणीपुरवठा योजना रोखली होती. संबंधित शेतकरी सरपंच , उपसरपंच व ग्रामसेवक यांची सुनावणी मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्यासमोर झाली. या सुनावणीत कुणीही पाणीपुरवठा योजना अडवणार नाही याबाबत शेतकऱ्यांचे समुपदेशन मुख्य कार्यकारी अधिकारी जंगम यांनी केले. त्यामुळे पाणीपुरवठा योजना पुन्हा सुरळीत होऊन पाणी वळसंग येथे आणण्यासाठी मदत झाली आहे.

**सीईओंनी सुचविला थेट पर्याय :** वळसंग येथे पाण्याचा मोठा संघर्ष ग्रामस्थांना करावा लागत आहे. सिईओ कुलदीप जंगम यांनी कुरनूर धरणातील पाणी जलशुध्दीकरण केंद्रा पर्यंत आणण्या बरोबरच ते पाणी सध्या सुरू असलेल्या पाणी पुरवठा योजनेचे विहीरी जवळ आणून तिथून थेट पाणी पुरवठा गावात करणेचे सुचना दिले.या मुळे वळसंगचा पाणी प्रश्न मार्गी लागणेस मदत झाली आहे. प्राधिकरण विभागाने तातडीने पाणी पुरवठा योजना पुर्ण करण्याच्या सुचना सिईओ कुलदीप जंगम यांनी दिले आहेत.

# नवीन योजना असतानाही ९ हजार हातपंपातून पाणीपुरवठा सुरु

**ग्रामीण भागातील लोकांना पाण्यासाठी हातपंपाचा आधार**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ मार्च**

सरकारने ग्रामीण भागातील पाणीटंचाई दूर करण्यासाठी जलजीवन मिशन व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यासारखे योजना राबविण्यात आले. ग्रामीण भागात पाणीपुरवठा योजनांचा विस्तार झाला असला तरी आजही ग्रामीण भागातील गावखेड्यातील, वाड्या वस्त्यांवरील, तांडा, वस्तीशाळा परिसरातील लाखो लोकांची तहान जिल्ह्यातील ९ हजार १९२ हातपंप तहान भागवित आहेत.

ग्रामस्थांना सहज पाणी उपलब्ध व्हावे, यासाठी हातपंप सुरू करण्यात आली . भारनियमनाच्या कालावधीत आजही अनेक गावात हातपंपातून पिण्याचे पाणी वापर करण्यात येत आहे . मात्र नवीन योजना आल्यामुळे अनेक गावात हातपंप बंद अवस्थेत असून वापर कमी झाले आहे. हातपंप बंद झाल्यावर नागरिकांनी ग्रामपंचायत अथवा पंचायत समितीकडे तक्रार केल्यास हातपंपाची दुरूस्ती करण्यात येते. सोलापूर जिल्ह्यात सर्वाधिक १४३६ हातपंप करमाळा तालुक्यात असून सर्वात कमी ३९२ हातपंप उत्तर सोलापूर तालुक्यात आहेत. त्यानंतर मोहोळ, कूर्डूवाडी, सांगोला, माळशिरस, मंगळवेढा, अक्कलकोट, सांगोला, बार्शी, दक्षिण सोलापूर या तालुक्यात हातपंपातून पाणी उपलब्ध होत आहे.

**शासकीय यंत्रणा कार्यरत**

करमाळा, सांगोला, मोहोळ या तालुक्यात २ हातपंप देखभाल दुरुस्ती पथके कार्यरत असून यासाठी विशेष वाहने साहित्यांसह सज्ज असतात, याशिवाय अक्कलकोट, बार्शी, कुर्डूवाडी, पंढरपूर, मंगळवेढा, माळशिरस, उत्तर सोलापूर व दक्षिण सोलापूर या प्रत्येकी तालुक्यांना हातपंप देखभाल दुरुस्ती पथके १ असून १ सुसज्ज असे वाहन आहे. यासाठी विशेष अधिकारी व कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. ग्रामीण भागातील पाणीटंचा प्रश्न कायमचा मिटविण्यास जिल्हा परिषदेची यंत्रणा कार्यरत आहे. पाणीपुरवठा नवीन योजना पूर्ण करण्याबरोबरच पाण्याचे स्रोत वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू आहेत. भागात हातपंप लोकांची पाण्याची गरज भागवत आहे.



**- कुलदीप जंगम,**
सीईओ, जिल्हा परिषद,

**नवीन योजना अपयशी!**

सरकारने हर घर जल म्हणत प्रत्येक नागरिकांसाठी पाणीपुरवठा योजना राबवित आहे. त्यातूनच जलजीवन मिशन व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणची पाणीपुरवठा कामे प्रगतीपथावर आहेत. मात्र वाडया वस्त्यांसह ठिकाणी सरकारी योजना अपयशी ठरल्याने हातपंपाचा आधार घ्यावे लागत आहे.

# फार्मर आयडीसाठी जिल्ह्यातील ४ लाख २२३ शेतकऱ्यांची नोंदणी

**सर्व शेतकऱ्यांनी फार्मर आयडी काढून घेण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ मार्च-**

केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध शेतीविषयक योजनांचा लाभ घ्यायचा असल्यास शेतकऱ्यांकडे शेतकरी ओळखपत्र असणे आवश्यक आहे. केंद्र सरकारच्या कृषी आणि शेतकरी विकास मंत्रालयाकडून ‘ॲग्रीस्टॅक’ या डिजीटल उक्रमाद्वारे शेतकऱ्यांना ओळखपत्र देण्यासंदर्भात निर्णय घेतला गेला आहे. महाराष्ट्रात देखील शेतकऱ्यांना ॲग्रीस्टॅक अंतर्गत डिजीटल शेतकरी ओळखपत्रासाठी नोंदणी करावी लागणार आहे.

या फार्मर आयडीसाठी सोलापूर जिल्ह्यातील ८ लाख ९३ हजार ६७७ शेतकऱ्यांपैकी ४ लाख २२३ जणांनी ऑनलाईन नोंदणी झाली असल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी पत्रकारांशी संवाद साधताना दिली. नोंदणीकृत या शेतकऱ्यांना शासनस्तरावरून शेतकरी ओळखपत्र लवकरच मिळणार आहेत. केंद्र व राज्य सरकारकडून शेतीविषयक योजना चालवल्या जातात. त्या योजनांचा लाभ घेण्यासाठी शेतकरी ओळखपत्र आवश्यक आहे. हे ओळखपत्र काढण्यासाठी आधार कार्ड, सात बारा उतारा, गट क्रमांक, नमुना ८ अ खाते उतारा क्रमांक, मोबाईल क्रमांक आणि लाभार्थी शेतकरी नोंदणीवेळी उपस्थित असणं आवश्यक आहे.

फार्मर आयडी नोंदणीसंदर्भात तलाठी कार्यालय, कृषी सहाय्यक आणि सीएससी केंद्र चालकांशी संपर्क करून आपला अर्ज ऑनलाईन भरता येतो. शेतकऱ्यांना जर पीएम किसान सन्मान निधीच्या आगामी हप्त्याची रक्कम मिळवायची असल्यास फार्मर आयडी मिळवावा लागेल.

**किमान १८ वयोमर्यादा**

किसान क्रेडिट कार्ड योजनेत शेतकऱ्यांना आर्थिक मदत दिली जाते. या योजनेसाठी अर्जदाराचे वय किमान १८ वर्षे असावे लागते. मात्र या योजनेमध्ये कमाल वयाची मर्यादा नाही. आता सरकार या योजनेअंतर्गत जास्तीत जास्त ५ लाख रुपयांचे कर्ज देण्यात येणार आहे. हे कर्ज पाच वर्षांपर्यंत घेता येते. किसान क्रेडिट कार्डची वैधता देखील पाच वर्षांपर्यंत आहे.

# भूजल साठा वाढल्याने वाढला उन्हाळी पेरा

- ▸▸ जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा मका, भुईमूगावर भर
- ▸▸ उसाचा टक्का वाढल्याने कारखाने चालणार जोमात





**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ मार्च-**

गतवर्षी जिल्ह्यात दुष्काळी स्थिती निर्माण झाल्याने रब्बी हंगामानंतर उन्हाळी हंगामाकडे शेतकऱ्यांनी दुर्लक्ष केले होते. ज्यांच्याकडे पाणी उपलब्ध होते त्यांनीच भाजीपाला व भुईमुगाचा नाद केला होता. ऊस लागवडी करण्यावर तर कसलाच भर नव्हता. यंदा मात्र सरासरीच्या दीडपट पाऊस होवून जलसाठा वाढल्याने जिल्ह्यात २ हजार ८०३ हेक्टर उन्हाळी हंगामातील विविध पिके शेतकऱ्यांनी घेतली असल्याची माहिती कृषी विभागाकडून मिळाली. दरम्यान, या उन्हाळ्यात ११९२८.२ हेक्टरवर उसाची उन्हाळी लागवड झाल्याचेही त्यांनी नमूद केले.

गतवर्षी पाच महिन्यांपेक्षा अधिक काळ पावसाळा झाला. यामुळे जिल्ह्यातील भूजल पातळी समाधानकारक आहे. यामुळे खरिप, रब्बी हंगामानंतर उन्हाळी पेराही चांगलाच वाढला आहे. जिल्ह्यातील जलसाठ्यात गत वर्षाच्या तुलनेत यंदा मोठा पाणीसाठा आहे. यामुळे जिल्ह्यातील अनेक शेतकरी उन्हाळी पिकांकडे वळले आहेत. तर अनेकांनी ऊस पिकाला प्राधान्य दिले आहे. यंदा पावसाळ्यात उजनीसह इतर मोठे प्रकल्प, साठवण-पाझर तलाव, विहिरी, नद्या-नाले ओसंडून वाहिल्याने शेतकरी बांधवांत समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. यामुळे प्रकल्पात व जमिनीचा भूजल साठाही काही प्रमाणात बरा आहे. यामुळे यंदा उन्हाळी हंगामातही मका, सूर्यफूल, भुईमूग, बाजरी, तीळ यासह इतर पिकांचा समावेश आहे.

**नवीन ऊसलागवड वाढल्याने अतिरिक्त ऊस होण्याचे संकेत**

यंदा चोहीकडे मुबलक पाऊस झाल्याने नवीन ऊस लागवड मोठ्या प्रमाणात झाली आहे. गतवर्षी उसाअभावी कारखान्यांचे पट्टे अवघ्या ३ ते साडेतीन महिन्यात पडले होते. यंदा मात्र जिल्ह्यात ऊस लागवड मोठ्या प्रमाणात झाल्याने साखर कारखान्यांना ऊस मोठ्या प्रमाणात मिळणार असल्याने आगामी गळीत हंगाम जास्त कालावधीपर्यंत चालणार आहे. इतकेच कायतर अतिरिक्त उसाचीही भीती जाणकार शेतकरी वर्गवित आहेत.

# २२ मार्चला राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन

## ‘‘सामंजस्य आणि तडजोडीने जीवन सुखी बनवूया, चला आपण लोकन्यायालयाच्या मार्गाने जाऊया‘‘

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १७ मार्च -**

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांचे निर्देशाप्रमाणे सन २०२५ सालातील पहिल्या राष्ट्रीय लोकअदालत २२ मार्च रोजी सोलापूर जिल्हयातील सर्व न्यायालयात आयोजित करण्यात आलेले आहे.

सदर लोकअदालतीमध्ये फौजदारी तडजोडपात्र प्रकरणे, बँक वसुली प्रकरणे, कलम ३८ एन. आय. ॲक्ट ची प्रकरणे, अपघात न्यायाधिकरणाबाबतची प्रकरणे, कामगार वाद प्रकरणे, वीज व पाणी यांच्या देयकाबाबतची प्रकरणे, वैवाहिक वादाबाबतची प्रकरणे, भुसंपादन बाबतची प्रकरणे, तसेच बँक, सहकारी बँक, सहकारी पतसंस्था यांच्या वसुलीच्या




दरखास्त, बँक लवाद दरखास्त इत्यादी (प्रलंबित व दाखलपूर्व) प्रकरणे ठेवण्यात येणार आहेत. ज्या पक्षकारांना लोकअदालतमध्ये प्रत्यक्षरीत्या सहभागी होता येणार नाही त्यांच्यासाठी आभासी पध्दतीने उपस्थित राहणेकरीता ऑनलाइन माध्यमाचा वापर केला जाणार आहे.सदरच्या लोकन्यायालयात ई-चलनाच्या प्रकरणात एस.एम.एस.द्वारा वाहनधारकांच्या मोबाईलवर नोटीसा पाठविले गेल्या आहेत. सदर चलनानुसार नोटीसमध्ये नमूद लिंकवर ऑनलाइनव्दारे चलनाची रक्कम भरता येवू शकते. तसेच महा-ट्राफिक या ॲपवरसुध्दा सदर रक्कम भरता येवू शकते. या व्यतिरीक्त महाराष्ट्रातील कोणत्याही जवळच्या वाहतूक शाखेमध्ये जावून सदर रक्कम भरता येवू शकते. धनादेश न वटलेल्या फौजदारी प्रलंबित प्रकरणांमध्ये धनादेशाची थोडी रक्कम भरुन प्रकरण निकाली काढता येणे शक्य होणार आहे. धनादेशाची रक्कम एक रकमी देता येणे शक्य नसल्यास ठरलेल्या रक्कमेचे हप्ते बांधून घेणे शक्य होणार आहे. काही रक्कम लोकअदालती दिवशी देवून उर्वरीत रक्कमेबाबत तडजोड हुकुमनामा करणे व संपुर्ण फौजदारी प्रकरण निकाली निघणे शक्य होणार आहे. परिणामी पक्षकारास न्यायालयात पुन्हा हजर राहण्याची आवश्यकता राहणार नाही. सदर राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये जास्तीत जास्त पक्षकारांनी आपापली प्रकरणे तडजोडीने मिटवुन लोकअदालतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर मनोज शर्मा यांनी केले आहे.

**लोकन्यायालयाचे फायदे...**

१) प्रकरणाचा झटपट निकाल लागतो. तोंडी पुरावा उलट तपासणी, दिर्घ युक्तीवाद या बाबी टाळल्या जातात.
२) लोकन्यायालयाच्या निवाड्याविरुध्द अपील नाही. एकाच निर्णयात कोर्ट बाजीतून कायमची सुटका होते.
३) लोकन्यायालयात होणारा निवाडा हा आपसात समझोतीने होत असल्याने ना कोणाचा जय होतो ना कोणाची हार.
४) लोकन्यायालयाचा निवाडा पक्षांना समाधान देतो.
५) परस्पर संमतीने निकाल होत असल्याने एकमेकांतील द्वेष वाढत नाही व कटूताही निर्माण होत नाही.
६) न्यायालयाच्या हुकुमनाम्याप्रमाणेच लोकन्यायालयात होणा-या निवाडयाची अंमलबजावणी यायालयामार्फत करता येते.
७) वेळ आणि पैसा दोघांचीही बचत होते.
८) लोकन्यायालयात निकाली निघणा-या प्रकरणांमध्ये कायदयानुसार कोर्ट फी ची रक्कम परत मिळते.

# विधान परिषदेसाठी महायुतीचे पाच उमेदवार बिनविरोध

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.१७ मार्च :**

विधानपरिषदेच्या पाच जागांसाठी महायुतीचे ५ उमेदवारांची बिनविरोध निवड झाली आहे. अर्ज छाननीच्या दिवशी अपक्ष उमेदवाराचा अर्ज बाद झाल्याने पाच जण बिनविरोध झाले असून त्यांची नियुक्तीवर २० मार्चला शिक्कामोर्तब होईल अर्ज माघारीची मुदत या दिवशी पर्यंत असून त्यानंतर नियुक्त झालेल्यांची घोषणा करण्यात येईल.



एकुण ६ अर्ज दाखल झाले होते. त्यापैकी पुण्यातील म्हत्रे या अपक्ष उमेदवार अर्ज छाननी बाद झाला. त्यामुळे भाजपाचे तीन तर एकनाथ शिंदे यांचे शिवसेना व अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रत्येकी एक उमेदवाराची नियुक्ती निश्चित झाली भाजपकडून संदीप जोशी, संजय केनेकर आणि दादाराव केचे शिवसेनेचे चंद्रकांत रघुवंशी आणि राष्ट्रवादी काँग्रेसनं संजय खोडके यांची निवड निश्चित झाली आहे.

# चंद्रभागेचे प्रदूषण रोखण्यासाठी ३५ कोटी खर्च

## एकूण ४८.२५ कोटींच्या कामांना मंजुरी : पंकजा मुंडे

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई,दि.१८ मार्च -**

पंढरपूर (जि.सोलापूर) तालुक्यातील चंद्रभागा नदीतील प्रदूषण रोखण्यासाठी शासनाकडून सातत्याने प्रयत्न करत असून आतापर्यंत चंद्रभागा प्राधिकरणाच्या माध्यमातून आतापर्यंत ३४.६५ कोटी खर्च करण्यात आला आहे. या कामासाठी एकुण ४८.२५ कोटींच्या खर्चाच्या कामांना मंजुरी देण्यात आली आहे, अशी माहिती पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी विधानसभेत मंगळवारी दिली.माढाचे आमदार अभिजीत पाटील यांनी विधानसभेत तारांकित प्रश्नोत्तरात हा मुद्दा उपस्थित केला.



चंद्रभागा नदीपात्रातील पाणी प्रदुषित झाल्याचे अहवाल फेब्रुवारी महिन्यात आला असल्याची निदर्शनास आली आहे. त्यामुळे नदीत स्नान करण्यास येणाऱ्या भाविकांना दूषित पाण्या त स्नान करावे लागते पाणी अस्वच्छ असल्यामुळे धोकादायक हजार पसरण्याची भीती भाविकांमध्ये निर्माण झाली आहे याबाबत शासनाकडून प्रदूषण रोखणे व नदीतील पाण्याचे शुद्धीकरण करण्यासाठी काय कारवाई करणार आहे?, अशी विचारणा त्यांनी केली.



त्यावर उत्तर देताना पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी चंद्रभागा नदीतील पात्रातील पाणी प्रदूषित झाल्याबद्दल कोणतेही तक्रार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे आलेली नाही मात्र दिपाली पाणी साठवलेले असल्यामुळे पाण्यामध्ये घाण साठवून पाणी खराब झाल्याची तक्रार आली असल्याचे सांगितले. सोलापूर जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अहवालानुसार चंद्रभागेच्या पाण्यात स्नान केल्याने जीबीएस चा आजार होण्याची शक्यता नसल्याचे नमूद केले आहे. नदीत पपई क्रियाकृत सांडपाणी मिसळू नये यासाठी प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून पंढरपूर नगरपालिकेला ५ फेब्रुवारीला कळविण्यात आले आहे तसेच नदीचे प्रदूषण रोखण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली चंद्रभागा प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली असून त्याकरिता ंच्या मार्फत वेळोवेळी आढावा बैठक घेण्यात येत आहेत या अभियानांतर्गत नदी निर्मळ व प्रदूषण मुक्त करण्याच्या अनुषंगाने ४८ कोटी २५ लाख हिमतीच्या कामांना प्रशासकीय मान्यता दिली असून राज सरकारने आत्तापर्यंत ३४ लाख ६५ कोटी निधी वितरित केलेला आहे सांडपाणी व्यवस्थापन व त्या अनुषंगाने कामे प्रगतीवर असल्याचे त्यांनी सांगितले.

# देशातील ४५ टक्के आमदारांवर गुन्हेगारी खटले

## आंध्रप्रदेशात सर्वाधिक; सिक्कीममध्ये कमी

**नवी दिल्ली, १८ मार्च-**

निवडणूक सुधारणांवर काम करणारी स्वयंसेवी संस्था असोसिएशन ऑफ डेमोक्रॅटिक रिफॉर्म्सच्या (एडीआर) अहवालात असे दिसून आले आहे की, देशातील ४५ टक्के आमदारांवर गुन्हेगारी खटले दाखल आहेत. एडीआरने २८ राज्ये आणि विधानसभा असलेल्या तीन केंद्रशासित प्रदेशांधील एकूण ४,१२३ आमदारांपैकी ४,०९२ आमदारांच्या निवडणूक प्रतिज्ञापत्रांचे विश्लेषण केले.

आंध्र प्रदेशात १७४ पैकी सर्वाधिक १३८ आमदार (७९ टक्के) आहेत, तर सिक्कीममध्ये सर्वांत कमी ३२ आमदार (३ टक्के) आहेत, ज्यांनी स्वतः वरील गुन्हेगारी खटले घोषित केले आहेत. तेलुगू देसम पक्षाच्या १३४ आमदारांपैकी सर्वाधिक ११५ आमदारांवर (८६ टक्के) गुन्हेगारी खटले खटले आहेत. अहवालात असे दिसून आले की, १,८६१ आमदारांनी त्यांच्याविरुद्ध गुन्हेगारी खटले दाखल असल्याचे जाहीर केले आहे. यापैकी १,२०५ जणांवर खून, खुनाचा प्रयत्न, अपहरण आणि महिलांवरील गुन्हे असे गंभीर आरोप आहेत. २४ आमदारांच्या प्रतिज्ञापत्रांचे स्कॅनिंग खराब असल्याने विश्लेषण करता आले नाही.

### १२७ आमदारांवर महिलांवरील अत्याचाराचे गुन्हे

अहवालानुसार, ५४ आमदारांवर भारतीय दंड संहितेच्या कलम ३०२ अंतर्गत हत्येचे आरोप आहेत. तर, २२६ जणांवर आयपीसीच्या कलम ३०७ आणि भारतीय दंड संहितेच्या कलम १०९ अंतर्गत हत्येचा प्रयत्न केल्याचा आरोप ठेवण्यात आला आहे. याशिवाय १२७ आमदारांवर महिलांवरील गुन्ह्यांचे गुन्हे दाखल आहेत. यापैकी १३ जणांवर आयपीसीच्या कलम ३७६ आणि ३७६ (२)(एन) अंतर्गत बलात्काराचा आरोप ठेवण्यात आला आहे. कलम ३७६(२)(एन) एकाच पीडितेवर वारंवार होणाऱ्या लैंगिक हल्ल्यांशी संबंधित आहे

# पोलिसांवरील हल्ला सहन करणार नाही : देवेंद्र फडणवीस

## नागपूरातील दंगली प्रकरणी कठोर कारवाई

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई, दि.१८ मार्च -**

महाराष्ट्र हे 'प्रगतिशील राज्य' असून या ठिकाणी जातीभेदाला थारा नाही. नागपूर शहरामध्ये १७ मार्चला राज्याची सामाजिक घडी विस्कटणारी घटना घडली. या घटनेमुळे राज्याच्या शांततेला धक्का बसला. पोलिसांवर हल्ला करणाऱ्यांना आम्ही सोडणार नाही. सर्व आरोपींवर जात धर्म न पाहता कठोर कारवाई करु, असा इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिला. त्याचवेळी सध्या सर्वधर्मियांचे सण सुरू आहेत. नागरिकांनी संयम बाळगून शांतता राखत हे सण साजरे करावेत, असे आवाहनही त्यांनी केले.

घटनास्थळावरून ट्रॉली भरून दगड मिळाले आहेत. घरांवर दगड जमवून ठेवण्यात आल्याचे निदर्शनास आले असून शस्त्रे जप्त करण्यात आली आहेत. हा हल्ला सुनियोजित पॅटर्न असल्याचे दिसून येते. राज्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

नागरिकांनी एकमेकांचा आदरभाव करीत आपले सण साजरे करावे. शांतता राखावी, कायदा व व्यवस्था टिकवण्यासाठी शासनाला सहकार्य करावे, असे आवाहन करीत दंगा करणाऱ्यांबाबत कुठल्याही जाती धर्माचा विचार न करता कडक कारवाईच्या इशाऱ्याचा पुनरुचारही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केला.



नागपूरमध्ये सोमवारी घडलेल्या हिंसाचाराच्या घटनेचे पडसात विधिमंडळात उमटले. नागपुरात झालेल्या दगडफेक, जाळपोळीच्या घटनेच्या निषेधार्थ विरोधकांनी सभागृहाच्या पायऱ्यावर आंदोलन केले. त्यानंतर विधानसभेत सरकारकडे घटनेची माहिती विचारल्यानंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी नागपूर घटनेबाबत निवेदन करीत सर्व घटनाक्रम विषद केला. ते म्हणाले की, नागपूर शहरात १७ मार्चला सकाळी ११.३० वाजता महाल परिसरात औरंगजेबाची कबर हटविण्याच्या मागणीसाठी विश्व हिंदू परिषद व काही संघटनांनी गवताच्या पेंड्यांची प्रतीकात्मक कबर काढून आंदोलन केले. याबाबत गणेशपेठ पोलिसांनी गुन्हे दाखल केले. मात्र, या आंदोलनाबाबत अफवा पसरली व काही समाज घटकांनी हंसापुरी भागात जमाव करत हिंसक आंदोलन केले. या भागात १२ दुचाकी जाळण्यात आल्या. तसेच भालदापूर भागात दोन जेसीबी, क्रेन आणि चारचाकी वाहनांची जाळपोळ करण्यात आली. येथे दगडफेकही करण्यात आली. या संपूर्ण घटनांमध्ये ३३ पोलीस जखमी झाले असून ५ नागरिक जखमी झाले आहेत. यापैकी ३ नागरिकांना उपचाराअंती सोडण्यात आले, तर २ नागरिकांवर उपचार सुरू आहेत.

# चार जिल्ह्यांतील २० हजार जन्मदाखले रद्द

## भाजपा नेते किरीट सोमय्या यांची माहिती

**◆ अमरावती, १८ मार्च**

राज्यातील ४० हजार बांगलादेशींचे जन्म प्रमाणपत्र रद्द करण्यात आले असून, त्यात विदर्भाच्या चार जिल्ह्यांतल्या ३२ तालुक्यांतील १९ हजार ७६२ जन्म प्रमाणपत्रांचा समावेश आहे. ही सर्व प्रमाणपत्रे नायब तहसीलदारांनी दिली होती, अशी माहिती भाजपा नेते किरीट सोमय्या यांनी मंगळवारी दिली.




बांगलादेशी जन्म प्रमाणपत्र घोटाळ्यासंदर्भात ते अमरावतीला आले होते. पोलिस अधीक्षक विशाल आनंद यांच्या कक्षात त्यांनी पोलिस व महसूल अधिकाऱ्यांशी चर्चा केल्यानंतर पत्रकारांशी संवाद साधला. ते म्हणाले, जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी या प्रकरणात अजिबात सहकार्य केले नाही. त्यांची तक्रार केंद्र सरकारकडे केली आहे. अमरावती, यवतमाळ, नागपूर व अकोला या चार जिल्ह्यांतल्या ३२ तालुक्यांतील १९ हजार ७६२ जन्म प्रमाणपत्रे नायब तहसीलदारांनी सुनावणी न करताच बेकायदेशीरपणे दिली आहे. ती सर्व प्रमाणपत्रे रद्द करण्यात आली. अमरावती शहर व ग्रामीण भागात बोगस जन्म प्रमाणपत्राच्या अनुषंगाने जे गुन्हे दाखल झाले आहे, त्यातल्या १०० गुन्हेगारांची यादी पोलिसांना दिली आहे. लवकरच काही जणांना अटक होईल. सरकारी अधिकाऱ्यांच्या संगनमताने हा घोटाळा झाला असून, त्यांच्यावरही कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली. बांगलादेशी रोहग्यांना बनावट जन्म प्रमाणपत्राबाबत महाराष्टात एकूण २० ठिकाणी गुन्हे दाखल झाल्याचेही त्यांनी सांगितले. ◂(तभा वृत्तसेवा)

# २१, २२ मार्चला दिवस-रात्र समान

**◆ यवतमाळ, १८ मार्च**

दैनंदिन जीवनात दिवस व रात्रीचा कालावधी कमी-जास्त होणे याचा अनुभव आपण नेहमीच घेत असतो. पृथ्वीचा अक्ष २३.५ अंशाने तिरपा असल्याने हे घडत असते. म्हणूनच सूर्याचे उत्तरायण व दक्षिणायन आपल्याला अनुभवता येते. एखाद्या वस्तूच्या सावलीचे विशिष्ट वेळी नियमित निरीक्षण केल्यास सूर्य कसा दक्षिणेकडे व उत्तरेकडे जातो, हे सहज लक्षात येते. पृथ्वीवरील ऋतूसुद्धा पृथ्वीच्या अक्षाच्या कलत्या स्थितीमुळेच निर्माण होतात.

पृथ्वीचा अक्ष २३.५ अंशाने झुकलेला असल्याने वर्षातील २१ मार्च व २२ सप्टेंबर हे दोन दिवस वगळता दिवस व रात्र कधीच समान नसते. २१ मार्चला पृथ्वीचे दोन्ही ध्रुव सूर्याच्या बाजूला आल्याने संपूर्ण पृथ्वीवर १२ तासांचा दिवस व १२ तासांची रात्र अनुभवावयास मिळणार आहे. या घटनेला जगात 'विषुवदिन' तर उत्तर गोलार्धात याला 'वसंत संपात




दिन' असे म्हणतात.

आकाशात वैषुविक आणि आयनिक वृत्तांचे दोन काल्पनिक छेदन बिंदू आहेत. त्यापैकी एका बिंदूत २१ मार्चला सूर्य प्रवेश करतो (याला वसंत संपात बिंदू म्हणतात) तर त्याच्या विरुद्ध बिंदूत २२ सप्टेंबरला सूर्य प्रवेश करतो (याला शरद संपात बिंदू म्हणतात). या दोन्ही दिवशी रात्रीचा आणि दिवसाचा कालावधी सारखाच (रात्र १२ तासांची व दिवस १२ तासांचा) असतो. इतर दिवशी मात्र दिनमान आणि रात्रमान हे कधीच सारखे नसते.

२१ मार्चनंतर सूर्याचा प्रवास उत्तरेकडे सुरू होतो. याला 'उत्तरायण' असे म्हणतात. यावेळी जसजसा सूर्य उत्तरेकडे सरकतो तसतसा दिवसाचा कालावधी वाढत जातो व रात्र कमी होऊ लागते. सूर्याचा हा उत्तरेकडचा प्रवास २१ जूनपर्यंत चालतो. या दिवशी सूर्य विषुववृत्ताच्या जास्तीत जास्त उत्तरेकडे असतो. अर्थात म्हणूनच या दिवशी दिवसाचा कालावधी अधिक असतो व रात्र सर्वाधिक कमी कालावधीची असते.

सूर्याच्या या अती उत्तरेकडील बिंदूला 'विष्टंभ' म्हणजेच 'समर सोल्स्टाईस' असे म्हणतात. या बिंदूपाशी सूर्य थोडासा थबकल्यासारखा भासतो व नंतर त्याचा परतीचा प्रवास सुरू होतो व येथून दिनमान कमी कमी होऊ लागते व रात्रमान वाढत जाते. जनतेने दिवस लहान-मोठा होणे तथा समसमान असणे यामागील विज्ञान समजून घ्यावे, असे आवाहन, स्काय वॉच ग्रुप यवतमाळचे अध्यक्ष रवींद्र खराबे, प्रमोद जिरापुरे, उमेश शेंबाडे, भूषण ब्राह्मणे, जयंत कर्णिक, पूजा रेकलवार व मानसी फेंडर यांनी केले आहे. ◂(तभा वृत्तसेवा)

# राज्यातील बसस्थानके अत्याधुनिक सेवासुविधायुक्त करणार

## परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई,दि.१८ मार्च**

राज्यातील बसस्थानक अत्याधुनिक सेवासुविधायुक्त करण्यासाठी 'बांधा वापरा हस्तांतरित करा' या तत्वावर विकसित करण्यावर भर देण्यात येत आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दोडामार्ग सावंतवाडी व अंबोली, या बसस्थानकांचा विकास तसेच छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सिल्लोड बसस्थानकावर प्रवाशांसाठी रस्ता उपलब्ध करून देण्यात यावा तसेच जळगाव जिल्ह्यातील चोपडा बसस्थानक अत्याधुनिक बसपोर्ट उभारण्याबाबत तात्काळ कार्यवाही करण्यात यावी अशा सूचना परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी दिल्या.

विधानभवन येथे राज्यातील राज्य परिवहन विभागाच्या विविध विषयाच्या अनुषंगाने बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत ते बोलत होते. यावेळी माजी मंत्री अब्दुल सत्तार,माजी मंत्री दिपक केसरकर,आमदार चंद्रकांत सोनावणे, एसटी महामंडळाचे बांधकाम महाव्यवस्थापक दिनेश महाजन, मुख्य लेखाधिकारी तथा आर्थिक सल्लागार गिरीश देशमुख यावेळी उपस्थित होते.

प्रताप सरनाईक म्हणाले की, शहर,तालुका व ग्रामीण भागातील परिवहन व्यवस्था बळकटीकरणासाठी '' बांधा वापरा हस्तांतरित करा '' या तत्वावर सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी, दोडामार्ग व अंबोली ही बसस्थानक विकसित करण्यात येतील. यावेळी माजी मंत्री दिपक केसरकर यांनी अंबोली येथील बसस्थानक पर्यटन दृष्ट्या महत्त्वाचे असुन तेथे सर्व सुविधा युक्त नवीन बसस्थानक बांधण्यात यावे अशा सूचना केली . छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सिल्लोड बसस्थानक येथे वारंवार होत असलेले अपघात लक्षात घेता या बसस्थानक परिसरात रस्ता उपलब्ध करून देण्यात यावा अशी येथील स्थानिकांची मागणी विचारात घेतली जावी अशी सूचना माजी मंत्री अब्दुल सत्तार यांनी केली यावरती परिवहन मंत्री सरनाईक यांनी याबाबत लवकरच निर्णय घेऊन बसस्थानकात पर्यायी रस्ता उपलब्ध करून देण्यात येईल असे आश्वासन दिले.

जळगाव जिल्ह्यातील चोपडा बसस्थानक अत्याधुनिक करण्यात यावे याबाबतीत स्थानिक आमदार चंद्रकांत सोनावणे यांनी सूचना केल्या. मध्यप्रदेश राज्याच्या सीमावर्ती भागामध्ये असलेला आदिवासीबहुल तालुका म्हणून चोपडा तालुका ओळखला जातो. या तालुक्यातील महत्वाचे बसस्थानक म्हणून चोपडा बसस्थानक अत्याधुनिक सोयी युक्त बनविण्यात यावे अशी मागणी केली. याबाबतीत लवकरच निविदा प्रक्रिया राबवून बांधा वापरा व हस्तांतरित करा या तत्त्वावर चोपडा बसस्थानक विकसित करण्याच्या सूचना मंत्री सरनाईक यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.



# यूपीएससीत सक्षम व दिव्यांग उमेदवार म्हणून परीक्षा देता येत नाही

## सर्वोच्च न्यायालयाने पूजा खेडकरला फटकारले

**नवी दिल्ली, १८ मार्च**

सक्षम आणि दिव्यांग उमेदवार म्हणून यूपीएससी परीक्षा देता येत नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने माजी परिविक्षाधीन आयएएस अधिकारी पूजा खेडेकरला मंगळवारी फटकारले. तिच्यावर ओबीसी कोट्याचा गैरफायदा घेतल्याचा तसेच नागरी सेवा परीक्षेत फसवणूक केल्याचा आरोप आहे.

दिल्ली सरकारने दाखल केलेल्या शपथपत्राला उत्तर देण्यासाठी पूजा खेडकरच्या वकिलाने मुदत मागितल्यानंतर न्या. बी. व्ही. नागरत्ना आणि न्या. सतीश चंद्र शर्मा यांच्या न्यायासनाने या प्रकरणाची सुनावणी १५ एप्रिलपर्यंत पुढे ढकलली. न्यायालयाने पूजा खेडकरला १५ जानेवारी रोजी दिलेले अटकेपासूनचे संरक्षण १५ एप्रिलपर्यंत वाढवले आहे. यूपीएससी उमेदवारांसाठी बनावट अपंगत्व प्रमाणपत्र तयार करण्याच्या घोटाळ्यात सहभागी असलेल्या मध्यस्थांची

ओळख पटवण्यासाठी पूजा खेडकरची कोठडीत चौकशी करण्याची गरज आहे, असे अतिरिक्त न्यायाभिकर्ता एस. व्ही. राजू यांनी सरकारच्या वतीने युक्तिवाद करताना सांगितले. पूजा खेडकर तपासात सहकार्य करण्यास तयार आहे, असे तपास यंत्रणांना अगोदरच लेखी कळवण्यात आले आहे, असे तिच्या वतीने युक्तिवाद करताना वकील बिना माधवन्? यांनी सांगितले. तुम्हाला मध्यस्थांची ओळख पटवायची आहे आणि ती तपासात सहकार्य करण्यासाठी तयार आहे, असे न्या. शर्मा यांनी राजू यांना सांगितले.

# बाळासाहेबांचे विचार सोडले, औरंग्याचे स्वीकारले

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा उबाठावर हल्ला

**◆ मुंबई, १८ मार्च**

खुर्चीसाठी बाळासाहेबांचे विचार सोडले आणि औरंग्याचे विचार स्वीकारणाऱ्यांना हिंदूत्वावर बोलण्याचा अधिकार नाही, अशा संतप्त शब्दांत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उबाठा गटावर जोरदार हल्ला केला.

सभागृहाचे नेते एकनाथ शिंदे यांनी नागपूर घटनेवर विधान परिषदेत निवेदन केले. यापसंगी ते बोलत होते. ते म्हणाले, अलिकडे औरंगजेबाचे उदात्तीकरण करण्याचे प्रकार वाढले आहेत. महाराष्ट्राचा घास घ्यायला आलेला, आमच्या आया-बहिनींची अब्रू लुटणारा औरंग्या यांचा कोण लागतो, हा माझा सवाल आहे. यावेळी सत्ताधाऱ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराज की जयच्या घोषणा दिल्यानंतर विरोधी बाकांवरुरू कंमेंट पास करण्यात आले. तेव्हा, अरे खुर्चीसाठी बाळासाहेबांचे विचार सोडून, औरंग्याचे विचार स्वीकारणारे तुम्ही लोकं, तुच्यात काय हिंमत आहे अशा शब्दांत शिंदे यांनी उबाठाच्या सदस्यांना डिवचले.



### हे दिल्लीला जाऊन लोटांगण घालून आले

हे लोकं आणि यांचे नेते दिल्लीला जाऊन लोटांगण घालून आले, पण यांना तेथे कोणी भीक घातली नाही. सत्ता आणि खुर्चीसाठी कुठेही मुजरा करायला हे तयार असतात. यांचे नेते गेले दिल्लीला मला वाचवा मला वाचवा म्हणत, अशा शेलक्या शब्दांत उद्धव ठाकरे आणि त्यांच्या सदस्यांना शिंदेंनी फटकारले.

### फडणवीस, महाजनांना तुरुंगात टाकणार होते

विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस, गिरीष महाजन, ॲड. आशिष शेलार आणि प्रविण दरेकर यांना तुरुंगात टाकायचे. मग भाजपा आमदारांना पक्षात घ्यायचे असे षडयंत्र यांनी रचले होते. पण मी यांचा टांगाच उलटवून टाकला. असे सभागृहात ऑन रेकॉर्ड शिंदे बोलले.

### सपकाळांचे डोळे काढले की जीभ छाटली?

हर्षवर्धन सपकाळ यांनी मुख्यमंत्र्यांची तुलना औरंगजेबाशी केली. देवेंद्र फडणवीस यांनी औरंग्याप्रमाणे सपकाळांचे डोळे काढले, सालटी काढली की जीभ छाटली, काय केले म्हणून त्यांनी मुख्यमंत्री फडणवीसांची तुलना थेट औरंगजेबाशी केली. औरंगजेब कुठे, देवेंद्र फडणवीस कुठे, जनाची नाही तर मनाची तरी ठेवा, अशा शब्दांत एकनाथ शिंदे यांनी संताप व्यक्त केला. औरंगजेबाची कबर ही महाराष्ट्राला लागलेला कलंक आहे. तो पुसला पाहिजे, अशीच लोकभावना असल्याचे शिंदे म्हणाले. ◂(तभा वृत्तसेवा)

# मनरेगात किमान ४०० रुपये मजुरी द्या

## सोनिया गांधी यांची राज्यसभेत मागणी

**नवी दिल्ली, १८ मार्च**

भाजपाच्या नेतृत्वातील केंद्र सरकार जाणीवपूर्वक ग्रामीण रोजगार हमी योजना मनरेगा कमकुवत करीत असल्याचा आरोप करीत काँग्रेसच्या नेत्या सोनिया गांधी यांनी, या योजनेत ४०० रुपयांची किमान मजुरी आणि १५० दिवस रोजगार द्या, अशी मागणी केली. दिवंगत पंतप्रधान मनमोहनसिंग यांच्या नेतृत्वातील तत्कालीन संपुआ सरकारने २००५ मध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा आणला होता, असे सोनिया गांधी यांनी राज्यसभेत हा मुद्दा उपस्थित करताना सांगितले. हा ऐतिहासिक कायदा ग्रामीण भागातील लाखो लोकांच्या अन्नसुरक्षेसाठी महत्त्वपूर्ण आहे. मात्र, सध्या सत्तेत असलेले भाजपा सरकार पद्धतशीरपणे ही योजना कमकुवत करीत आहे. यासाठी अर्थसंकल्पीय तरतूद ८६,००० कोटी रुपयांवर स्थिर राहिली आहे.

सोलापूर तरुण भारत
https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# समाजकंटकांना कठोर शिक्षा व्हावी

झीरो माईल सिटी, ऑरेंज सिटी, टायगर कॅपिटल अशा अनेक विशेषणांनी जगभरात प्रसिद्ध असलेल्या नागपूर शहराच्या शांततेला नख लावणारी घटना १७ मार्च २०२५ रोजी घडली. काही समाजकंटकांच्या उपद्रवामुळे शहरात तणाव निर्माण झाला आणि प्रकरण संचारबंदी लावण्यापर्यंत पोहोचले. औरंगजेबाची कबर उखडून टाकावी, यासाठी विश्व हिंदू परिषदेच्या कार्यकर्त्यांनी निदर्शने केली. त्यानंतर त्यांनी औरंगजेबाचा पुतळा जाळून प्रतीकात्मक निषेध व्यक्त केला. हे घडल्यानंतर बऱ्याच वेळाने एका विशिष्ट समुदायाचा जमाव तेथे आला आणि त्यांनी दगडफेक सुरू केली. या विषयाची माहिती पसरताच तरुणांचे दोन गट आमने-सामने आले आणि परिस्थिती बिघडायला सुरुवात झाली. महाल भागातील शिवाजी पुतळा, चिटणीस पार्क, सेंट्रल एव्हेन्यूवरील हंसापुरी, अग्रसेन चौक ते अगदी गणेशपेठच्या टोकापर्यंत हा तणाव वाढत चालला होता. दगडफेक आणि जाळपोळ सुरू झाली. काही लोकांनी गाड्या फोडल्या, जेसीबी जाळला. काही माथेफिरू तरुणांनी तर विशिष्ट समाजाच्या घरांमध्ये घुसून हल्ला करण्याचा प्रयत्न केला. तणाव वाढत असताना पोलिसांनी आपले सहकारी जखमी होऊनदेखील संयमाने स्थिती हाताळली. या घटनाक्रमातील टायमिंग महत्त्वाचे आहे आणि काही समाजकंटकांनी या घटनेच्या माध्यमातून शहराची शांतता भंग करण्याचा जो प्रयत्न केला, त्यांना आलेले यश हा सर्वांच्या चिंतेचा विषय आहे.

अर्बनायझेशनच्या आधुनिक अर्थाने पाहिले तर नागपूर हे तसे फार जुने शहर नाही. लोकवस्ती जुन्या काळापासून होती हे खरे असले, तरी नागपूर शहर अस्तित्वात आले साधारणतः ३०० वर्षांपूर्वी. त्यापूर्वी या टापूत छोटी-छोटी गावे होती. ती एकत्र करून हे शहर अस्तित्वात आले. इंग्रजांच्या काळापासून नागपूरचे महत्त्व वाढत गेले. हे शहर मध्य प्रांत आणि वऱ्हाडची राजधानी झाले. राज्यांची भाषावार पुनर्रचना झाल्यावर नागपूरचा राजधानीचा दर्जा गेला आणि ते महाराष्ट्राची उपराजधानी बनले. मात्र, त्यानंतरही त्याचे महत्त्व कमी झाले नाही. देशाच्या मध्यभागी असल्यामुळे आणि उत्तम कनेक्टिव्हिटीमुळे हे शहर सतत विकसित होत राहिले. गेल्या दशकभरापासून नागपूर शहर अत्यंत वेगाने प्रगतीकडे वाटचाल करीत आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे दोन्ही नागपूरकर नेते आणि त्यांचे सहकारी नागपूर शहरावर विशेष लक्ष देत आहेत. त्यामुळे नागपूरमध्ये एम्स, आयआयएम, ट्रिपल आयटी, नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी, सिम्बायोसिस अशा अनेक संस्था आल्या. आणखी काही नावाजलेल्या संस्था येत आहेत. जुन्या काळापासून हे प्रामुख्याने व्यापाऱ्यांचे शहर होते. आता ते विविध प्रकारच्या उत्पादनांचे शहर बनले आहे. मॅन्युफॅक्चरिंग हब, लॉजिस्टिक्स हब, मेडिकल हब, एज्युकेशन हब अशा विविध विशेषणांनी आता या नागपूर शहराची ओळख निर्माण होते आहे. नागपुरात मेट्रो रेल्वे सुरू झाली. आयटी सेक्टर वाढले. मिहानमध्ये भरपूर कंपन्या आल्या. त्यातून रोजगार वाढले. शिक्षणाच्या संधी वाढल्या. कुशल मनुष्यबळासाठी हे शहर प्रसिद्धी पावले. देशातल्या कोणत्याही शहराची नागपूरएवढ्या वेगाने प्रगती झाली नाही. याला हे दोन नेते कारणीभूत आहेत. तसे इथले लोकही. नागपूरकर हे शांत, संयमी स्वभावाचे आहेत. पूर्वीपासूनच येथे विविध धर्मांचे, जातींचे, पंथांचे, भाषांचे लोक राहतात. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मुख्यालय असलेल्या या शहरात दीक्षाभूमीही आहे. गुरुद्वारे आहेत, तशा चर्चेसही आहेत. मशिदी आहेत. निव्वळ हिंदू-मुस्लिम नव्हे तर बौद्ध, जैन, शीख, सिंधी, ख्रिश्चन, पारशी यांच्यासह अनेक धर्मपंथांचे लोक या शहरात गुण्यागोविंदाने राहत आहेत. शांततेतून स्थैर्य येते आणि स्थैर्यातून आर्थिक विकास येतो. त्यामुळेच या शहराची प्रगती मोठ्या प्रमाणात झाली. मध्य भारतातील सर्वांत मोठे शहर म्हणजे नागपूर. देशात त्याचा नंबर तेरावा. ऑक्सफर्ड इकॉनॉमिक्स रिपोर्ट असे म्हणतो की, जगातील जी पाच प्रमुख शहरे २०१९ ते २०३५ या काळात वेगाने वाढतील, त्यात नागपूर असेल. नागपूर शांत आहे. सुरक्षित आहे. त्यामुळेच ते प्रगती करीत आहे. अशा या शहराच्या शांततेला गालबोट लागत असेल तर त्यामागे कुणाचा तरी डाव आहे, षडयंत्र आहे हे निश्चित. कारण यासंदर्भात काही खटकणाऱ्या गोष्टी व्हिडीओजमध्ये टिपल्या गेल्या आहेत. उदाहरणार्थ, काही विशिष्ट घरांवर हल्ला करण्याचा प्रयत्न झाला. काही विशिष्ट घरे नेमकी त्या घटनांच्या वेळी बंद होती. हिंदू किंवा तत्सम प्रतीके असलेल्या गाड्यांना आग लावली गेली किंवा त्याच फोडल्या गेल्या. विशिष्ट धर्माचे प्रतीक असलेले पोशाख घालून आलेले लोक अधिक आक्रमक होते. हे सारे माध्यमांनी जसे टिपले, तसे ते आजूबाजूच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमध्येदेखील कैद झाले असले पाहिजे. ते पोलिसांनी शोधावे आणि जो जबाबदार असेल, त्याला कठोरतम शासन होईल याची खातरजमा करावी.

नागपूर शहर संपूर्ण देशात शांततेसाठी प्रसिद्ध आहे. त्याला कारणीभूत आहे इथले लोक. त्यातले बहुसंख्य लोक हिंदू आहेत. हिंदू समाज सहिष्णू, समंजस आहे. तो आपली नोकरी-व्यवसाय करतो. हिंदूंची मुले चांगली शिकतात. आपापले काम करतात. कट्टरपंथी विचारसरणीमुळे माथे फिरलेल्या समुदायांनी अशा शहरातील वातावरणाचा फायदा घेऊन स्वतःचे जीवन सुधारले पाहिजे. पानठेला, हातठेला, टपरी, हमाली यापलीकडे वैयक्तिक विकासाचे, आर्थिक समृद्धीचे अनेक मार्ग नागपुरात उपलब्ध आहेत आणि आणखीही होत आहेत. त्याचा लाभ सर्वांनी घेतला पाहिजे. जगाची आणि देशांची अर्थव्यवस्था असते, तशी ती स्थानिकही असते. नागपूरची अर्थव्यवस्था मजबूत आहे. या शहरातील दरडोई उत्पन्न वाढते आहे. देशातील इतर मोठ्या शहरांच्या तुलनेत इथले अर्थकारणही चांगले असले, तरी हे शहर राहण्यासारखे आहे. ते शांत आणि स्वस्त आहे ही त्याची प्रमुख कारणे. आता विविध प्रकारच्या मॅन्युफॅक्चरिंगमुळे शहर संपूर्ण जगात नावारूपाला आलेले आहे. आंतरराष्ट्रीय विमानतळ, मिहान, एसईझेड, मेट्रो रेल्वे, जागतिक कीर्तीच्या शिक्षण संस्था ही सारी उज्ज्वल भविष्याची आश्वासने आहेत. त्यामुळे या शहराची शांतता टिकविणे आणि स्थैर्य कायम राखणे हे प्रत्येक नागपूरकराचे कर्तव्य ठरते. १७ मार्च २०२५ रोजी जे घडले, तसे यापूर्वी या शहरात कधीही घडले नव्हते. एखादा अपवाद वगळता दशकानुदशके जातीय किंवा धार्मिक कलहाचा प्रसंग या शहरात घडला नाही, घडत नाही. आता अचानक काही विशिष्ट लोकांना औरंगजेबाचा पुळका आला असेल तर त्यांना हुडकून काढले पाहिजे. ज्यांनी जाळपोळ, तोडफोड केली असेल, ते कोणत्याही बाजूचे असतील तरी त्यांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले पाहिजे. एक अशीही चर्चा आहे की, हा तणाव सुरू झाल्यानंतर काही लोकांनी बाहेरून येऊन तेथे आगीत तेल ओतण्याचे काम केले. ते देखील व्हिडीओ, फोटोजमध्ये दिसतात. त्यांना शोधणे कठीण नाही. पोलिसांनी परिस्थिती शांतपणे हाताळली. खरे आव्हान पुढे आहे. ते आव्हान आहे अशा घटनेची पुनरावृत्ती टाळण्याचे. त्यासाठी पोलिसांना आपली संपूर्ण शक्ती व कौशल्य पणाला लावावे लागेल. पोलिसांची प्रतिष्ठा या घटनेमुळे पणाला लागली आहे. शांत अशा शहरात असे घडले असेल तर पोलिसांचे इंटेलिजन्स अपयशी झाले, असा ठपका लावता येणे शक्य आहे. हा ठपका पोलिसांना टाळायचा असेल तर या घटनेमागील सर्व अपप्रवृत्तींना, माथेफिरूंना, समाजकंटकांना लवकरात लवकर गजाआड करून त्यांना कायद्यानुसार शिक्षा होईल याची व्यवस्था केली पाहिजे. तात्पुरती शांतता प्रस्थापित झाल्याबरोबर, आज घडले ते उद्या पुन्हा कधीही घडणार नाही, असे समजून हा विषय सोडून दिला तर पोलिस व प्रशासनाचा मोठा दोष असेल. त्यांना आपल्या माथ्यावर दोष घ्यायचा नसेल तर दोषी शोधणे व त्यांना शासन करणे हे त्यांचे कर्तव्य आहे आणि त्यासाठी सहकार्य करणे, शहराच्या व देशाच्या हितासाठी शांतता कायम राखणे हे सर्व जाती-धर्म-पंथांच्या नागरिकांचे कर्तव्य आहे.

## प्रासंगिक

# राहुल गांधींचा निरुपयोगी 'हितोपदेश!'

राहुल गोखले

काही योगायोग विलक्षण असतात. काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी हे गुजरातेत बोलताना आपल्याच पक्षातील काही जणांवर तुटून पडले. गुजरात पक्ष संघटनेत असे काही नेते आहेत, ज्यांची भाजपाशी छुपी युती आहे आणि अशा किमान २०-३० जणांची हकालपट्टी करायला हवी, अशी राणाभीमदेवी गर्जना त्यांनी केली. राहुल गांधी काँग्रेसचे अनेक वर्षे उपाध्यक्ष होते आणि काही काळ अध्यक्ष होते. २००४ ते २०१४ अशी १० वर्षे हा पक्ष केंद्रात आघाडी सरकारचे नेतृत्व करीत होता आणि पक्षाची सर्व सूत्रे गांधी कुटुंबाकडेच होती, हे लपलेले नाही. आताही मल्लिकार्जुन खडगे काँग्रेसचे अध्यक्ष असले, तरी गांधी कुटुंबाला डावलून ते काहीही करू शकत नाहीत आणि इच्छितही नाहीत. असे असताना राहुल गांधी 'पक्षाच्या गुजरात संघटनेतून २०-३० जणांची हकालपट्टी करायला हवी' ही सूचना नेमकी कोणाला उद्देशून करीत होते, हे समजण्यास मार्ग नाही. २०१३ सालापासून काँग्रेसच्या राजकीय अवनतीला सुरुवात झाली. २०१४ सालच्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचे संख्याबळ ५० पर्यंतदेखील पोचले नव्हते. तत्पूर्वी २०१३ साली दिल्ली विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचा पराभव झाल्यानंतर राहुल गांधी यांनी आता केली अशीच राणाभीमदेवी घोषणा केली होती. ती म्हणजे 'आपण काँग्रेसमध्ये असे परिवर्तन घडवून आणू ज्याची कोणी कल्पनाही केली नसेल.' प्रत्यक्षात तसे काही घडले नाही आणि आताही गुजरातेत काही घडेल याची चिन्हे कमीच. याचे कारण पक्षातील कथित घरभेद्यांना बाहेरचा रस्ता दाखविणे हा एक भाग झाला; पण त्याने पक्षाची संघटना मजबूत होते असे नाही. त्यासाठी पक्षाचे राष्ट्रीय स्तरावरील नेतृत्व सक्रिय असायला लागते; शिवाय प्रादेशिक स्तरावर संघटन मजबूत असणे आवश्यक असते. काँग्रेस नेतृत्वाला हे दोन्ही साधलेले नाही. गुजरातेत राहुल गांधी पक्षातील घरभेद्यांना इशारा देत असतानाच हरयाणामधील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे निकाल जाहीर झाले. तेथे काँग्रेसच्या वाट्याला पुन्हा अपयश आले. तेव्हा गुजरातेत राहुल गांधी यांनी केलेले विधान किती तकलादू आणि तात्कालिक आहे, हेच अधोरेखित झाले. पक्षात खरोखरच बदल करण्याची राहुल गांधी यांची मानसिकता असती तर हरयाणात त्याचा प्रत्यय आला असता. तसे घडले नाही.

गेल्या वर्षी झालेल्या लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्र, हरयाणा या राज्यांत भाजपाला धक्का बसला होता. विशेषतः हरयाणात काँग्रेसने एकूण जागांपैकी निम्म्या जागा जिंकल्याने आता भाजपाची घसरगुंडी सुरू झाल्याच्या आविर्भावात काँग्रेस नेते आणि राहुल गांधी होते. पण लोकसभा निवडणुकीनंतर काहीच महिन्यांत झालेल्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला पराभवाचा सामना करावा लागला आणि त्या पक्षाचा मुखभंग झाला. त्या पराभवानंतर काँग्रेसने हरयाणात संघटनात्मक बदल केले हे खरे; पण तेही यशस्वी ठरलेले दिसत नाहीत. त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे त्या पक्षाच्या केंद्रीय नेतृत्वापाशी असलेला सातत्याचा अभाव आणि नेमक्या दृष्टीची वानवा. सभेत टाळ्याखाऊ वाक्ये फेकणे निराळे; कठोर निर्णय घेण्याचा आभास निर्माण करणे वेगळे आणि प्रत्यक्षात जमिनीवरील परिस्थितीचे भान ठेवून पक्ष संघटनेत चैतन्य उत्पन्न करणे निराळे. काँग्रेसने महाराष्ट्रात प्रदेशाध्यक्षपद हर्षवर्धन सपकाळ यांना दिले. कार्यकर्ते म्हणून सपकाळ कदाचित उत्तम असतीलही; पण समोर भाजपा, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसया पक्षांचे तगडे आणि मुरब्बी नेते असताना सपकाळ यांचा निभाव लागणार का हा प्रश्न उरतोच. प्रयोग म्हणून काँग्रेसने वलयांकित नावांना फाटा देऊन अपरिचित नावाला आणि बहुधा सत्तास्थानाची महत्त्वाकांक्षा (की क्षमता?) नसलेल्या कार्यकर्त्याकडे प्रदेश संघटनेची धुरा सोपविली असेलही; पण केंद्रातून नेमके दिशादिग्दर्शन होणार नसेल तर सपकाळ तरी काय करणार?



जे महाराष्ट्रात तेच हरयाणात. बी. के. हरिप्रसाद यांना काँग्रेसने हरयाणा प्रभारी नेमले खरे; तथापि त्यांच्यादेखील मर्यादा आहेत. हरिप्रसाद यांना अनुभव आहे; पण त्यांनीही नवीन जबाबदारी स्वीकारताना पक्षातील उणिवांवर उपाय शोधण्याचे सुतोवाच करण्याऐवजी निवडणूक प्रक्रिया पारदर्शी हवी इत्यादी मुद्दे मांडले. त्याने पक्ष नेतृत्वाची मर्जी ते संपादन करू शकतीलही; पण संघटन मजबूत करू शकतीलच असे नाही. हरयाणा काँग्रेसमध्ये भूपिंदर सिंह हुड्डा यांचा प्रभाव आहे, पण पक्षाला गटबाजीने ग्रासले आहे. शैलजा आणि रणदीप सुरजेवाला हे गांधी कुटुंबाच्या मर्जीतील; पण हुड्डा यांना बाजूला ठेवून शैलजा किंवा सुरजेवाला यांच्या पारड्यात गांधी कुटुंब निःसंदिग्धपणे वजन टाकू शकलेले नाही. याचे कारण, तसे केले तर हरयाणात काँग्रेसचा पुरता बोजवारा उडेल, ही भीती आहे. विधानसभा निवडणुकीच्या वेळी राहुल यांनी शैलजा आणि सुरजेवाला यांना पाठबळ दिले होते; पण हुड्डा यांना नाराज न करता. निवडणुकीतील पराभवानंतर सगळीच समीकरणे बदलली. विधानसभेत विरोधी पक्षनेता काँग्रेसला अद्याप निवडता आलेला नाही. हुड्डा यांना नाराज करून काहीही शक्य नाही, याची जाणीव असणारे आणि त्यामुळे तो धोका स्वीकारण्याची धमक दाखवू न शकलेले राहुल गांधी गुजरातेत मात्र पक्ष संघटनेतील घरभेद्यांना बाहेर काढण्याची भाषा करतात हा हास्यास्पद विरोधाभास आहे.

कठोर निर्णय घ्यायचे तर त्याची सुरुवात शीर्षस्थ नेतृत्वापासून व्हायला लागते; तर संघटनेतील अन्य स्तरांवर ती कार्यशैली झिरपते. संघटनेच्या बांधणीवर भर द्यायच्या ऐवजी रोज उठून भाजपा आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर आगपाखड करण्यात वेळ आणि ऊर्जा खर्च होत असल्याने काँग्रेसचे पक्ष संघटन अधिकाधिक विस्कळीत होत आहे. त्याचाच परिणाम हरयाणात काँग्रेसला बसलेला दणका. महापौरपदाच्या निवडणुकीत १० पैकी ९ शहरांत भाजपाने बाजी मारलीच; पण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका असूनही विजयी उमेदवारांचे मताधिक्य लक्षणीय होते. गुरुग्राम येथे काँग्रेसची सत्ता होती; तेथे भाजपा उमेदवाराने काँग्रेसच्या उमेदवाराचा पावणेदोन लाखांच्या मताधिक्याने पराभव केला. २०२४ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी अंबालाच्या महापौरांनी (हरयाणा जनचेतना पक्ष) आणि सोनिपतच्या महापौरांनी (काँग्रेस) भाजपामध्ये प्रवेश केला होता. दोघे आमदार झाले. आताच्या पोटनिवडणुकीत त्या दोन्ही ठिकाणी भाजपाला विजय मिळाला आहे.विधानसभा निवडणुकीतील पराजयानंतर काँग्रेसला यशाने पुन्हा हुलकावणी दिली आहे. वास्तविक स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतूनच पक्ष संघटनेचा पाया भक्कम होत असतो. किंबहुना पक्ष किती तळागाळात पोहोचला आहे, याची तीच परीक्षा असते.भाजपाला दूषणे देत राहिल्याने कदाचित आपले नेतृत्व आक्रमक असल्याचे फसवे समाधान मिळत राहील; पण त्याने पक्ष संघटन मजबूत होणार नाही. हरयाणामधील महापौरपदाच्या निवडणूक निकालांचा तो धडा आहे. तेथेही काँग्रेस संघटनेत भाजपाशी सलगी करणारे नेते होते वा आहेत, असा जावईशोध राहुल गांधी लावू शकतील. अपयशाचे खापर फोडण्यासाठी बळीचे बकरे शोधण्यासारखी सोपी गोष्ट नसते.नेतृत्व करणाऱ्याला असला कातडीबचावपणा शोभत नाही!

९८२२८२८८१९

## वेध

विजय निचकवडे

# रेतीची ख्याती अन् नद्यांची माती!

कधी कुणाचं भाग्य फळफळेल, याचा नेम नाही. सध्या भंडारा जिल्ह्यातील रेतीची ख्याती राज्यभर गाजते आहे. तशी 'ती' आहेच चर्चा होण्यासारखी, पण होणारी चर्चा केवळ एकाच दिशेने जात असेल आणि महत्त्वाच्या मुद्याकडे दुर्लक्ष होत असेल तर ही ख्याती काय कामाची? आम्हाला महसूल, गुन्हेगारी, रोजगाराचे पडले आहे, नक्कीच हे दुर्लक्षित करण्यासारखे नाही, पण पर्यावरणाच्या होणाऱ्या ऱ्हासावर कुणीच न बोलणे जरा धाडसाचे वाटते. रेती जिल्ह्यातील असली तरी व्याप्ती राज्यभर असल्याने पर्यावरणप्रेमींचा जिव्हाळा दिसायलाच हवा!

निसर्गाने दिलेले सर्वकाही आमचेच, हा आविर्भाव कायम आमच्यात असतो. म्हणूनच तर निसर्गदत्त सगळ्या गोष्टींवर आमचा अधिकार आम्ही गाजवितो. पण हे करताना निसर्गाकडून घेताना, आपलेही त्याप्रती काही घेणे-देणे लागते, याचा विचार कधीच आमच्या मनाला शिवत नाही. आपल्याला निसर्गाकडून कसे ओरबाडता येईल, याचाच विचार कायम आम्ही करीत असतो. भंडारा जिल्ह्यातील रेती ही निसर्गाची अनमोल अशी देणगी आहे. वैनगंगा नदीच्या पात्रातील रेतीला राज्यभर प्रचंड मागणी आहे. ती एवढी की, तिची चोरी करून कोट्यवधी रुपये कमविण्याची शक्कल तस्करांनी शोधून काढली. रेतीची चोरी, अवैध वाहतूक, शासनाचा बुडणारा महसूल अशा सर्व गोष्टींवर रेती विषय आला की चर्चा होते. सुरू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनातही रेती हा विषय विरोधकांकडून चघळला गेला. सभागृहात रेतीच्या विषयावर चर्चा होत असेल तर रेतीची ख्याती किती, याची कल्पना येऊ शकते. कारण हीच रेती गावापासून शहरापर्यंत अनेकांना लक्ष्मीदर्शनाचा योग जुळवून आणते.



अधिवेशनात रेती पोहोचली. वाटलं होतं, चोरी-महसूल यासोबतच पर्यावरणाचा होणारा ऱ्हास यावरही विषय उजागर होतील; पण तसे झाले नाही. कोण किती पैसे घेतो, कोणत्या अधिकाऱ्यापासून कुणापर्यंत कमिशन पोहोचविले जाते. कोण अधिकारी रेती अवैध तस्करीत अधिक सक्रिय असतो, अशा अनेक विषयांवर चर्चा झाली. पण आमची जीवनदायिनी वैनगंगा संपते आहे, त्यावर कुणी बोलले नाही. सत्ताधारी असो वा विरोधक कुण्याही लोकप्रतिनिधीच्या तोंडून अवैध रेती उत्खननामुळे होत असलेली नदीची दुरवस्था सभागृहापुढे आली नाही. निसर्ग मागत नाही, बोलत नाही म्हणून त्यासाठी काहीच करायचे नाही, असा निर्धार आम्ही केला आहे का हो? असं असेल तर नदीजोड प्रकल्प, जलस्रोतांचे संवर्धन, पर्यावरण ऱ्हास थांबविण्यासाठी उपाययोजना करण्याचे सोंग घेण्याची गरज काय?

अवैध वाहतूक आणि चोरीने नक्कीच शासनाचा महसूल बुडतो आहे; सोबतच नदीत खोदले जाणारे खड्डे, क्षमतेपेक्षा अधिक काढली जाणारी रेती यामुळे नद्यांचे रंग-रूप बदलून त्यांची दैनावस्था होत आहे. प्रवाहित असलेल्या नद्या डबक्यांप्रमाणे झाल्या आहेत. नदीतील वाळूमुळे प्रवाहित राहणाऱ्या पाण्याचा वेग कमी होऊन भूजल पातळी वाढते; मात्र अधिकच्या उपशाने हे शक्य होत नाही. नदीत वाळूमुळे जैवविविधता निर्माण होते, जी उपशामुळे बाधित होते. परिणामी यावर अवलंबून राहणाऱ्या पशुपक्ष्यांचा आधार संपतो. अधिकचा उपसा पाण्याचा वेग वाढण्यास व नंतर पात्राचा आकार आणि वळण बदलण्यास कारणीभूत ठरते. परिणामी पावसाळ्यात पुराचा धोकाही वाढतो. एकंदरीच मोठ्या प्रमाणावर होणारा वाळूचा उपसा, नदीत यंत्राच्या मदतीने पाडले जाणारे खड्डे वनस्पती, कीटक, पाण्यातील जीव आणि मानवांसाठी घातक आहे. आम्ही केवळ आर्थिक नुकसानीचा विचार करतो. लोकप्रतिनिधींनाही आर्थिक नुकसानीचे तेवढे कौतुक आहे. विधानसभेत हीच गोष्ट स्पष्ट झाली. कारण पर्यावरणाचा ऱ्हास आणि नद्यांचे होणारे नुकसान यावर एकालाही बोलावेसे वाटले नाही. आज निसर्गाप्रती आमची हीच संवेदना असेल तर भविष्यात आजपेक्षाही विदारक स्थितीला सामोरे जावे लागेल. प्रचंड प्रमाणात वाढणारे तापमान, बदललेले ऋतुचक्र या सर्व गोष्टी निसर्गाप्रती आपल्या कर्तव्याची आठवण करून देणाऱ्या आहेत. आर्थिक नुकसानीसाठी नक्कीच आवाज उठवायला हवा, पण पर्यावरण राखणे आपली जबाबदारी आहे, हे विसरून वागणार असाल तर एक दिवस नद्या या नकाशावर दाखविण्यासाठीच शिल्लक राहतील. आणि हो, लोकप्रतिनिधी जर समजत नसतील तर त्यांना जाणीव करून देण्याची जबाबदारी ही आपलीच आहे, हे आपणही विसरायला नको!

९७६३७१३४१७

## धर्म-संस्कृती

# मरण साखरझोपेतच आलं पाहिजे!

प्रा. दिलीप जोशी

महाकवी कालिदासांनी रघुवंशात 'मरणं प्रकृतिः' म्हटले आहे. म्हणजे मरण ही प्रकृती आहे. जन्माला आलेला जीव एक दिवस मरणारच; त्यामुळे मरण हेच शाश्वत सत्य आहे. आपल्याला मात्र या शाश्वत सत्याचा कायम विसर पडलेला असतो. यक्ष प्रश्नातही हाच प्रश्न यक्षाने धर्मराज युधिष्ठिराला विचारला आहे. त्यावर धर्मराजाचे उत्तर हेच सांगते.

**अहन्यहनि भूतानि गच्छन्तीह यमालयम्? ।**
**शेषाःस्थावरमिच्छन्ति किमाश्चर्यमतः परम्? ।**

दररोज अनेक भूतमात्र यमाच्या दारात जातात; तरीही उर्वरित आपण सर्व आपण मरणारच नाही, या भ्रमात असतात. जीवन सुखी करण्याच्या नादात आपले मरणाकडे लक्षच नसते. एखाद्या गावाला जाताना आपल्याला गंतव्याकडे नेणारी एखादी गाडी म्हणजे गंतव्य नव्हे, स्थान आल्यावर उतरावेच लागते त्या गाडीतून. पण आपण त्या देहरूपी गाडीत जीव अडकून बसलेलो असतो. आपण मग्न आणि मिथ्याभ्रमात असतो संसाराच्या. जिवाचे गंतव्य स्थान असलेल्या मरणाकडेही लक्ष असावे. मरण नैसर्गिक किंवा अकाली येऊ शकते. ते केव्हा येईल, हेही आपल्याला माहीत नसते. पण एक दिवस येणारच हे सर्वांना माहीत असते. तसं तर मरण कुणालाच नको, पण अमरपट्टा कुणाजवळच नाही. मरण येणारच आहे. नेमका त्याचा विसर पडतो आणि सुटतो स्वैर आपण. येणारे मरण सुखात येणे महत्त्वाचे. मरण सहज येणे आणि जरा दुःखात येणे यात फरक आहेच की!

साखरझोपेत येणारे मरण आपल्या सत्कर्माने येते. साखरझोप तेव्हाच येते जेव्हा आपण आनंदी, ताणतणावमुक्त, दडपणविरहित आणि भीतिमुक्त असतो. असे जगण्यासाठी ऐश्वर्याचा विवेक आणि उपभोगविषयक संतुष्टी हवी. हावरटपणाच्या नादात बहुतेक माणसे सहज मरणापेक्षा मरणयातनेला तयार असतात; पण त्यांना मरण नको असते. असे जीवन काय कामाचे? खरं सांगू, मरण साखरझोपेतच आले पाहिजे. आजकाल बहुतेकांची साखर रक्तात असते त्यामुळे त्यांना साखरझोप येतच नाही. नवीन पिढीला साखरझोप माहीतही नसेल. साखरझोप म्हणजे निश्चिंत गाढ झोप. अशी साखरझोप आहे आपल्या जीवनात? बहुतेक सर्वांचे उत्तर नकारघंटाच असेल. अशी साखरझोप येण्यासाठी तणावमुक्त जीवन असावे लागते. त्यासाठी दिवसभर ईमानदार राहावे लागते. सत्य आणि सकारात्मक वैचारिक अधिष्ठान लागते. मग त्याला पडल्या पडल्या गाढ झोप लागते. तिला म्हणतात साखरझोप!

का दूर पळते साखरझोप आपल्यापासून? आपण माणसे अशीच आहोत! विनाकारण पंचायती करायच्या, ज्याच्याशी आपली काहीही संबंध नाही अशा नको त्या ठिकाणी नाक खुपसायचे आणि अकारण ताणतणाव ओढवून घ्यायचा. ताण आला की मेंदू थकतो. मेंदूची क्षमता नष्ट झाली की प्रश्नांची उत्तरे मिळत नाहीत. प्रश्नांचा गुंता वाढतच राहतो. त्याचा परिणाम जेवण आणि झोपण्यावर होतो. रात्रभर मोबाईल! मग कसली आली साखरझोप? आपण आपल्याच हाताने तशी परिस्थिती ओढवून घेतो. दुसऱ्याच्या जीवनात सुख आले तर त्याचा आपल्या जीवनावर परिणाम होण्याचे काहीच कारण नाही. पण विनाकारण ईर्ष्या, जळाऊ वृत्ती आपल्या अंगात येते. त्याच्या सुखाने आपल्याला दुःख होते. बेचैनीमुळे रात्री मग या कडेवरून त्या कडेवर. कसली आली हो साखरझोप?

दुसऱ्याच्या जीवनातील घटनेने आपल्या जीवनात सुख किंवा दुःख येणे हा आपला नसता आगाऊपणा आहे, पण तो होतो हे सत्य आहे. तुमच्या मनाविरुद्ध कोणी तुम्हाला बोलले, तुमची निंदा केली, तुमच्या विरोधात काही कृती केली. त्यामुळे आपण खूपच अस्वस्थ असतो. एक तर समोरच्याशी संवाद साधा, त्याला धडा शिकवा किंवा त्याला सोडून द्या. शास्त्रात याला कर्म, विकर्म आणि अकर्म म्हणतात, पण हिंमत नसल्याने प्रश्न जिवंत ठेवतो आपण. आपल्यावर भिरकावलेले दगड परत त्यांच्यावर भिरकावता आले पाहिजेत अन्यथा तेच दगड वापरून आपल्या घराची भिंत बांधता आली पाहिजे. आपल्याजवळ दोन्हीही नाही. आयुष्यभर अस्थिर आणि अशांत आहोत आपण. मग कुठे येणार साखरझोप?

आपण राहतो तो परिसर, आपण जिथे व्यापार-नोकरी करतो ती आस्थापना, मित्रमंडळ, संस्था-संघटना, आपले सगेसोयरे आणि आपले कुटुंब या अधिवासात सभोवती माणसेच असतात. आपला संबंध यांच्याशीच येणार आहे. लक्षात ठेवा! परग्रहाहून कोणी एलियन नाही येणार आपल्या जीवनात. त्यातल्या त्यात काही मित्र बदलता येतील, पण शेजारी आणि सोयरा तर निश्चित आहे. तो बदलता येत नाही. आपल्या सोबत असलेल्या सर्व माणसांचे वर्तन आपल्यावर परिणाम करीत असते. वर्तन बरे असेल तर उत्तमच, पण नसेल तर चिंता वाढते. अशावेळी गोष्ट सोडून द्यायचे कौशल्यही प्राप्त करून घेता आले पाहिजे. अनुल्लेखाने टाळा, हसण्यावर घ्या किंवा त्याच्यापासून अंतर राखून वर्तन करा. मग पाहा कालांतराने लक्षात येईल की, संपात समस्या आपल्या जीवनातील आनंद हिरावून घेण्याइतपत नव्हतीच मुळी. आपला मनोविकार अशांती आणि ताणतणावाला आवतन देतो; मग कसली साखरझोप? अजून सांगू! 'सत्यमेव झोंबते!' पण सांगतोच. तुम्ही अंधारात कसे वागता? याचा चारित्र्य म्हणतात. आपण अंधारात कसे आहोत आणि उजेडात कसे वागतो, याचा विचार करा एकदा. आपण बहुतांश सगळे अंधारात आणि उजेडात व्यस्त प्रमाणात आहोत. आपण जे नाही ते दाखवण्याचा प्रयत्न करतो उजेडात. तो मुखवटा (पर्सोना) फाटण्याची भीती आपल्या तणावाचे महत्त्वाचे कारण ठरते. मग कसली येते साखरझोप?

आपल्यापैकी सर्वांनाच मरणाची भीती कायम सतावते. माझं कसं होईल? माझ्यानंतर कसे होईल? असे अनेक निरर्थक प्रश्न कायम घर करून असतात. लक्षात ठेवा, जन्माला आल्यापासून मृत्युबिंदूपर्यंत जीवन असते. मृत्यू ही प्रकृती आहे. मरण हमखास येणारच आहे. तोपर्यंत आनंदात जगायचं. आपले गंतव्य मोक्षप्राप्ती आहे. मोक्ष मिळण्यासाठी जे जे करावे लागते ते ते केले पाहिजे. त्यासाठी परमार्थाला पूरक स्वार्थ, परमार्थ विवेकाला पूरक संसार असावा. जन्म-दुःख,जरा-दुःख आणि नित्य-दुःख असतातच, पण त्यावर मातही करता यावी. शरीर सुदृढ आहे तोपर्यंतच आनंद अन्यथा परावलंबन कठीण आहे. आयुष्यभर सत्यमार्ग हवा. पापाचा पैसा कमवायचा, वाममार्गाने आणि भ्रष्ट मार्गाने संपत्ती जमवायची म्हणजे यातनामय मरणाला आमंत्रण आहे. तसेही वाममार्गाने आलेला पैसा वाममार्गानेच जातो. नीतीने वागणे, खरे वागणे, दुराचार आणि भ्रष्टाचाराला थारा न देणे हेच पुण्य आहे. दुसऱ्याच्या जीवनात विनाकारण डोकावणे, आपला फारसा संबंध नसताना कोणत्याही गोष्टीचा त्रास करून घेणे बंद केले पाहिजे.

'कर नाही तर डर कशाला' हे आपण नेहमीच म्हणतो. ते शक्य आहे. केवळ पोट आणि पोटाखालच्याच भागाचा विचार माणसाला पशू बनवते, पण त्यासोबतच पोटाच्या वर एक हृदय आहे; त्याला मन म्हणतात. त्याच्याही वर एक मेंदू आहे; त्याला बुद्धी म्हणतात. मन आणि बुद्धी हे माणसाचे लक्षण आहे. आपण चारित्र्यसंपन्न मनुष्य म्हणून वागण्याचा प्रयत्न करणे हा कर्तव्यभाव ठेवा. खर सांगू! साखरझोपेत मरण त्यालाच येते जो आयुष्यभर खऱ्या अर्थाने माणूस म्हणून जगतो. म्हणून म्हणतो की, मरण तर साखरझोपेतच आलं पाहिजे!

९८२२२६२७३५

## वाचक पत्रे

### शांतता आणि एकता महत्त्वाची

शांतता आणि एकता या दोन्ही मूल्ये समाजाच्या प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. शांतता आपल्याला स्थिरता आणि सुरक्षितता देते, तर एकता विविधता असूनही लोकांना एकत्र ठेवते. शांतता म्हणजे केवळ युद्धाचा अभाव नसून, ती मानसिक, सामाजिक आणि आंतरराष्ट्रीय स्थिरतेचा एक भाग आहे. व्यक्तिगत जीवनात शांतता असेल तर समाजही आनंदी आणि सुरक्षित राहतो. शांतता टिकवण्यासाठी सहिष्णुता, समजूतदारपणा आणि संवाद महत्त्वाचे असतात. एकता म्हणजे विविधतेत सामंजस्य आणि एकोप्याने राहणे. जात, धर्म, भाषा किंवा प्रदेश वेगळे असले तरी आपल्यात एकता असेल, तर समाज आणि देश दोन्ही प्रगती करू शकतात. एकता लोकांमध्ये परस्पर सहकार्य आणि प्रेम वाढवते.

शांतता आणि एकता कसे टिकवावे? सहिष्णुता वाढवा, प्रत्येकाच्या मतांचा आदर करा आणि कोणत्याही प्रकारच्या भेदभावाला प्रोत्साहन देऊ नका. संवाद साधा, समस्या आणि गैरसमज टाळण्यासाठी खुलेपणाने चर्चा करा. शिक्षण आणि जागरूकता योग्य शिक्षण आणि सामाजिक जबाबदारी यामुळे समाज अधिक सुसंस्कृत होतो. परस्पर मदतीच्या वृत्तीमुळे समाजात ऐक्य आणि शांतता निर्माण होते. शांतता आणि एकता या दोन्ही मूल्ये समाजाच्या आणि देशाच्या विकासासाठी अत्यंत आवश्यक आहेत. जर आपण हे दोन घटक आपल्या जीवनाचा भाग बनवले, तर एक सुरक्षित, प्रगत आणि आनंदी समाज निर्माण होऊ शकतो.

**श्रीकांत संभाजी मगर**/९६८९११७१६९

### राज्याच्या विकासाला चालना देणारा अर्थसंकल्प

नुकताच राज्याचे उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत सादर केलेला राज्याचा अर्थसंकल्प हा राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी चालना देणारा आहे. एक ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेसाठी राज्यातील भांडवली गुंतवणूक मोठ्या प्रमाणात वाढविण्यात येत आहेत. राज्यातील विविध सार्वजनिक उपक्रम, विशेष हेतू कंपन्या आणि महानगरपालिका यांच्या माध्यमातून पायाभूत सुविधांचे प्रकल्प कालबद्धरीत्या पूर्ण करण्यावर अधिक भर देणार असल्याचे म्हटले आहे. यामुळे राज्याच्या अर्थव्यवस्थेला मोठी गती आणि रोजगार निर्मितीसाठी राज्य सरकारने पायाभूत सुविधांकडे अधिक लक्ष देता येऊ शकेल. पायाभूत सुविधांसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग व महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळामार्फत विविध रस्ते विकास प्रकल्पांद्वारे भरीव भांडवली गुंतवणूक केल्याचे दिसते. पण यापूर्वी मान्यता दिलेल्या व प्रगतिपथावर असलेल्या पायाभूत सुविधा प्रकल्पांची पूर्तता निर्धारित कालावधीत पूर्ण होणे आवश्यक आहे. अर्थसंकल्पात राज्यातल्या गरीब, मध्यमवर्गीय, सर्वसामान्य जनतेच्या सर्वांगीण विकासासाठी अधिक भरीव तरतुदीची गरज आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी, विद्यार्थिहित आणि शिक्षणाचा दर्जा उंचाविण्यासाठी या अर्थसंकल्पात भरीव तरतूद केली आहे. समृद्ध महाराष्ट्राची वाटचाल, प्रगतीचा, विकासाचा ध्यास आणि विकसित महाराष्ट्र घडविण्यासाठीचा यंदाचा अर्थसंकल्प उपयुक्त ठरू शकतो. मागील अडीच वर्षात जो शाश्वत विकास आणि सर्वांगीण विकास झाला होता, त्याला अधिक बळकटी देणारा हा अर्थसंकल्प आहे. हा अर्थसंकल्प राज्याला विकासाच्या मार्गावर पुढे नेणारा आहे. यामध्ये पायाभूत सुविधांच्या निर्मितीवर अधिक लक्ष केंद्रित केले आहे. यंदाच्या अर्थसंकल्पामुळे राज्यातील युवा पिढीच्या कौशल्य विकासात भरीव वाढ होऊ शकेल. कौशल्याधारीत अर्थव्यवस्थेच्या दिशेने पुढे जाऊ शकेल. पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या तरतुदींमुळे वेगवान आर्थिक वाढ होईल. यामुळे दळणवळण यंत्रणा वाढवून व्यापारी आणि आर्थिक विकास होऊ शकेल.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

### महापुरुषांच्या सन्मानार्थ अर्थसंकल्पात भरीव योगदान

महाराष्ट्राचे अर्थमंत्री अजित पवार यांनी राज्याचा अर्थसंकल्प सादर केला. त्यात आग्रा येथे छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक, संगमेश्वर येथे छत्रपती संभाजी महाराजांचे स्मारक, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे स्मारक तसेच मुंबई येथे भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांचे स्मारक अर्थसंकल्पात प्रस्तावित आहे.

राज्य सरकारने आपल्या अर्थसंकल्पात या महापुरुषांच्या सन्मानार्थ जे भरीव योगदान दिल आहे, ते स्वागतार्हच आहे. सोबतच अजित पवार यांनी ३ ऑक्टोबर हा मराठी अभिजात भाषा सन्मान दिवस म्हणून साजरा केला जाईल ही घोषणा केली. मराठीस अभिजात भाषेचा सन्मान दिल्यानंतर आता ३ ऑक्टोबर हा सन्मान दिवस म्हणून साजरा केला जाणार आहे. सरकारच्या या निर्णयाने मराठी भाषिकांमध्ये आनंद व उत्साह पसरला आहे. मराठी भाषेच्या सन्मानार्थ सरकारचा निर्णय स्वागतार्ह आहे.

**अखिल देशपांडे**/अकोला

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

## क्राईम वृत्त

### वडजीत विजेच्या धक्क्याने शेतकरी जखमी

**सोलापूर, दि.१८ मार्च-**
दक्षिण सोलापूर तालुक्यातील वडजी येथील शेतात एम ईसीबीच्या डिपीचे कनेक्शन तपासताना, विजेचा धक्का लागून शेतकरी जखमी झाला. हा प्रकार १७ मार्च रोजी सायंकाळी ४.३० वाजता घडला. सोमेश्वर अशोक कुंभार (वय २४) असे जखीम झालेल्या तरूण शेतकऱ्याचे नाव आहे. तो उडून पडल्याने जखमी झाला त्याला उपचारासाठी काका परमेश्वर कुंभार यांनी सोलापूर येथील शासकीय रूग्णालयात दाखल केले आहे. याची नोंद सिव्हील पोलिस चौकीत झाली आहे.

### दारूच्या नशेत स्वत:ला ब्लेडने मारून केले जखमी

**सोलापूर, दि.१८ मार्च-**
उत्तर सोलापूर तालुक्यातील नान्नज येथे दारूच्या नशेत तरूणाने स्वत:च्या गळ्यावर व हातावर ब्लेडने वार करून स्वत: ला जखमी केले . हा प्रकार १७ मार्च रोजी सायंकाळी ५ वाजता घडला. प्रधुम्न शिवराम जाधव (वय २८) असे जखमी झालेल्या तरूणाचे नाव आहे. प्रधुम्न याला उपचारासाठी बहिण संगिता फुलमाळी यांनी सोलापूर येथील शासकीय रूग्णालयात दाखल केले आहे. याची नोंद सिव्हील पोलिस चौकीत झाली आहे.

### मोटारसायकल घसरून झालेल्या अपघातात तरूण जखमी

**सोलापूर, दि.१८ मार्च-**
अक्कलकोट येथील ए-वन चौकाकडून स्वामी समर्थ मंदिराकडे जात असताना अक्कलकोट सरकारी दवाखान्या समोर दुचाकी घसरून झालेल्या अपघातामध्ये तरूण जखमी झाला. हा अपघात १७ मार्च रोजी रात्री ९ वाजण्याच्या सुमारास घडला. सुनिल शिवलिंगप्पा बिराजदार (वय २७ रा. शिवसमर्थ अक्कलकोट स्टेशन रोड, सोलापूर) असे जखमी झालेल्या तरूणाचे नाव आहे. सुनिल बिराजदार याला अक्कलकोट येथील सरकारी दवाखान्यातून पुढील उपचारासाठी भाऊ आनंद बिराजदार याने सोलापूर येथील शासकीय रूग्णालयात दाखल केले आहे.

### घरगुती वादातून महिलेचा आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि.१८ मार्च-**
दक्षिण सोलापूर तालुक्यातील तांदुळवाडी येथील राहत्या घरी घरगुती वादातून विवाहीत तरूणीने विषारी औषध प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला. हा प्रकार १७ मार्च रोजी रात्री ९ वाजता घडला. रेणूका नागनाथ चौधरी (वय २५) असे तरूणीचे नाव आहे. त्यांना उपचारासाठी पती नागनाथ यांनी सोलापूर येथील शासकीय रूग्णालयात दाखल केले आहे. याची नोंद सिव्हील पोलिस चौकीत झाली आहे.

### पैशाच्या कारणावरून तरूणास बेदम मारहाण

**सोलापूर, दि.१८ मार्च-**
उत्तर सोलापूर तालुक्यातील नान्नज येथील मोहिते वाडी येथे पैशाच्या कारणावरून सात जणांनी केबल वायरीने व काठीने केलेल्या मारहाणीत तरूण जखमी झाला. ही मारहाण १७ मार्च रोजी सायंकाळी ७.३० वाजण्याच्या सुमारास घडला. अभिजित ज्ञानेश्वर यादव (वय १९) असे जखमी झालेल्या तरूणाचे नाव आहे. त्याला वडील ज्ञानेश्वर यांनी खासगी दवाखान्यातून पुढील उपचारासाठी सोलापूर येथील शासकीय रूग्णालयात दाखल केले आहे.

# सिमेंट मिक्सरसह ट्रक, टेम्पोची जडवाहतूक बिनबोभाट

## अपघाताच्या मालिकेनंतरसुद्धा शहरात जड वाहतुकीला कोणतेही निर्बंध नाहीच

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१८ मार्च-**
शहरातील स्मार्ट रस्त्यांवर जड वाहतूकीचे प्रमाण काही केल्या कमी होताना दिसत नाही. अपघाताचे प्रमाण वाढत असताना देखील प्रशासन मात्र मूग गिळून गप्प बसलेले आहेत. अक्कलकोट रोड अपघाताचे केंद्र ठरत आहे. त्याच पद्धतीने शहरातील विविध प्रमुख महामार्गावर अनेक दुर्देवी घटना घडत आहेत. यासाठी शहरातील जड वाहतूक कारणीभूत ठरत आहे. भरदिवसा शहरात सर्रासपणे सुरू असलेल्या या जड वाहतुकीला आळा घालण्याची गरज आहे.



सोलापूर : व्हीआयपी रोडवर धूर सोडणाऱ्या टेम्पोमधून डस्टची बिनधास्तपणे जड वाहतूक सुरूच आहे. (छाया - केवल तिवारी)

दरम्यान, शहरात दिवसा जड वाहतूकीला बंदी असताना असताना, देखील नियम पायदळी तुडवले जात आहेत. वारंवार जड वाहतूक शहरातील रस्त्यांवरून केली जात आहे. सिमेंट मिक्सरसह ट्रक आणि टेम्पोमधून जड वाहतूक सुरूच असल्याने अपघाताला आमंत्रण मिळत आहे. याचा प्रत्यय अक्कलकोट रोडवरील अपघाताच्या मालिकानंतर समोर आला आहे. रस्ता ओलांडताना अपघात होऊन अनेक निष्पाप नागरिकांना आपला जीव गमवावा लागला आहे. अशा घटनांना वेळीच चाप बसावा यासाठी पोलीस प्रशासनाने तात्काळ कारवाई करावी अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. टेम्पोच्या माध्यमातून बांधकामासाठी लागणारे डस्ट, तर सिमेंट मिक्सरमधून सिमेंट कॉंक्रेट तसेच इतर साहित्यांची वाहतूक केली जाते.

त्यावर प्रशासनाचे कोणतेही निर्बंध नाही. शहरात ओव्हरलोड वाहतूक जीवघेणी ठरत असताना प्रशासन मात्र अळीमिळी गुपचिळीची भूमिका घेत आहे. मार्चएंड मुळे वाहतूक शाखेचे पोलीस सर्रासपणे प्रत्येक वाहनधारकांवर दंडात्मक कारवाई करत आहेत.

परंतु दुसरीकडे जड वाहतुकीला निर्बंध घालण्यासाठी कोणतीही उपाययोजना केली जात नसल्याचे दिसत आहे.

### जड वाहतूकीला आळा घालणे गरजेचे

शहराच्या व्ही.आय.पी रस्त्यांवर राजरोसपणे जड वाहतूक बोभाट सुरू असून, याकडे गांभीर्याने पाहणे गरजेचे आहे. शहरात अपघात क्षेत्रात दिवसेंदिवस वाढ होत आहे. अशा परिस्थितीत प्रशासनाने तात्काळ कारवाई करणे बंधनकारक आहे.
**- शेखर क्षीरसागर, वाहनधारक**

### जड वाहतुकीच्या माध्यमातून प्रदूषणात भर

शहरातून होणारे जड वाहतूक प्रदूषणात भर टाकणारी आहे. जुनाट व स्क्रॅप झालेले टेम्पो ट्रक रस्त्यावर धावतात. त्यामधून काळपट धूर बाहेर निघतो, अशा अवस्थेत वाहनधारकांना श्वसनाचे आजार संभावतात. प्रदूषण करणाऱ्या वाहनांवर देखील कारवाई होणे गरजेचे आहे.
**- अश्विन पाटील, व्यवसायिक**

## महापालिकेत महिला महोत्सवाचे आयोजन

# विविध बचत गटांच्या वस्तू प्रदर्शनाचे उद्घाटन

**महिलांना आर्थिक सक्षम बनविण्यासाठी प्रदर्शन : आयुक्त डॉ. ओम्बासे**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ मार्च-**
सोलापूर शहरातील महिला बचत गटांनी विविध वस्तू आणि पदार्थ तयार करून त्या विक्रीच्या माध्यमातून आर्थिक सक्षम होण्याचा प्रयत्न केला आहे. महिला बचत गटांनी तयार केलेल्या या वस्तू आणि पदार्थांना बाजारपेठ मिळावी. या उद्देशातून महापालिकेने हे प्रदर्शन भरविले आहे. शहरवासीयांनी या प्रदर्शनास भेट द्यावी, असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी केले आहे.

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून सोलापूर महानगर पालिका, महिला बालकल्याण विभाग व दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानच्या वतीने १७ व १८ मार्च २०२५ या दरम्यान महापालिकेत आयोजित करण्यात आलेल्या महिला महोत्सव अंतर्गत महिला बचत गटांनी तयार केलेल्या विविध वस्तू आणि पदार्थांच्या विक्री प्रदर्शनाचे उद्घाटन महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या हस्ते करण्यात आले.



### प्रदर्शनात या वस्तू आणि खाद्यपदार्थांची विक्री

या प्रदर्शनामध्ये शहरातील महिलांनी तयार केलेले ड्रेस मटेरियल, शेणापासून बनवण्यात आलेल्या चपलासह विविध वस्तू, गोधडी, साडी , लग्नातील रुकवत साहित्य , कडक भाकरी,शेंगा चटणी, शेंगा पोळी, जवस,कारळ,शेंगा,शेंगा पोळी, धपाटे , सर्व प्रकारचे पापड विक्री, मसाले , तिखट मसाले,खाद्यपदार्थ,हर्बल तेल, झाडू, खराटा, मूर्ती विक्री, कॉस्मेटिक साहित्य , वडा पाव,पाणी पुरी, चायनीज पदार्थ, फ्रुट धपाटे कॉकटेल पेय, मसाले उन्हाळी काम , बिस्कीट,अगरबत्ती,धूप,ज्यूस, गुळ पावडर पुरण प्रीमिक्स नाचणी ज्वारी बिस्कीट हेल्थ ड्रिंक पावडर, हातानी बनवलेले व आरोग्यदायी ताजे, स्वच्छ व चविष्ट खाद्य पदार्थ, सुगंधी वस्तु अगरबत्ती, विविध प्रकारचे मसाले, चटणी व पापड , खाद्यपदार्थ, घरगुती साहित्य, दररोज वापरातील स्वच्छता करिता लागणारे केमिकल साहित्य आदी वस्तूची विक्री प्रदर्शनामध्ये होत आहे. विविध शासकीय योजनांच्या माहितीचे स्टॉल इथे उपलब्ध करण्यात आले आहेत.

यावेळी अतिरिक्त आयुक्त रवि पवार, उपायुक्त तैमूर मुलाणी, उपायुक्त आशिष लोकरे,मुख्य लेखापाल राजरत्न जवळगेकर, सहायक आयुक्त शशिकांत भोसले, गिरीष पंडित, सहा आयुक्त अनिता मगर, नगर अभियंता सारिका आकुलवार, विधान सल्लागार संध्या भाकरे, कामगार कल्याण अधिकारी ओमप्रकाश वाघमारे, युसीडीचे समीर मुलाणी, उज्वला गणेश,डॉ. सुवासिनी वाळवेकर, आरोग्य निरीक्षक अंजली काकडे, मेट्रन संगीता गुरव,क्षमा डबरी आदी मान्यवरांची उपस्थिती होते.

उद्घाटनानंतर आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी या प्रदर्शनाची पाहणी केली. विविध स्टॉलला भेट दिली. महिलांच्या कार्याचे कौतुक केले. या प्रदर्शनात एकूण २४ स्टॉल्स उपलब्ध आहेत. नेटके नियोजन या प्रदर्शनाचे करण्यात आले होते. प्रदर्शनास भेट देण्यासाठी महिलांचा नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. उद्घाटनानंतर प्रतिकात्मक रिंगण सोहळ्यात बोला पुंडलिक वरदे हरी विठ्ठल, श्री ज्ञानदेव तुकाराम, पंढरीनाथ महाराज की जय चा आवाज घुमला.

# अधिकारीच करतात माहिती अधिकार कायद्याचे उल्लंघन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ मार्च-**
सोलापुर जिल्हा सहा.कामगार आयुक्त यांच्याकडून वारंवार माहितीचा अधिकार २००५ कायद्याचे उल्लंघन केला जातो, असा आरोप महाराष्ट्र कामगार सेनेचे प्रदेश अध्यक्ष विष्णू कारमपुरी यांनी सहाय्यक कामगार आयुक्त सोलापूर यांच्यावर केला आरोप आहे.

महाराष्ट्र शासन व बांधकाम कल्याणकारी मंडळ असे संयुक्त विद्यमाने बांधकाम क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांसाठी विविध योजना जाहीर केले आहे. त्या योजनांचा लाभ खऱ्या बांधकाम कामगारांपेक्षा खोटे बांधकाम कामगारच घेत असल्याचे चित्र दिसून येते. कारण आजपर्यंत एकूण दोन लाखच्यावर बांधकाम कामगारांची नोंद झालेली आहे. म्हणून श्री. कारमपुरी यांनी माहितीचा अधिकार कायदा २००५ या कायद्यांतर्गत बांधकाम कामगार आजपर्यंत झालेल्या नोंदीचे संख्या व त्यांची नावे देण्याचे मागणी केली. त्याचबरोबर प्रमाणित ठेकेदारांची माहिती आणि इतर बांधकाम कामगारांसंबंधी माहिती अनेक वेळा मागणी केलेली असता माहिती जाणून बुजून दिले जात नाही. माहितीचा कायदा अधिकार सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालय यांनी देखील एक महिना उलटून गेले तरी माहिती देत नाही. आणि अपील करण्याचे सल्ला देतात यावरून सहाय्यक कामगार आयुक्त व त्यांच्या कार्यालयातील माहितीचा अधिकार अधिकारी माहितीचा अधिकार कायद्याचा उल्लंघन करून त्या कायद्याचा अपमान करीत आहेत असा आरोप श्री. कारमपुरी यांनी केला आहे. याबाबत लवकरच कायद्यानुसार न्यायालयात दाद मागण्यात येईल असेही नमूद करण्यात आले

### साने गुरुजी कथामालेचे अधिवेशन २२ मार्चपासून


**सोलापूर, दि. १८ मार्च-**
अ.भा.साने गुरुजी कथामालेचे ५७ वे वार्षिक अधिवेशन येत्या २२ व २३ मार्च ला दि मोहोमेडन एज्युकेशन सोसायटी, मुस्लिम हॉल, छत्रपती शाहू महाराज पुतळ्या जवळ,दसरा चौक, कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आले आहे.अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत,संपन्न होणाऱ्या या अधिवेशनास, सोलापूर जिल्हा साने गुरुजी कथामालेच्या जास्तीत जास्त सभासदांनी उपस्थित राहावे.अधिक माहिती साठी राष्ट्रीय उपाध्यक्ष प्रा.अशोक म्हमाणे (९४२००८९७८०) यांच्याशी संपर्क साधावा,असे आवाहन कथामाला सोलापूर, शाखेचे अध्यक्ष अशोक खानापुरे यांनी केले आहे.

# घरगुती पक्षाच्या नमुन्याचे आज येणार ‘लॅबमधून रिपोर्ट’

**सहाय्यक आयुक्त डॉ. भास्कर पराडे**

**‘ते’ पक्षी मरण्याचे प्रमाणही घटले**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ मार्च-**
शहरात विविध ठिकाणी कावळे, घार व बगळा मृत्युमुखी पडल्याच्या घटना गेल्या काही दिवसांपासून घडत होत्या. याचे निदान बर्ड फ्लूचे झाले होते. यातील काही पक्षासह घरगुती कोंबड्यांचे काही नमुने घेवून पुणे आणि भोपाळ येथील लॅबला पाठविले होते. त्याचा अहवाल उद्या दि. १९ रोजी येणार आहे. यानंतर पुढील दिशा ठरणार आहे. दरम्यान, यासाठी महापालिका आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांनी तत्काळ केलेल्या विविध उपाययोजनांमुळे सध्यातरी प्रतिबंधित क्षेत्रातील पक्षांच्या मृत्युचे प्रमाण घटले असून, या दोन दिवसांत एकेक पक्षी मृत पावल्याची माहिती पशु चिकित्सालयाचे सहाय्यक आयुक्त डॉ. भास्कर पराडे यांनी दै. तरूण भारतशी संवाद साधताना आज (दि. १८) दिली.



काही दिवसांपूर्वी जास्त पक्षी मृत पावल्यानंतरचा तपासणी अहवाल भोपाळच्या लॅबमधून प्राप्त झाला असून, बर्ड फ्ल्यूमुळेच त्या पक्षांचा मृत्यू झाला असल्याचे स्पष्ट झाले आहे. यानंतर मनपा आणि जिल्हा प्रशासन अलर्ट झाले असून, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी संबंधित अधिकाऱ्यांना घरगुती पक्षी तपासणीचे आदेश दिले होते. यामुळे कर्मचाऱ्यांच्या १४ टीमनी शहरातील विविध भागातून १०० घरगुती कोंबड्यांचे, कबुतरांचे नमुने तपासणीसाठी आणले आहेत. हे सॅम्पलही पुणे आणि भोपाळ येथील लॅबला सोमवारी पाठविण्यात आले होते. त्याचा अहवाल उद्या आल्यावर पुढील कडक उपाययोजना करण्यात येणार आहेत. सध्या सोलापूर मनपा, जिल्हा आरोग्य प्रशासन आणि सर्वच पातळीवर बर्ड फ्ल्युचा नायनाट करण्यासाठी अधिकारी सज्ज झाले आहेत. या पक्षाच्या आजाराची लोकांना लागण होऊ शकणार नाही मात्र नागरिकांनी दक्षता घेण्याची गरज आहे. यामुळे शहरातील विविध तीन ठिकाणे २१ दिवस प्रतिबंधित करण्यात आले आहेत. येथील किल्ला खंदकबाग, श्री सिद्धेश्वर तलाव परिसर आणि धर्मवीर संभाजी महाराज तलाव हा परिसर प्रतिबंधित केला आहे.

जिल्हाधिकाऱ्यांनी आढावा बैठक घेवून सर्व संबंधित विभागांना सतर्क राहण्याचे आदेश दिले आहेत. वन्य पक्षांमध्ये बर्ड फ्लूचा अहवाल पॉझिटिव्ह आला आहे; पण घरगुती कोंबड्या, बदके किंवा इतर पक्षी यांना कोणताही आजार अथवा लागण झाल्याचे निदर्शनास आले नसल्याचेही डॉ. पराडे यांनी सांगितले. सध्या शहरात प्राथमिक खबरदारी घेतली जात आहे. संबंधित तिन्ही ठिकाणी स्वच्छता आणि औषध फवारणी केली जात आहे. आता लॅबचे अहवाल आल्यानंतर पुढील दिशा ठरणार आहे.



# ग्रंथोत्सवाचे यशस्वी आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ मार्च-**
जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, सोलापूर यांच्या वतीने ९ मार्च रोजी सोलापूर ग्रंथोत्सव २०२४ चे आयोजन शिवछत्रपती रंगभवन सोलापूर येथे करण्यात आले होते. या ग्रंथोत्सव सोहळ्याचा उद्धाटन सत्रामध्ये सोलापूर येथील ग्रामीण कथा लेखिका संध्या सूर्यकांत धम ाधिकारी यांच्या ‘बेरं’ या ग्रामीण कथा संग्रहाचे प्रकाशन करण्यात आले. हा प्रकाशन सोहळा साहित्य अकादमी पुरस्कार विजेते देवीदास सौदागर, सुप्रसिद्ध कवी मा. अनंत राऊत, जेष्ठ साहित्यिक शिवाजीराव देशमुख, शालिनी इंगोले ग्रंथालय संचालक, पुणे, जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुनील हुसे, यांच्या हस्ते झाला तसेच या सोहळ्याला डॉ. शिवाजीराव शिंदे सहाय्यक कुलसचिव अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ सोलापूर यांच्यासह अनेक साहित्यिक मान्यवर उपस्थित होते. महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ यांच्या वतीने अनुदानित व सौ. धर्माधिकारी लिखित ‘रकमा’ हा कथासंग्रह प्रकाशित करण्यात आलेला आहे.

# उद्योग व्यावसायाला विद्यार्थ्यांनी प्राधान्य द्यावे : शिवाजीराव पवार

**सोलापूर, दि.१८ मार्च-**
शासकीय सेवेत नोकरीच्या संधी मोठ्या प्रमाणात कमी होत आहे. त्यामुळे प्रत्येक तरुणाला शासकीय नोकरी मिळणे दुरापास्त झाले आहे. कुटुंबाचा आणि आपला आर्थिक विकास साध्य करावयाचा असेल तर तरुणांनी नोकरी पेक्षा उद्योग व्यावसायाला प्राधान्या देणे आवश्यकच आहे. असे प्रतिपादन यशदाचे प्रशिक्षक शिवाजीराव पवार यांनी केले.



महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १७ ते २१ मार्च २०२५ या कालावधीत विद्यापीठाम ध्ये आयोजित प्रेरणा राज्यस्तरीय युवा नेतृत्व शिबिराच्या दुसऱ्या दिवशीच्या व्याख्यानात पवार बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. विकास पाटील उपस्थित होते होते. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. राजेंद्र वडजे व्यासपीठावर उपस्थित होते.

यावेळी शिवाजीराव पवार म्हणाले, प्रत्येक विद्यार्थ्यांने आपल्याला ज्या क्षेत्रामध्ये आवड आहे त्या क्षेत्रात छोटा उद्योग सुरु केला पाहिजे. जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर प्रत्येकाला वेगवेळे प्रश्न भेडसावत असतात. त्यामुळे आजच्या तरुण पिढिसमोर अनेक प्रश्न आहेत. तसा नोकरीचा देखिल प्रश्न आहे. त्यामुळे नोकरीच्या म ागे न लागता वेळेचे भान लक्षात घेवून आणि वास्तवाची जाणीन ठेवून उद्योग व्यावसाय सुरु करणे आवश्यक आहे. त्यासाठी तरुणोनी सेवा क्षेत्र, उत्पादन क्षेत्र आणि प्रक्रिया उद्योगाला प्राधान्य द्यावे असेही शिवाजीराव पवार यांनी स्पष्ट केले.

दुसऱ्या दिवशीच्या पहिल्या सत्रात युवकांचे नेतृत्व आणि पर्यावरण विकास या विषयावर राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वय डॉ. विरभद्र दंडे यांनी मांडणी केली. यावेळी अध्यक्षस्थानी मानवविज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठात डॉ. वसंत कोरे उपस्थित होते. तिसऱ्या सत्रात उमाकांत चनसेट्टी यांनी युवक कार्याच्या संकल्पना या विषयावर मांडणी केली.

कौशल्य विकास आणि रोजगार या विषयावर कौशल्य विकास केंद्राचे संचालक डॉ. प्रभाकर कोळेकर यांनी मांडणी केली.

यावेळी डॉ. कोळेकर म्हणाले, प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये विविध प्रकारचे कौशल्य विकशीत करणे आवश्यक आहे. ज्या विद्यार्थ्यांकडे कौशल्य आहे असेच विद्यार्थी स्पर्धेच्या युगात टिकतात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त कौशल्य विकशित करावी. असे डॉ. कोळेकर यांनी स्पष्ट केले. यावेळी कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. विठ्ठल एडके यांनी केले तर आभार महादेव व्हनकळस यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी एनएसएस विभागाच्या कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

**CHANGE IN NAME**

I Hereby Declare that My Old Name was **MD.KASIM AB.QADAR MUJAWAR,** which has been changed to **MOHAMMAD KASIM ABDUL QADAR MUJAWAR**

**Kindly Note the same**

Gazette No. P-24129724

**CHANGE IN NAME**

I **TABASSUMFIRDOS SAMEER KHAN** (new name) residing at **FLAT NO. 7, PARIJAAT COMPLEX, 158/A, RAILWAY LINES, SOLAPUR - 413001,** do hereby declare that I have changed my (old name) **TABASSUM FIRDOS SAMEER** and in future I would be known by my new name as **TABASSUMFIRDOS SAMEER KHAN.**

**MUNICIPAL COUNCIL ERANDOL, DIST.-JALGAON**
Contact No.: 02588-245022 (Chief Officer/President) : 02588-244401(Office)
Fax No. : 02588-243067
E-Mail : mnc_erl.001 @rediffmail.com / mcerandol@gmail.com
Add : Main Road, Erandol, Dist.-Jalgaon (Maharashtra) 425109

**O/w No./PWD/32/2024-25** **Dated: 18/03/2025**

**(OPEN TENDER NOTICE)**

1. Refer to open tenders Id 2025_DMA_1162094_1 published on 19th March, 2025.
2. Please visit the website at **https://mahatenders.gov.in** for further details.
3. Due date for submission of quotation and opening of tenders is amended as follows:

| | | |
|---|---|---|
| Due date of submission of Quotations | 03/04/2025 | Time: 12.00 PM (IST) |
| Pre-Bid Meeting | 28/03/2025 | Time: 11.00 AM (IST) |
| Opening of Tenders | 04/04/2025 | Time: 12.00 PM (IST) Onwards |

4. Attendance of bidders should be compulsory at the time of Pre-bid meeting.
5. There are no other changes in the terms and conditions of the open tender notice.

**(Amol Prabhakar Bagul)**
**Chief Officer And Administrator**
Municipal Council Erandol
Dist.-Jalgaon

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### संजू सॅमसन राजस्थान रॉयल्सच्या संघात सहभागी

**जयपूर :** बोटाच्या दुखापतीतून सावरल्यानंतर राजस्थान रॉयल्सचा कर्णधार संजू सॅमसन आता त्याच्या आयपीएल संघात सामील झाला आहे. ३० वर्षीय सॅमसनने बंगळुरूमधील सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये उपचार पूर्ण केले. सोमवारी रॉयल्सच्या पहिल्या सत्रात तो उपस्थित होता. इंग्लंडविरुद्धच्या भारताच्या पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेदरम्यान जोफ्रा आर्चरच्या बाऊंसरने सॅमसनला दुखापत झाली. दुखापतीनंतर त्याला शस्त्रक्रिया करावी लागली. सॅमसनने रॉयल्सचा फलंदाज यशस्वी जयस्वाल आणि मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड यांच्याशी चर्चा केली. पूर्णपणे तंदुरुस्त असूनही तो यष्टिरक्षण करू शकेल का हे पाहणे बाकी आहे. जर नसेल तर ही जबाबदारी ध्रुव जुरेलला दिली जाऊ शकते. अष्टपैलू रियान पराग देखील खांद्याच्या दुखापतीतून बरा झाला आहे.


### भारताचा सामना मालदीवशी, सर्वांच्या नजरा छेत्रीवर

**शिलाँग :** बुधवारी येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय फुटबॉल सामन्यात भारत मालदीवविरुद्ध खेळणार आहे. या सामन्यात सर्वांच्या नजरा निवृत्तीनंतर परतणाऱ्या स्टार स्ट्रायकर सुनील छेत्रीवर असतील. भारतासाठी हा सामना एका आठवड्यापेक्षा कमी कालावधीत त्याच ठिकाणी बांगलादेशविरुद्ध होणाऱ्या एएफसी आशियाई कप पात्रता सामन्यासाठी रंगीत तालीम म्हणून ठरणार आहे. भारत २५ मार्च रोजी आशिया कप पात्रता फेरीत बांगलादेशविरुद्ध पहिला सामना खेळेल आणि ४० वर्षीय छेत्रीने या महिन्याच्या सुरुवातीला निवृत्तीनंतर पुनरागमन करण्याची घोषणा करून भारताला स्पर्धेत यश मिळवून दिले. हा सराव सामना भारतीय संघासाठीही ऐतिहासिक आहे कारण तो फुटबॉलवेड्या या डोंगराळ शहरात पहिल्यांदाच सामना खेळणार आहे. आंतरराष्ट्रीय फुटबॉलमध्ये पुनरागमनाची घोषणा केल्यानंतर भारताचा सर्वकालीन सर्वाधिक गोल करणारा खेळाडू छेत्रीचा हा पहिलाच सामना असेल. भारताचे मुख्य प्रशिक्षक मानोलो मार्केझ सामन्याच्या पूर्वसंध्येला म्हणाले, आम्ही येथे पहिल्यांदाच खेळत आहोत, परंतु मी येथे अनेक प्रशिक्षक आणि खेळाडूंसोबत काम केले आहे. मला माहीत होते की ते एक उत्तम ठिकाण आहे. बचावपटू मेहताब सिंग म्हणाला, आम्हाला शिलाँगमध्ये येऊन खूप आनंद होत आहे. आमचा राष्ट्रीय संघ येथे खेळण्याची ही पहिलीच वेळ आहे. ईशान्य भारत हा त्याच्या फुटबॉल चाहत्यांसाठी ओळखला जातो. फुटबॉल हा येथील सर्वांत लोकप्रिय खेळ आहे.

### एससी बंगळुरूकडून रिअल काश्मीरचा पराभव

**बंगळुरू :** ६० व्या मिनिटाला बचावपटू सनातोम्बा सिंग मैदानाबाहेर गेल्यानंतर १० खेळाडूंसह खेळणाऱ्या एससी बंगळुरूने शेवटच्या अर्ध्या तासात प्रभावीपणे सामना करत रिअल काश्मीर एफसीवर ३-२ असा विजय मिळवला. मध्यंतरापर्यंत दोन्ही संघ २-२ गोलने बरोबरीत होते. बंगळुरूकडून थोम्या शिम्रेने पहिला गोल केला परंतु ग्रोहेरे क्रिझोने रिअल काश्मीरला आघाडी मिळवून दिली. एससी बंगळुरूसाठी श्रवण शेट्टीने गोल करून बरोबरी साधली, तर फसलुरहमान मेथुकायलने विजयी गोल केला. या विजयामुळे एससी बंगळुरू १९ सामन्यांतून २० गुणांसह ऐझॉल एफसीपेक्षा १० व्या स्थानावर पोहोचला. रिअल काश्मीर १९ सामन्यांतून ३२ गुणांसह तिसऱ्या स्थानावर आहे.

### मेस्सी अर्जेंटिनाच्या विश्वचषक पात्रता फेरीतून बाहेर



**अर्जेंटिना :** अर्जेंटिनाचा स्टार लिओनेल मेस्सी उरुग्व आणि ब्राझीलविरुद्धच्या दक्षिण अमेरिकन विश्वचषक पात्रता सामन्यांमध्ये खेळू शकणार नाही. संघाचे प्रशिक्षक लिओनेल स्कालोनी यांनी सोमवारी याची घोषणा केली. अर्जेंटिना शुक्रवारी घरच्या मैदानावर उरुग्वशी आणि २५ मार्च रोजी यजमान ब्राझीलशी खेळणार आहे. दुखापतीमुळे मेस्सी विश्वचषक पात्रता सामन्यात खेळणार नाही. अर्जेंटिना फुटबॉल असोसिएशनने मेस्सीला वगळण्याचे कोणतेही अधिकृत कारण दिलेले नाही. दरम्यान, रविवारी मेजर लीग सॉकर (एमएलएस) मध्ये इंटर मियामीने अटलांटा युनायटेडवर २-१ असा विजय मिळवला तेव्हा मेस्सीला डाव्या मांडीत वेदना झाल्या. अर्जेंटिना २५ गुणांसह गुणतालिकेत अव्वल स्थानावर आहे, तर उरुग्वे दुसऱ्या आणि ब्राझील पाचव्या स्थानावर आहे.

### डब्ल्यूडब्ल्यूईसारखी थरारक स्पर्धा हरयाणात

**चंदीगड :** करमणूक, थरारासह डब्ल्यूडब्ल्यूईसारखा धमाका प्रथमच हरयाणात पाहायला मिळणार आहे. स्पर्धेत देश-विदेशातील कुस्तीपटू डावपेच आखताना पाहायला मिळणार आहे. यात डब्ल्यूडब्ल्यूईचे माजी विजेते सहभागी होतील. देशभरातील मल्लांचे प्रशिक्षण गुरुग्राममध्ये पूर्ण झाले आहे. पुढील महिन्यापासून जगातील दिग्गज भारतात दाखल होणार आहेत.

# रजत पाटीदार दीर्घकाळ आरसीबीचे नेतृत्व करेल

### विराट कोहलीला विश्वास



◆ **बंगळुरू, १८ मार्च**

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा नवा कर्णधार रजत पाटीदार दीर्घकाळ कर्णधारपद भूषवेल, असा विश्वास भारताचा तडाखेबंद फलंदाज विराट कोहलीने व्यक्त केला आहे..

२००८ मध्ये आयपीएल सुरू झाल्यापासून आरसीबीकडून खेळणारा कोहली संघाचा चेहरा आहे. त्याने एका दशकाहून अधिक काळ संघाचे नेतृत्वही केले. फाफ डुप्लेसिसच्या जागी पाटीदारला कर्णधार बनवण्यात आले. डुप्लेसिस आता दिल्ली कॅपिटल्सकडून खेळेल.

सोमवारी संघाच्या कार्यक्रमात कोहलीने आरसीबी चाहत्यांना सांगितले की, रजत पाटीदार हा बराच काळ तुमचा कर्णधार राहणार आहे. तो एक चांगला कर्णधार असल्याचे सिद्ध करेल. यशस्वी होण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व गुण त्याच्याकडे आहेत. आरसीबीने कधीही आयपीएल जिंकलेला नाही पण कोहली आशावादी आहे. तो म्हणाला, प्रत्येक सत्राप्रमाणे उत्साह आणि आनंद असतो. मी १८ वर्षांपासून खेळत आहे आणि मला आरसीबी आवडते. आमच्याकडे एक उत्तम संघ आहे आणि मी खूप उत्साहित आहे.

यावेळी रजत पाटीदार म्हणाला, विराट भाई, एबी डिव्हिलियर्स, ख्रिस गेलसारखे दिग्गज खेळाडू आरसीबीकडून खेळले आहेत. मी त्यांना पाहतच मोठा झालो. मला सुरुवातीपासूनच हा संघ आवडतो आणि टी-२० क्रिकेटमध्ये इतक्या मोठ्या संघाचे नेतृत्व करण्याची संधी मिळाल्याचा मला आनंद आहे. (वृत्तसंस्था)

# मला माझ्या क्षमतेवर प्रचंड विश्वास

### 'सायलेंट हिरो' श्रेयस अय्यरने साधला संवाद

◆ **नवी दिल्ली, १८ मार्च**

प्रत्येक सामना गांभीर्याने खेळणारा आणि काही दिवसांपूर्वी संघाच्या चॅम्पियन्स ट्रॉफी विजेतेपदानंतर कर्णधार रोहित शर्माने 'सायलेंट हिरो' म्हणून वर्णन केलेल्या श्रेयस अय्यरने, मला माझी ताकद, क्षमतेवर प्रचंड विश्वास असल्याचे वृत्तसंस्थेशी बोलताना सांगितले.

त्याला त्याच्या तथाकथित तांत्रिक त्रुटींबद्दल रूढीवादी विचारांशी झुंजावे लागले, तो टाईपकास्ट होता आणि विश्वचषकातील हिरो बनल्यानंतर काही महिन्यांतच त्याचा करार रद्द करण्यात आला, परंतु श्रेयस अय्यर अविचल राहिला आणि त्याच्या सचोटीवर आणि स्पष्ट मनावर विश्वास ठेवून पुढे गेला.

यातूनही त्याला त्याचे चांगले परिणाम मिळाले. अलिकडच्या काळात, तो चौथ्या क्रमांकावर भारताचा सर्वात विश्वासार्ह फलंदाज बनला आहे. शॉर्ट बॉलविरुद्धच्या त्याच्या कमकुवतपणाबद्दल विचारले असता, श्रेयसने सांगितले की, कदाचित ती धारणा निर्माण झाली असेल किंवा मी टाईपकास्ट झालो असेन. पण मला नेहमीच माझी ताकद, क्षमता माहीत होती आणि मला स्वतःवर विश्वास असल्याचे सांगितले. गेल्या आठ एकदिवसीय सामन्यांमध्ये त्याने चौथ्या क्रमांकावर ५३ च्या सरासरीने धावा केल्या आहेत.

तो म्हणाला, खेळ बदलत राहतो, म्हणून खेळाडूंना सतत त्यांची कामगिरी सुधारावी लागते. मला आनंद आहे की मी सकारात्मक मानसिकतेने खेळू शकलो आणि माझ्या सुधारणेच्या प्रक्रियेवर विश्वास ठेवला. गेल्या वर्षी इंग्लंडविरुद्धच्या घरच्या कसोटी मालिकेदरम्यान त्याला पाठीला दुखापत झाली आणि त्यानंतर तो रणजी ट्रॉफी खेळणार असताना त्याच्या तत्कालीन आयपीएल संघ कोलकाता नाईट रायडर्ससोबत सराव करत असताना त्याचा केंद्रीय करार रद्द झाला.

श्रेयसच्या नेतृत्वाखाली केकेआरने आयपीएल जिंकला आणि त्यानंतर तो भारतीय एकदिवसीय संघात परतला.

या आयपीएल हंगामात पंजाब किंग्जचे नेतृत्व करत असलेल्या श्रेयसने सांगितले की, मी माझी प्रक्रिया सोपी ठेवली आहे. मी जास्त विचार केला नाही आणि प्रामाणिकपणे काम करत राहिलो. मला खात्री होती की माझ्या प्रामाणिकपणा आणि कामगिरीमुळे मला पुन्हा संधी मिळेल. या काळाने मला खूप काही शिकवले. मी माझ्या कौशल्यांवर अधिक मेहनत घेतली. मी निकालावर खूश आहे कारण त्यात खूप मेहनत घेण्यात आली आहे.

प्रशिक्षक प्रवीण आमरे यांच्यापासून ते प्रशिक्षक सागरपर्यंत सर्वांनी कठोर परिश्रम घेतले. त्या दोघांनीही मला माझ्या फलंदाजीत दिसणारी ताकद विकसित करण्यास मदत केली. (वृत्तसंस्था)

### पंजाब किंग्जचे खेळाडू चंदीगडमध्ये दाखल

#### ५ एप्रिलला राजस्थान रॉयल्सशी सामना



स्पर्धेसाठी शहरात दाखल झालेले अर्शदीप सिंग आणि श्रेयस अय्यर

◆ **चंदीगड, १८ मार्च**

इंडियन प्रीमियर लीगच्या १८ वा हंगाम सुरू होणार असून. ५ एप्रिल रोजी पीसीए क्रिकेट स्टेडियम मुल्लानपूर येथे पंजाब किंग्ज आणि राजस्थान रॉयल्स यांच्यात सामना होईल. यासाठी पंजाब संघाचे खेळाडू सिटी ब्युटीफुलमध्ये येऊ लागले आहेत. मुल्लानपूर क्रिकेट स्टेडियम आणि धर्मशाळा क्रिकेट ग्राऊंड हे पंजाब किंग्ज फ्रँचायझीचे होम ग्राऊंड बनले आहेत. ज्याअंतर्गत ४ सामने मुल्लानपूर क्रिकेट स्टेडियममध्ये आणि ३ सामने धर्मशाळेत खेळवले जातील.पंजाब किंग्जचा संघ नुकताच धर्मशाळेत सराव शिबिर संपल्यानंतर चंदीगडला पोहोचला आहे. काही परदेशी खेळाडूही संघात सामील झाले आहेत, उर्वरित परदेशी खेळाडू एक-दोन दिवसात शहरात पोहोचतील. शहरात पोहोचलेल्या पंजाब किंग्ज संघात कर्णधार श्रेयस अय्यरसह अर्शदीप सिंग, लेग-स्पिनर युजवेंद्र चहल, हरप्रीत ब्रार, मार्कस स्टोइनिस यांचा समावेश आहे. सोमवारी संघातील खेळाडू पीसीए क्रिकेट स्टेडियमवर पोहोचले आणि सराव सत्रात भाग घेतला. (वृत्तसंस्था)

# शेफाली वर्माने साधली हॅट्ट्रिक

### २३ वर्षांखालील चषकात लक्षणीय कामगिरी

◆ **गुवाहाटी, १८ मार्च**



महिलांच्या २३ वर्षांखालील एकदिवसीय चषकामध्ये हरयाणाकडून खेळणारी भारताची अष्टपैलू खेळाडू शेफाली वर्माने कर्नाटकविरुद्धच्या उपांत्यपूर्व सानमन्यात हॅट्ट्रिक केली.

भारतीय संघाबाहेर असलेल्या शेफालीने ४४ व्या षटकातील शेवटच्या दोन चेंडूंवर सलोनी पी आणि सौम्या वर्मा यांना बाद केले आणि ४६ व्या षटकातील पहिल्या चेंडूवर नमिता डिसूझाला बाद केले. तिने २० धावा देऊन तीन गडी बाद केले. तिच्या भेद गोलंदाजीमुळे हरयाणाने सामना जिंकला आणि उपांत्य फेरीत प्रवेश केला.

महिला प्रीमियर लीगमध्ये शेफालीच्या दिल्ली कॅपिटल्सला सलग तिसऱ्यांदा अंतिम सामना गमवावा लागला. नॅट सायव्हर ब्रंट, एलिस पेरी आणि हेली मॅथ्यूज नंतर शेफालीने स्पर्धेत सर्वाधिक धावा केल्या. (वृत्तसंस्था)

# मैदानावरच कोसळला क्रिकेटपटू जुनैद जफर खान

### अति उष्णतेमुळे मृत्यू

◆ **ॲडिलेड, १८ मार्च**

पाकिस्तानी वंशाचा ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू जुनैद जफर खानचा अति उष्णतेमुळे मृत्यू झाला. ४० अंश सेल्सिअस तापमानात सामना खेळत असताना तो कोसळला आणि त्याचा मृत्यू झाला.

ही घटना शनिवारी ॲडिलेडमधील कॉनकॉर्डिया कॉलेज ओव्हल येथे घडली. येथे ओल्ड कॉनकॉर्डियन्स आणि प्रिन्स अल्फ्रेड ओल्ड कॉलेजियन्स यांच्यात सामना सुरू होता. सामन्यादरम्यान जुनैद जफर खान अचानक जमिनीवर पडला आणि त्याला ताबडतोब वैद्यकीय मदत देण्यात आली. परंतु त्याला वाचवण्याचे प्रयत्न अपुरे पडले आणि त्याचा मृत्यू झाला.

स्थानिक माध्यमांच्या वृत्तानुसार, जुनैद रमजानचे उपवास करत होता. परंतु तो दिवसभर पाणी पीत होता. इस्लामिक नियमांनुसार, जर एखाद्या व्यक्तीला आजारी किंवा अस्वस्थ वाटत असेल तर त्याला उपवासाच्या वेळी पाणी पिण्याची परवानगी आहे. आमच्या एका उमद्या खेळाडूच्या निधनाने आम्हाला खूप दुःख झाले आहे. सामन्यादरम्यान त्याची तब्येत बिघडली. वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या अथक प्रयत्नांनंतरही त्याला वाचवता आले नाही. (वृत्तसंस्था)

# धावपटू अर्चना जाधववर चार वर्षांची बंदी

### डोप चाचणीत अपयशी

◆ **नवी दिल्ली, १८ मार्च**

जानेवारीमध्ये झालेल्या डोप चाचणीमध्ये अपयशी ठरल्यामुळे मंगळवारी भारतीय लांब पल्ल्याची धावपटू अर्चना जाधववर चार वर्षांची बंदी घालण्यात आली. वारंवार आठवण करून देऊनही अर्चनाने तिच्या अयशस्वी डोप चाचणीविरुद्ध अपील केले नाही. त्यामुळे वर्ल्ड ॲथ्लेटिक्सने तिने तिचा गुन्हा कबूल केला आहे असे गृहीत धरून तिच्यावर बंदी घातली आहे.

वर्ल्ड ॲथ्लेटिक्सच्या ॲथ्लिट इंटिग्रिटी युनिट (एआययू) नुसार, गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये पुणे हाफ-मॅरेथॉन दरम्यान घेतलेल्या अर्चना जाधवच्या नमुन्यात ऑक्सॅन्ड्रोलोन हे प्रतिबंधित पदार्थ आढळले होते. हे कृत्रिम ॲनाबॉलिक स्टिरॉइड शरीरात प्रथिने उत्पादन आणि स्नायूंच्या निर्मितीस मदत करते. ही बंदी ७ जानेवारीपासून लागू झाली. या कालावधीसाठी जाधवला तात्पुरते निलंबित करण्यात आले. १५ डिसेंबर २०२४ पासूनचे तिचे सर्व निकाल अपात्र मानले जातील आणि तिला या कालावधीत मिळालेले सर्व पुरस्कार, पदके, गुण, बक्षिसे आणि उपस्थितीचे पैसे परत करावे लागतील. (वृत्तसंस्था)

### रिझवान राष्ट्रीय टी-२० स्पर्धा खेळणार नाही

**कराची :** बाबर आझम आणि नसीम शाह यांच्यानंतर आता पाकिस्तानचा एकदिवसीय कर्णधार मोहम्मद रिझवाननेही फैसलाबाद येथे सुरू असलेल्या राष्ट्रीय टी-२० स्पर्धेत न खेळण्याचा निर्णय घेतला आहे. तो खेळतानाचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. नुकताच मक्का येथील उमराहवरून परतलेला रिझवान तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेसाठी न्यूझीलंडला जाण्यापूर्वी विश्रांती घेऊ इच्छितो. न्यूझीलंडमध्ये होणाऱ्या पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेसाठी रिझवान, बाबर आणि नसीम यांना संघात स्थान मिळालेले नाही.

# हरयाणा, ओडिशा, मध्य प्रदेशचा विजय

### राष्ट्रीय महिला हॉकी लीग

◆ **रांची, १८ मार्च**

येथे राष्ट्रीय महिला हॉकी लीग २०२४-२०२५ चा शेवटचा टप्पा सुरू होत असताना, हरयाणा, ओडिशा आणि मध्य प्रदेश यांनी आपापल्या सामन्यांमध्ये विजय मिळवला.

दिवसाच्या पहिल्या सामन्यात हरयाणाने पूल अ मध्ये मणिपूर हॉकीचा ७-१ असा पराभव केला. हरयाणाकडून सावी आणि कीर्ती यांनी प्रत्येकी दोन गोल केले. खासा शशी, सुप्रिया आणि कीर्ती यांनीही त्यांच्या संघासाठी प्रत्येकी एक गोल केला. प्रत्युत्तरादाखल, मणिपूरसाठी दिना देवी नौरमने एक गोल केला.

दुसऱ्या सामन्यात, ओडिशाने बंगालचा १-० असा पराभव केला. सामन्याच्या पहिल्या क्वार्टरमध्ये दीपिका बरवाने गोल केला. तिसऱ्या सामन्यात, मध्य प्रदेशने पूल अ मध्ये महाराष्ट्राचा २-० असा पराभव केला. मध्य प्रदेशकडून भूमिका साहू आणि कर्णधार सोनिया कुमरे यांनी पहिल्या आणि शेवटच्या क्वार्टरमध्ये गोल करून महाराष्ट्राचा पराभव केला.

राष्ट्रीय महिला हॉकी लीग २०२५ (अंतिम टप्पा) चे उद्घाटन मंगळवारी मरंग गोमके जयपाल सिंग ॲस्ट्रोटर्फ हॉकी स्टेडियममध्ये झाला. प्रत्येक सामन्यातील विजेत्याला तीन गुण दिले जातील, तर सामना बरोबरीत सुटल्यास एक गुण दिला जाईल. साखळी सामन्यांच्या शेवटी गुणतालिकेत अव्वल स्थानावर असलेल्या संघाला एलिट डोमेस्टिक स्पर्धेचा विजेता घोषित केले जाईल. गेल्या वर्षी झालेल्या पहिल्या आवृत्तीत, हरयाणा संघ सात सामन्यांतून १६ गुणांसह पहिल्या स्थानावर होता. (वृत्तसंस्था)

# रेल्वेची स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट स्पर्धा २५ मार्चपासून

**सोलापूर, दि. १८ मार्च-**

मध्य रेल्वे सोलापूरच्या ७८व्या स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट स्पर्धेस बुधवार २५ मार्चपासून येथील रेल्वेच्या डॉ. आंबेडकर क्रीडा संकुलात सुरू होईल.

मध्य रेल्वे इन्स्टिट्यूट सोलापूर व विभागीय स्पोर्ट्स असोसिएशन सोलापूर यांच्या वतीने सुरु असलेली ही स्पर्धा मुंबईच्या टाइम्स शिल्ड क्रिकेट स्पर्धेनंतर महाराष्ट्रातील सर्वात जुनी गेली ७७ वर्ष अखंडपणे सुरू असलेली व सोलापुरातील एकमेव क्रिकेट स्पर्धा आहे.

ही स्पर्धा अ व ब या दोन गटात होणार असून अ गटाची स्पर्धा ४० तर ब गटाची स्पर्धा २० षटकांची आहे. स्पर्धेची सुरुवात ब गटापासून होणार असून ब गटामध्ये पहिल्या ३२ संघांना प्रवेश देण्यात आला आहे. ब गटातील विजेत्या संघास अ गटामध्ये प्रवेश मिळणार आहे. अ गटामध्ये निमंत्रित १६ संघांना प्रवेश देण्यात आला आहे. स्पर्धेतील अ गटातील विजेत्या व उपविजेता संघांना रोख २५ व १५ हजार तर ब गटातील विजेत्या संघास रोख २१ व ११ हजार रुपये व करंडक देण्यात येणार आहे. तसेच प्रत्येक सामन्यातील सामनावीर, फलंदाज, गोलंदाज, यष्टीरक्षक व मालिकावीर यांना रोख बक्षीस व ट्रॉफी प्रदान करण्यात येणार आहे. नाव नोंदणीसाठी विक्रांत पवार (मो. ९४२१० ४१५९९) अथवा वासुदेव दोरनाल (९८९०७७९८२९) यांच्याशी संपर्क साधावा.

# कुष्ठरोग दौड रन फॉर लेप्रसी मॅरेथॉनला सीईओंनी दाखवला हिरवा झेंडा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ मार्च-**

राष्ट्रीय आरोग्य अभियान राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मुलन कार्यक्रम जनजागृती अंतर्गत रन फॉर लेप्रसी मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले. या मॅरेथॉनला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी गुरुनानक चौक येथील जिल्हा सामान्य रुग्णालय येथे हिरवा झेंडा दाखवून शुभारंभ केला. तसेच या मॅरेथॉनमध्ये सहभागी विद्यार्थ्यांनी तसेच जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी या माध्यम ातून कुष्ठरोग विषयक मोठ्या प्रमाणावर जनजागृती करावी व सोलापूर जिल्हा व संपूर्ण भारत देश कुष्ठरोग मुक्त होण्याच्या मोहिमेत सक्रिय सहभाग द्यावा, असेही त्यांनी आवाहन केले.



यावेळी जिल्हा शल्य चिकीत्सक डॉ. सुहास माने, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले, सहा. संचालक (कुष्ठरोग) डॉ. मोहन शेगर, डॉ. आनंद गोडसे, डॉ. सुनंदा राऊराव डॉ. अभिवंत, जिल्हा लेखा व्यवस्थापक श्रीमती वैशाली थोरात, एनसीसी बटालीयनचे रणधीर सतिप, सरब बाबर, तानाजी चव्हाण, विक्रमजित सिंग व जिल्हा ॲथलेटिक्स संघटनेचे सेक्रेटरी राजू प्याटीतसेच एनसीसी बटालीयनचे अधिकारी उपस्थित होते.

मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी हिरवा झेंडा दाखवल्यानंतर ही मॅराथॉन होटगी नाका, अंत्रोळीकर नगर, कुमठा नाका मार्गे जिल्हा सामान्य रुग्णालय येथे आली. या जनजागृती मॅरेथॉन मध्ये ४३० विद्यार्थ्यांकडून सहभाग नोंदवण्यात आलेला होता. या मॅराथॉन मध्ये एनसीसी बटालियन संगमेश्वर कॉलेज, वॉलचंद कॉलेज, हरिभाई देवकरण कॉलेज, समर्थ ॲॅकॅडमीचे विध्यार्थी सहभागी झाले होते.

रन फॉर लेप्रोसी ही मॅराथॉन जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद, म हानगर पालिका आयुक्त डॉ. सचिन ओंबासे, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, मनपा मुख्य आरोग्य अधिकारी, डॉ. राखी माने यांचे मार्गदर्शनाखाली डॉ. अरुंधती हराळकर, शहर क्षयरोग अधिकारी, डॉ. शिवलीला कांते, वैद्यकीय अधिकारी डॉ. खडतरे व सहायक संचालक (कुष्ठरोग) कार्यालयातील व कुष्ठरोग विभागातील सर्व कर्मचारी यांनी पार पाडली.

विजेत्यांना रोख बक्षिस, प्रमाणपत्र व मानचिन्ह जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले, सहा संचालक (कुष्ठरोग) डॉ. मोहन शेगर यांचे हस्ते देऊन गौरविण्यात आले. डॉ. आनंद गोडसे यांनी आभार मानले.

### सुमीत जावीर, चैताली माने प्रथम

**अंतिम निकाल (प्रथम तीन) :**

**पुरुष :** सुमित अविनाश जावीर, अनिल बधु चव्हाण, तेजस नारायण शिंदे. उत्तेजनार्थ : कुंदन अंबादास राठोड, सुभेदार गळवे,

**महिला :** चैताली गणेश माने, अद्विका प्रविण देशमुख, अनामिका विठ्ठल राठोड, उत्तेजणार्थ : नम्रता शांतमल्लप्पा धोत्रे.

# जिल्हा कबड्डी संघाच्या कर्णधारपदी अनिकेत माने व निरजा गौडा

### राज्य अजिंक्यपद स्पर्धेसाठी सोलापूर जिल्हा संघ रवाना : प्रशिक्षकपदी गणेश डोंगरे व प्रकाश जाधव

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १८ मार्च -**

महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या वतीने ठाणे येथे १९ ते २३ मार्च दरम्यान होणाऱ्या ७२व्या राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेसाठी सोलापूरचा जिल्हा कबड्डी पुरुष संघाच्या कर्णधारपदी अनिकेत माने व महिला संघाच्या कर्णधारपदी निरजा गौडा यांची तर प्रशिक्षकपदी गणेश डोंगरे यांची निवड करण्यात आली. सोलापुर जिल्हा कब्बड्डी असोसिएशन मान्यतेने व गणेश डोंगरे मित्र परिवार शिवजन्मो त्सव आयोजित पुरुष, महिला जिल्हा निवड



चाचणी स्पर्धा पार पडली.यातून जागृती विद्यामंदिर नेहरू नगर येथे खेळाडूंचे कॅम्प घेण्यात आले.यातून खालील खेळाडूची निवड करण्यात आली. दोन्ही संघ रवाना झाले. दोन्ही संघास सोलापूर जिल्हा कब्बड्डी असोसिएशन अध्यक्ष अनिल जाधव, महाराष्ट्र सहकार्यवाह मदनलाल गायकवाड, सुभाष चव्हाण, मरगु जाधव, संजय सावंत, संजय म ोतेकर, प्रकाश जाधव, अभय जाधव, जयंत मोरे, संतोष जाधव, निवड समि ती सदस्य स्वप्नील जाधव, शिवशरण नुला, संजय शिंदे यांनी शुभेच्छा दिल्या.

**संघ : पुरुष :** अनिकेत माने (कर्णधार), वेदांत चोरमले, अनिकेत वाघमारे कुमार चव्हाण, आकाश कोळी,बिरुदेव माने,रोहन ईरवटे,बाळू व्हनकडे,सुरज चौधरी,ऋषिकेश गायकवाड,श्रेयश गायकवाड,आदर्श पुटटा, गणेश डोंगरे (प्रशिक्षक) संतोष जाधव (व्यवस्थापक)

**महिला :** निरजा गौडा (कर्णधार), जयश्री जाधव, प्रज्ञा माने, पुनम पवार, सपना कांबळे,संजीवनी गुरव, पायल पवार,पुजा जाधव, मानसी कोळी, ज्ञानेश्वरी खोसे,धनश्री माठीक, साक्षी राठोड, प्रकाश जाधव (प्रशिक्षक), चंद्रकांत नाईक (व्यवस्थापक)

# न्यू सोलापूर क्लबचे प्रभाकर देवकते, सोनाली शिंदे महाराष्ट्र खो-खो संघात

### अखिल भारतीय नागरी सेवा स्पर्धा

**सोलापूर, दि. १८ मार्च-**

अखिल भारतीय नागरी सेवा स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या खो-खो संघात न्यू सोलापूर क्लबच्या प्रभाकर देवकते व सोनाली शिंदे यांची निवड झाली.

केंद्र शासनाच्या वतीने अखिल भारतीय नागरी सेवा स्पर्धा दिल्ली येथे २१ ते २४ मार्च या कालावधीत होणार आहेत. त्यात ते महाराष्ट्र शासनाच्या खो-खो संघातून प्रतिनिधित्व करतील. देवकते हे सध्या मुंबई पोलिस





आस्थापनेवर तर शिंदे या सिव्हिल हॉस्पीटल सोलापुर येथे कार्यरत आहे. या दोघांची सलग दुसऱ्या वर्षी महाराष्ट्र शासनाच्या खो-खो संघात निवड झालेली आहे. त्यांच्या निवडीबद्दल न्यु सोलापुर खो-खो क्लबचे अध्यक्ष मनोज संगावार व सचिव प्रथमेश हिरापुरे, उपाध्यक्ष संतोष कदम व खजिनदार गोकुळ कांबळे यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### मयत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांचे आयुक्तांनी केले सांत्वन, थेट घरी जाऊन आस्थेने केली विचारपूस

**सोलापूर, दि.१८ मार्च**

महापालिकेत कार्यरत असताना बिगारी व सफाई कर्मचाऱ्यांचे निधन झाले. त्यानंतर महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी मयत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांची त्यांच्या घरी जाऊन भेट घेतली. सांत्वन केले. आस्थेने विचारपूस केली. सोलापूर महापालिकेत कार्यरत असलेले बिगारी कर्मचारी शिवाजी कदम यांचे ११ मार्च २०२५ रोजी सकाळी कामावर असताना हृदय विकाराच्या झटक्याने निधन झाले आहे. तर सफाई कामगार सूरज सांगे यांचे १४ मार्च २०२५ रोजी कामावर असताना हृदय विकाराच्या झटक्याने निधन झाले. आज महापालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी त्यांच्या निवासस्थानी जाऊन परिवाराचे सात्वन केले. यावेळी अतिरिक्त आयुक्त रवि पवार, मुख्य सफाई अधिकारी नागनाथ बिराजदार उपस्थिती होते. हे दोन्ही कर्मचारी नेमून दिलेले कामं उत्कृष्ठ रित्या करत होते. आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी मयत कर्मचारी यांच्या परिवारातील व्यक्तींना लवकरात लवकर महापालिका सेवेत सामावून घेतले जाईल, असे आश्वासन दिले.

### कुसमोड येथील शाळेला स्वच्छ शाळा सुंदर शाळा पुरस्कार

**पिलीव, दि.१८ मार्च-**

माळशिरस तालुक्यातील कुसमोड येथील जिल्हा परिषद शाळा लक्ष्मीनगर या पिलीव केंद्रातील आदर्श शाळेला मरवडे तालुका मंगळवेढा येथील छत्रपती शिवाजी सांस्कृतिक व क्रिडा मंडळाचा स्वच्छ शाळा सुंदर शाळा हा पुरस्कार जाहीर झाला आहे. हा पुरस्कार २१ मार्च रोजी दुपारी २.३० वाजता लतीफभाई तांबोळी मंगल कार्यालय मरवडे याठिकाणी प्रदान करण्यात येणार आहे.

### मोडनिंब येथे शिवशंभू भक्तांकडून महाआरती

**मोडनिंब , दि.१८ मार्च-**

येथे श्री हनुमान मंदिरात समस्त शिवशंभू पाईक व शेकडो रामभक्तांच्या उपस्थितीत हनुमान चालिसा पठण व महाआरती करण्यात आली. या प्रसंगी शेकडो शिवशंभू पाईक आणि रामभक्त मोठ्या प्रमाणात सहभागी होते.महाआरती वेळी तुपाचे दीप प्रज्वलित करण्यात आले. तुपाचे दीप प्रज्वलीत केल्याने मंदिर परिसरात सुगंध दरवळला होता.त्याचबरोबर रुईच्या पानाचा हार अर्पण करण्यात आला. प्रत्येक मंगळवारी सायंकाळी सात वाजता श्री हनुमान चालिसा पठण व आरतीचा कार्यक्रम होणार असल्याचे शिवशंभू पाईकानी सांगितले.लहान मुले त्यांच्या पालकांच्या प्रोत्साहनाने अखंड हनुमान चालीसा पठण करीत असतात. तरुण आरतीचे नेतृत्व करत आहेत. विशेष म्हणजे, सहभागी मुलांची संख्या वाढत आहे, ज्यामुळे हनुमान चालीसा पठणात त्यांच्या सहभागावर सकारात्मक सांस्कृतिक प्रभाव पडत आहे.या कार्यक्रमामुळे आध्यात्मिक साधना, विशेषतः तरुण पिढीमध्ये नवीन रस निर्माण होण्यास मदत झाली आहे.





### कोठारी प्रशालेत इकोफ्रेंडली रंगाने रंगपंचमी साजरी

**सोलापूर, दि. १८ मार्च-**

सन्मती ज्ञान प्रसारक मंडळ संचलित श्री नवलबाई फुलचंद शहा कोठारी हायस्कूलमध्ये विद्यार्थ्यांनी इको फ्रेंडली रंगाने रंगपंचमी साजरी केली. प्रशालेतील विद्यार्थ्यांनी बीट,गाजर, गुलाब, जास्वंदीचे फुले, विविध झाडांची पाने इत्यादीपासून नैसर्गिक रंग तयार केले. नैसर्गिक रंगाचे महत्त्व प्रशालेतील सहशिक्षिका माने ए. एस, काळे एस.व्ही,श्रीमती भांदुर्गे यांनी सांगितले. प्रशालेचे मुख्याध्यापक रमेश यादवाड यांनी नैसर्गिक रंगाचे फायदे व तोटे सांगून विद्यार्थ्यांना रंगपंचमीच्या शुभेच्छा दिले. यावेळी सर्व विद्यार्थ्यांनी नैसर्गिक रंगाने रंगपंचमी खेळून आनंद साजरा केले.

### सुरेश जगताप यांची शुक्रवारी शोक सभा



**सोलापूर, दि. १८ मार्च-**

स्वर्गीय सुरेश बाबुराव जगताप (पुणे) शिक्षक ते शिक्षणाधिकारी, शिक्षण उपसंचालक, एस एस सी बोर्ड अध्यक्ष पदापर्यंत अनेक पदे भूषविलेले, सोलापूर जिल्ह्यातील अनेक शिक्षण संस्थेचे व शिक्षण तज्ञांशी सुपरीचित व्यक्तिमत्व यांचे १५ मार्च रोजी पुणे येथे वयाच्या ७८ व्या वर्षी निधन झाले. त्यानिमित्त शुक्रवार २१ मार्च रोजी सायंकाळी ५.३० वाजता समाज कल्याण केंद्र रंगभवन चौक सोलापूर येथे शोक सभेचे आयोजन केले आहे.

### पांडुरंग शिंगटे यांचे निधन



**करकंब, दि.१८मार्च.**

करकंब येथील प्रगतशील बागायतदार पांडुरंग हरिचंद्र शिंगटे यांचे अल्पशा आजाराने मंगळवारी निधन झाले.मा.ग्रामपंचायत सदस्य राहुल शिंगटे यांचे ते वडील होत.त्यांच्या पश्चात पत्नी,तीन भाऊ,एक मुलगा, तीन मुली,जावई,सुना,नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्यावर मंगळवारी संध्याकाळी नेमतवाडी रोड येथील शेतात अंत्यसंस्कार करण्यात आले.

# दोन वर्षात अधिकाऱ्यांसह १३० कर्मचाऱ्यांवर कारवाई

## महापालिका कर्मचाऱ्यांच्या वेतनातून एकूण ९ लाख ६० हजार रुपये दंड केला कपात

**तभा वृत्तसेवा । किरण बनसोडे**
**सोलापूर, दि. १८ मार्च-**

दोन वर्षात बेशिस्त व गैरवर्तन करणाऱ्या महापालिकेतील अधिकाऱ्यांसह १३० कर्मचाऱ्यांवर विविध प्रकारची कारवाई करण्यात आली. या माध्यमातून प्रशासनात शिस्त लावण्याचा प्रयत्न करण्यात आला. विविध प्रकारच्या केलेल्या दंडातून ९ लाख ६० हजार रुपये त्यांच्या वेतनातून कपात करून घेण्यात आले

महापालिकेत आतापर्यंतच्या आयुक्तांच्या कारकिर्दीत इतिहास रचलेले तत्कालीन महापालिका आयुक्त शिवशंकर यांनी जून २०२० ते नोव्हेंबर २०२२ दरम्यान प्रशासनात शिस्त निर्माण व्हावी म्हणून कामचुकार देशी आणि गैरवर्तन करणाऱ्या कर्मचाऱ्यांबरोबरच वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत कारवाईचा बडगा उगारत तब्बल एक हजाराच्या जवळपास कारवाया केल्या. यामध्ये अनेकांवर दंडात्मक, निलंबन, बडतर्फ अशी कारवाई केली तर कामात कुचराई आणि गैरवर्तन प्रकरणात मानधनावरील अनेक अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना थेट घरचाच रस्ता दाखविला होता. यामुळे महापालिका प्रशासनाचे कामकाज त्यांच्या कारकिर्दीत नीट आणि नेटकेपणानेच झाल्याचे आणि त्यांचा दरारा असल्याचेही दिसून आले होते. नवीन आयुक्त डॉक्टर सचिन ओंबासे यांच्या येण्यापूर्वी महापालिका प्रशासनात गेल्या दोन वर्षात कर्तव्यात कामचुकारपणा, बेशिस्त दिलेले काम वेळेत न करणे, उद्दिष्ट पूर्ती न करणे, कर्तव्यात कसुर करणे या व विविध प्रकरणात महापालिकेतील विविध विभागातील ११५ कर्मचारी आणि काही अधिकाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. त्याला विविध प्रकारच्या केलेल्या दंडातून ९ लाख ६० हजार रुपये त्यांच्या वेतनातून कपात करून घेण्यात आले आणि त्यांच्या कार्यपुस्तिकेत देखील याची नोंद घेण्यात आली. विविध विभागातील कर्मचारी अधिकारी कामगार यांच्या कामात कसुरी, कर्तव्यात गंभीर बाबीचे प्रकार करणे, कार्यालयीन शिस्तीस बाधा पोहोचविणे, जनमानसातील प्रतिमा मलीन करणारी कामे करणे, विविध नियमांच्या तरतुदींचे भंग करणे आशा आदी प्रकरणात महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) १९७९ चे नियम ३(१) (एक व दोन) च्या तरतुदींचा भंग करणे, महाराष्ट्र नागरी सेवा शिस्त व अपील नियम १९७९ मधील नियम ४ (१)(अ) अन्वये आयुक्तांनी त्यांना नियमाने दिलेल्या शक्तीचा वापर करून विविध विभागातील १५ कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई केली होती. दरम्यान, आता कडक शिस्तीचे आणि कर्तव्यात कसुर खपवून न घेणारे नवीन आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी आतापासूनच प्रशासनावर नियंत्रण ठेवले आहे. जबाबदारी पार न पाडलेल्या मंडई विभागातील कर्मचाऱ्यावर निलंबनाच्या कारवाईने सर्व विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना आपला झटका दाखवून देत कर्तव्य चोखपणे पार पाडावे अन्यथा कारवाईला सामोरे जावे लागेल, असा जणू इशाराच दिला आहे.

### यांच्यावर झाली दंडात्मक कारवाई

यापूर्वी दंडात्मक कारवाई झालेल्यांमध्ये महापालिका युसीडी विभागातील कनिष्ठ श्रेणी लिपिक, वरिष्ठ मुख्य लेखनिक, घनकचरा व्यवस्थापन विभागातील आरोग्य निरीक्षक, वरिष्ठ श्रेणी लिपिक, कनिष्ठ श्रेणी लिपिक, सफाई कामगार, बिगारी आणि झाडूवाला, आरोग्य विभागातील वैद्यकीय अधिकारी, वरिष्ठ श्रेणी लिपिक, कनिष्ठ श्रेणी लिपिक, मिडवाइफ, मिश्रक, कामगार कल्याण व जनसंपर्क विभागातील वरिष्ठ श्रेणी लिपिक, कनिष्ठ श्रेणी लिपिक, सार्वजनिक आरोग्य अभियंता कार्यालयातील कनिष्ठ अभियंता, पाईप फिटर, नगर अभियंता कार्यालयातील कनिष्ठ अभियंता, मजूर, सामान्य प्रशासन विभागातील वरिष्ठ श्रेणी लिपिक, कनिष्ठ श्रेणी लिपिक, क्रीडा विभागातील कनिष्ठ श्रेणी लिपिक, बांधकाम परवानगी विभागातील उप अभियंता, सहायक अभियंता, मंडई विभागातील वरिष्ठ मुख्य लेखनिक, कनिष्ठ श्रेणी लिपिक, कर आकारणी विभागातील वरिष्ठ श्रेणी लिपिक, कनिष्ठ श्रेणी लिपिक आणि विभागीय कार्यालय क्रमांक ४ मधील वरिष्ठ मुख्य लेखनिक आणि मजूर अशा अधिकारी कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.

### निलंबन कारवाईतील विभाग व कर्मचारी असे

महाराष्ट्र महापालिका अधिनियमांच्या कलमान्वये १५ कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले. यामध्ये गवसू तांत्रिक विभागातील २ सहाय्यक अभियंता, घनकचरा विभागातील ३ बिगारी आणि सफाई कामगार, बांधकाम परवानगी विभागातील सहाय्यक अभियंता, २ आवेक्षक, वरिष्ठ श्रेणी लिपिक, सार्वजनिक आरोग्य अभियंता कार्यालयातील मजूर, उद्यान विभागातील मजूर, मालमत्ता कर विभागातील कनिष्ठ श्रेणी लिपिक आणि कार्यालयीन कक्ष मधील शिपाई यांचा समावेश आहे. बांधकाम विभागातील तिघांवर सक्तीची सेवानिवृत्ती आणि दोघांना एक लाख रुपये आर्थिक दंड आणि सक्तीची सेवानिवृत्तीची कारवाई करण्यात आली तर एकावर २५ हजाराचा दंड अशी कारवाई झाली आहे.

# आंधळगाव येथे जुगार अड्ड्यावर पोलिस अधीक्षक पथकाचा छापा

## ९लाख ६२ हजाराचा मुद्देमाल जप्त, आठ जणाविरूध्द गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि.१८ मार्च**

आंधळगाव- गुंजेगाव रस्त्यावर एका घरामध्ये ५२ पानी पत्त्यावर पैशाची पैज लावून मन्ना नावाचा जुगार खेळणाऱ्या अड्ड्यावर सोलापूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या पथकाने छापा टाकून नऊ लाख ६२ हजार किमतीचा मुद्देमाल जप्त करून विनोद शिंदे (रा.लक्ष्मी दहिवडी),हरि चंदनशिवे(रा.अंधलगाव) विजय यादव, (रा.मारापुर )श्रीकांत साळे, (ल.दहिवडी) निलेश लेंडवे(रा .आंधळगाव ) दत्तात्रय लवटे(रा.तनाळी) व दोन अज्ञात अशा आठ जणांविरोधात मंगळवेढा पोलीस ठाण्यात जुगार ॲक्ट कायद्याखाली गुन्हा दाखल झाला आहे.




दरम्यान पोलीस अधीक्षक यांच्या पथकाकडून येथे धाड टाकल्यानेअवैध व्यावसायिकांमधून खळबळ उडाली असून मंथली घेणाऱ्या स्थानिक पोलीसांची निष्क्रियता मात्र समोर आली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, दिनांक १६ रोजी पोलीस अधिक्षक कार्यालयाचे पथक कारवाई करण्यासाठी मंगळवेढा येथे दाखल झाले त्यांनी रात्री सव्वा नऊ वाजता आंधळगाव गुंजेगाव रस्त्यालगत असणाऱ्या असणाऱ्या विटाच्या बांधकाम केलेल्या घरात पैशाची पैज लावून ५२ पानी मन्ना जुगार खेळत असल्याचे निदर्शनास आलेनंतर पोलिसांनी जागीच तीन लोकांना पकडले. यावेळी पोलिसांना रोख रक्कम ७५० रुपये,दोन मोबाईल, क्रेटा कंपनीची चार चाकी गाडी पाच मोटर सायकल असा एकूण ९ लाख ६२ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला. ही कारवाई पो. नी. मोहिते, पोलीस हवालदार दानवे,गायकवाड,सरवदे,मदने,वाघमारे चालक खांडेकर आदींनी ही कारवाई केली याची फिर्याद पोलिस हवालदार नागेश निंबाळकर यांनी दिली आहे.दरम्यान पोलीस अधिक्षक कुलकर्णी यांना तालुक्यातील अवैद्य व्यवसायांची माहीती मिळते व त्यांचे पथक येताच बिट पोलीसामधे धावपळ सुरू होते.येथिल स्थानिक पोलीस नेमके करतात तरी काय? आसा संताप जनक सवाल सुज्ञ नागरीक करीत आहेत.

या पुर्वीही पोलीस अधिक्षक पथकाने लाँजवर याच परिसरात छापा टाकुन पर राज्यातील मुलीची व्येशा व्यवसायाम धून सुटका केली होती.मंगळवेढ्यात ऊ.ध.ड.झ.दर्जाचे आधिकारी आसतानाही आवैद्य व्यवसायाकडे दूर्लक्ष का ? होतय आसाही सवाल केला जात आहे. आवैद्य व्यवसाईकाचे व पोलीसाच्या मिलीजूली मुळेच अवैद्य धंदे फोवत आसल्यांचा नागरीकांचा आरोप आहे. अवैद्य व्यवसाईकावर आंकुश ठेवने समाजाच्या हिताच्या दृष्टीने गरजेचे आसताना हे कर्तव्य बाजूला ठेवुन सद्याचे पोलीस वागत आसल्याचे सुज्ञ नागरीकांचे म्हणने आहे,पोलीस आधिक्षकांनी ज्यांच्या हद्दीत अवैद्य धंदे आढळतील त्यांना जबाबदार धरून कारवाई करावी आशी मागणी होत आहे.

# जेऊर स्थानकावर हुतात्मा व उद्यान एक्सप्रेस गाड्यांना थांबा देण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि.१८ मार्च-**

पुणे सोलापूर रेल्वे मार्गावर दूहेरीकरण व विद्युतीकरणाचे काम झाल्यामुळे तसेच गाड्यांची वेग मर्यादा प्रतितास १३० पर्यत गेल्यामुळे या मार्गावरील रेल्वे वाहतूक वेगाने होत आहे. जेऊर रेल्वे स्थानकावर मागील सात ते आठ वर्षांपासून हुतात्मा व उद्यान एक्सप्रेसला थांबा देण्याची मागणी आहे. परंतू तांत्रिक अडचणी व आश्वासनांशिवाय अद्याप पर्यंत काहीही मिळाले नाही.

रेल्वे विभागाकडून बहुतांश स्थानकांवरील इमारती नव्याने बांधण्यात आल्या असून सुशोभीकरण ही करण्यात आले आहे. स्थानके रंगरंगोटी मुळे चकाचक झाली आहेत. कुठल्याही महत्त्वाच्या गाडीला थांबा नसल्याने परिसरातील नागरीकांना गैरसोईला सामोरे जावे लागत आहे. रेल्वे प्रशासनाकडे एक्सप्रेस गाड्यांना स्थानकावर थांबा मिळावा यासाठी प्रवासी सेवा संघासह अनेक सामाजिक कार्यकर्त्यांचा पाठपूरावा सुरू असतो.परंतु ठोस निर्णय होत नाही. त्यामुळे प्रवाशांच्या हाती निराशाच पडत आहे.

> उजनी लाभक्षेत्रातील वाशिंबे हे महत्त्वाच्या ठिकाणी डेमो एक्सप्रेस सोडून इतर कुठल्याही गाडीला थांबा नाही. त्यामुळे रेल्वे प्रशासनाने प्रवाशांची मागणी लक्षात घेता याठिकाणी आठवड्यातून तीन दिवस चालणारी हैदराबाद(काझीपेठ) पुणे(हडपसर) एक्सप्रेस किंवा कोइंबतूर कुर्ला एक्सप्रेस या गाडीला थांबा द्यावा.
> **- विनोद सरडे, सरपंच, सोगाव ता करमाळा.**

> जेऊर स्थानकावरून करमाळा, जामखेड व परंडा या तीन तालुक्यातील नागरिक दळणवळणासाठी ये - जा करतात., गेल्या ७ - ८ वर्षांपासून हुतात्मा, इंटरसिटी व उद्यान एक्सप्रेस या गाड्यांना थांबा मिळावा प्रयत्न चालू आहेत, त्यासाठी विविध आंदोलने, मोर्चे झाले, जेऊर स्थानकावर प्रवाशांची प्रचंड गर्दी होत असून प्रवासी दारात लटकून जात आहेत, त्यामुळे या गाड्यांना थांबा मिळावा म्हणून रेल्वे प्रशासनाने तसेच लोकप्रतिनिधींनी प्रयत्न व पाठपुरावा करावा.
> **- सुहास सुर्यवंशी, अध्यक्ष, प्रवासी असोसिएशन जेऊर.**

# बार्शीतील सराफ दुकानदाराची ३८ लाखांची फसवणूक

### सुवर्णकारावर संशय व्यक्त

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. १८ मार्च-**

शहरातील सराफ व्यावसायिक संजय जगदीश महादान्य यांच्या मोहित अलंकार या दुकानातून कामगारानेच तब्बल ४२५ ग्रॅम सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम मिळून ३८लाख ४० हजार रुपयांची फसवणूक केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे.

महादान्य यांनी फिर्यादीत म्हटले, मोहित अलंकार या सराफ दुकानात शुभम शरद वेदपाठक (रा. मंगळवार पेठ, बार्शी) हा मागील ७ ते ८ वर्षांपासून सुवर्णकार म्हणून काम करत होता. त्याच्यावर मालक आणि कुटुंबाचा पूर्ण विश्वास होता. ग्राहकांनी दिलेले दागिने बनवण्यासाठी त्याच्याकडे सुपूर्द केले जात होते. मात्र, मागील काही महिन्यांपासून दिलेले दागिने आणि सोने न परतवल्याने संशय निर्माण झाला.



१२ मार्च २०२५ रोजी, महादान्य यांनी संशयित शुभम वेदपाठकला दागिन्यांची विचारणा केली असता उडवाउडवीची उत्तरे दिली. त्याचा ड्रॉवर तपासल्यावर सोने मिळून आले नाही. अधिक विश्वासात घेतल्यानंतर त्याने सोने गहाण ठेवून आलेले पैसे जुगारात उडवल्याचे सांगितले. या घटनेनंतर फिर्यादी संजय महादान्य यांनी शुभमच्या कुटुंबियांना संपर्क करुन हा प्रकार सांगितला. शुभमने तक्रार न करण्याची विनवणी केली तसेच, जर पोलिसांत तक्रार दिली, तर तुम्हाला बघून घेईन अशी धमकी दिली, असा आरोप फिर्यादीने केला आहे.

या फसवणुकीत याप्रमाणे सोने आणि रोख रक्कम गायब असल्याचे समोर आले. दुकानातील २८२ ग्रॅम ३०० मिली वजनाचे सोने (किंमत २४ लाख ८४हजार) ग्राहकांचे दुरुस्तीसाठी आलेले ९२ ग्रॅम २४० मिली वजनाचे दागिने रोख रक्कम एक लाख रुपये असा एकूण ३८ लाख ४० हजार ३५२ रुपयांच्या या फसवणुकीबाबत बार्शी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल करण्यात आली आहे.

पोलिसांनी गुन्हा दाखल करुन पुढील तपास सुरु केला आहे.

# भरधाव स्कूटीची सात वर्षीय मुलीला धडक

### खांद्याचे हाड फ्रॅक्चर, आईने दिली तक्रार

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. १८ मार्च-**

शहरातील अलिपुर रोड शिक्षक कॉलनीत भरधाव वेगाने आलेल्या स्कूटीने ७ वर्षीय मुलीला जोरदार धडक दिल्याची घटना घडली आहे. या अपघातात मुलीच्या डाव्या खांद्याचे हाड फ्रॅक्चर झाले असून तिच्यावर उपचार सुरू आहेत.

ही घटना १४ मार्च २०२५ रोजी सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास घडली. प्राप्ती पंकज राजगुरु (वय ७) ही आपल्या घरासमोरून शेजारी चालत असताना, रोहित पाटील हा भरधाव वेगाने स्कूटी चालवत येत होता. स्कूटीवरील नियंत्रण सुटल्याने त्याने मुलीला पाठीमागून जोरदार धडक दिली. धडकेमुळे मुलगी फिरून खाली पडली, तिच्या डाव्या हाताला गंभीर इजा झाली आणि तिच्या खांद्याचे हाड फ्रॅक्चर झाले. या अपघातानंतर तिच्या आईने तातडीने तिला बार्शीतील मोरे डॉक्टरांकडे उपचारासाठी नेले. प्राथमिक उपचारानंतर तिला हाडांच्या तज्ज्ञ डॉक्टरांकडे नेण्यात आले, जिथे तपासणीत फ्रॅक्चर असल्याचे निष्पन्न झाले.



या घटनेनंतर मुलीची आई तेजस्विनी पंकज राजगुरु यांनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. त्यांनी आरोपी रोहित पाटील याच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

# मयत कर्जदार महिलांचे ५७ लाख १९ हजार रुपयांचे कर्ज माफ

### फॅब्रटेक मल्टीस्टेटच्या निर्णयामुळे अनेक कुटुंबांना दिलासा

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.१८ मार्च-**

सांगोल्यातील फॅब्रटेक मल्टीस्टेटने तब्बल ९० मयत कर्जदार महिलांचे ५७ लाख १९ हजार रुपयांचे कर्ज माफ करून माणूसकी जपली आहे. सदर कर्जदार मयत महिलांच्या नातेवाईकांना महिला दिनाचे औचित्य साधून कर्जमाफीचा दाखला देखील देण्यात आला. फॅब्रटेक उद्योग समूहाचे भाऊसाहेब रुपनर यांच्या या निर्णयाचे सर्व स्तरातून कौतुक आणि स्वागत होत आहे.




घरातील एखादा कर्ता पुरुष अचानक गेल्यानंतर त्या कुटुंबाची मोठी हानी होत असते. पण त्याच्यामागे घराची सर्व जबाबदारी त्या घरच्या महिलेवर येत असते. परंतु कुटुंबातील महिलेचे जर काही बरे वाईट झाले तर त्या घराचा आधारच नाहीसा होतो. त्यातच जर एखाद्या वित्तीय संस्थेचे कर्ज संबंधिताकडे असेल तर त्या कुटुंबाची आणखी अडचण होते. घराचा मुख्य माणूसच नाहीसा झाला तर त्या कुटुंबाची होणारी आर्थिक कोंडी, घरावर ओढवणारे सावट यासर्व गोष्टींची सामाजिक जाणिव लक्षात घेऊन फॅब्रटेक मल्टीस्टेटने आपल्या कार्यक्षेत्रातील एकूण ९० मयत कर्जदार महिलांचे थकीत पडलेले ५७ लाख १९ हजार रुपयांचे कर्ज माफ करीत त्यांच्या कुटुंबियांना मोठा आधार देण्याचे काम केले आहे.

संस्थेने स्वतःच्या नफ्यातील स्वनिधितून वरील कर्ज माफ करण्यात आले अहे.

> मयत कर्जदार महिलांच्या कुटुंबीयांच्या सांत्वन भेटीवेळी भाऊसाहेब रुपनर यांनी संस्थेने त्यांचे कर्ज पूर्ण सुरक्षित केले आहे. तुम्ही काळजी करू नका असा धीर दिला. संस्था आमच्या अडचणीच्या वेळी अगदी देवासारखी धावून आली, असे उद्गार संबंधित ९० कुटुंबातील नातेवाईकांनी काढले. गोरगरिबांची प्रत्येक पै ना पै सुरक्षित राहिली पाहिजे. शोषित, वंचित घटकाला संस्थेचा लाभ झाला पाहिजे. सभासदाने कर्जात गुरफटून राहण्यापेक्षा कर्ज घेवून उद्योग उभारुन प्रगती करावी व जीवनमान उंचवावे हा आग्रह आहे . अडचणीच्या वेळी अथवा कर्जदार मयत झाल्यास त्याची झळ कुटुंबाला बसू नये, कुटुंब उद्ध्वस्त होवू नये म्हणून त्यांच्या दूरदृष्टीने स्वनिधितून अशा सभासदांना कर्जमाफी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
> **-भाऊसाहेब रुपनर, संस्थापक चेअरमन, फॅब्रटेक मल्टीस्टेट को-ऑप.क्रेडिट सोसायटी लि.सांगोला**

**CHANGE IN NAME**

I **SAMEER JAHANGIR KHAN** (new name) residing at **FLAT NO. 7, PARIJAAT COMPLEX, 158/A, RAILWAY LINES, SOLAPUR - 413001,** do hereby declare that I have changed my (old name) **SAMEER JAHANGIRKHAN KHAN** and in future I would be known by my new name as **SAMEER JAHANGIR KHAN.**



## सेवावर्धिनीच्या 'सेवातरंग ३.०' उपक्रमात सामाजिक संस्थांच्या कार्याचा गौरव

### महाराष्ट्रातून ७६ संस्थांच्या प्रतिनिधींची उपस्थिती

**पुणे, दि. १८ मार्च-**

सेवावर्धिनी या संस्थेचे माध्यम ातून 'सेवा तरंग ३.ज' या नावाने सेवा संस्थांसाठी प्रशिक्षण संमेलन आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उदघाट्न रा. स्व. संघाचे प्रांत कार्यवाह डॉ.प्रविण दबडघाव यांच्या हस्ते भारतमाता आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाले.

यावेळी व्यासपीठावर कै. डॉ. मनोहर डोळे फाउंडेशन चे विश्वस्त डॉ. संदीप डोळे, सेवावर्धिनी चे कार्याध्यक्ष सुहास लुंकड, कार्यवाह सोमदत्त पटवर्धन, मुख्य कार्यकारी अधिकारी गिरीश देगांवकर उपस्थित होते. यावेळी भगीरथ ऑफ मॉडर्न ईरा या पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते झाले. डॉ. संदीप डोळे यांनी मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र यासाठी संस्थांनी पुढाकार घ्यावा, त्यासाठी सर्वतोपरी सहाय्य करण्याचे मान्य केले. सामाजिक संस्थांचे सम ाजात काम वाढवत असताना संस्थेसाठी मनुष्य शोधणे त्यांच्या माध्यमातून संस्थेची दुसरी फळी निर्माण करणे, मनुष्यबळ निर्माण करणे यासाठी आवश्यक मार्गदर्शन करताना माणसे कसे जोडावे याबाबत डॉ.प्रविण दबडघाव यांनी मार्गदर्शन केले.

कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रात थरमॅक्सच्या मेहेर पदमजी यांची मुलाखत झाली. कार्यक्रमाच्या प्रारंभी संस्था क्षमतावर्धन अभियान या सत्रात प्रमोद कुलकर्णी यांनी स्वयंसेवी संस्थांच्या कार्याचा उल्लेख करताना सांगितले की, आपल्या देशात हजारो संस्था कार्यरत असून त्यांचे प्रभावी दस्तऐवजीकरण आणि मूल्यांकन होणे अत्यावश्यक आहे. गिरिजा सिरसीकर यांनी संस्था मूल्यांकनासाठी आवश्यक सहा आयामांविषयी माहिती देत संस्थांनी आपल्या कार्याचे नियमित नोंदी ठेवण्यावर भर दिला. सीएसआर प्रतिनिधींच्या पॅनल चर्चेमध्ये पारुल वैद्य, बागेश्री मंठाळकर, प्रमोद परांजपे आणि गिरीश देगावकर यांनी सहभागी होत सी एस आर निधी कसा प्रभावीपणे मिळवता येईल याविषयी मार्गदर्शन केले. त्यांनी स्पष्ट केले की, सामाजिक संस्थांनी आपल्या प्रकल्पांचे नियोजन प्रभावीपणे मांडावे, देणगीदारांच्या प्राधान्य क्षेत्रानुसार प्रस्ताव तयार करावेत आणि प्रशासकीय खर्चाबाबत कंपन्यांशी संवाद साधावा. यानंतर ज-जैवविविधतेचा या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी लेखक डॉ. सुमंत पांडे उपस्थित होते व त्यांनी त्यांचे मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या समारोपात उपेंद्र कुलकर्णी यांनी प्रत्यक्ष कार्य करणाऱ्या संस्थांनी आपल्या कार्याचे दस्तऐवजीकरण करण्याचे महत्त्व पटवून दिले. सातत्यपूर्ण कार्य आणि संवादातूनच सामाजिक परिवर्तन साधता येते, असे ते म्हणाले. यावेळी व्यासपीठावर चैत्राम पवार, उपेंद्र कुलकर्णी, सुहास लुंकड, सोमदत्त पटवर्धन उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सेवावर्धिनी चे कार्यवाह सोमदत्त पटवर्धन यांनी केले.

# कोर्ट परिसरात बेशिस्त पार्किंगचे दर्शन!

### नो-पार्किंगकडे वाहतूक शाखेच्या पोलिसांची बघ्याची भूमिका

### रंगभवन चौक ते पोटफाडी चौकापर्यंत वाहतुकीची वारंवार कोंडी



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१८ मार्च-**

सोलापूर शहरातील स्मार्ट रस्त्यांवर वाहतुकीचे नियम पाळण्यासाठी वाहतूक पोलिसांचा नेहमी आग्रह असतो. शहरातील कोणत्याही रस्त्यांलगत वाहने थांबल्यावर लगेचच वाहतूक पोलिस नो पार्किंगचा दंड आकारतात. परंतु जेथे अन्यायग्रस्तांना न्याय मिळतो, त्या जिल्हा न्यायालयासमोरील रस्त्यावर सध्या दोन्ही बाजूस बेशिस्तपणे वाहने उभी केली जात आहेत. यांच्याकडे मात्र वाहतूक पोलिस कानाडोळा करीत असल्याचे चित्र दिसत आहे. वकिलांच्या नादी लागायला नको, अशी पोलिसांची सोयीची भूमिका त्या ठिकाणी दिसून येत आहे.

दरम्यान, जिल्हा सत्र न्यायालयाच्या नवीन इमारतीचे बांधकाम सध्या सुरू असून, ते काम पूर्ण व्हायला आणखी किमान दीड वर्ष तरी लागणार आहेत. त्यामुळे कोर्टात चारचाकी वाहनांचे पार्किंग बंद करण्यात आले आहे. त्याचा निर्णय झाल्यावर लगेचच अंमलबजावणी सुरू झाली, परंतु नो पार्किंग''च्या ठिकाणी वाहने लावू नका, असे आवाहन करूनही तसेच विशेष म्हणजे श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयासमोरील मोकळ्या मैदानात वाहने लावण्याचा पर्याय देऊनही त्या ठिकाणी वाहने उभी न करता सोयीच्या ठिकाणी रस्त्यालगतच वाहने उभी केली जात आहेत. त्यामुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होऊन अडथळा निर्माण होत आहे. एरव्ही इतर दुचाकीस्वारांना दंड लावणारे वाहतूक शाखेचे पोलीस, या ठिकाणी मात्र बघ्याची भूमिका घेत आहेत.

कोर्टापासून हाकेच्या अंतरावर सर्वोपचार रुग्णालय असल्याने दररोज शेकडो रुग्णवाहिका रुग्णांना तातडीने दवाखान्यात दाखल करण्यासाठी ये-जा करत असतात. त्यांना देखील या वाहनांमुळे काहीवेळ सावकाश जावे लागत आहे. वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांच्या सांगण्यानुसार, मागील आठवड्यातच त्या ठिकाणी वाहने थांबणार नाहीत, अशी अपेक्षा होती. पण, सद्य:स्थिती जैसे-थे आहे, हे विशेष. रंगभवन चौकातून काही अंतरावर एसटी महामंडळाचा थांबा असल्याने बसगाड्या रस्त्यावरच थांबतात. पुढे रस्त्यालगत हातगाडे उभे असतात आणि तेथूनच लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयाकडे जाण्यासाठी रस्ता दुभाजक अधिकृतपणे तोडलेला आहे. तेथेच महावितरणचे वीजबिल भरणा केंद्र आहे. त्याच्या बाजूला जुन्या कार विक्रीच्या निमित्ताने उभारलेल्या दिसतात. पुढे जिल्हा व सत्र न्यायालय आणि त्याच्यासमोर शासकीय मेडिकल कॉलेज आहे. तरीदेखील, कोर्टासमोरच रस्ता दुभाजक तोडलेला आहे. त्यासाठी परवानगी घेतली की नाही, याची माहिती वाहतूक पोलिसांकडे देखील नाही. अशातच कोर्टासमोरील रोडवर दोन्ही बाजूला बेशिस्तपणे कार, दुचाकी उभ्या असतात. सिव्हिल चौक ओलांडून पुढे गेल्यावर रुग्णालयासमोरील फ ुटपाथवर अतिक्रमण करून चहाची दुकाने थाटली असून, रस्त्यावरच रुग्णवाहिका थांबलेल्या दिसतात. रुग्णालयाच्या भिंतीलगत निराश्रित लोकांचे वास्तव्य पाहायला मिळते. असा सगळा प्रकार दररोज अधिकाऱ्यांना दिसतो, तरीदेखील सगळेजण केवळ बघ्याची भूमिका घेतात, याचे आश्चर्यच!

> **वाहतुकीचे तीन तेरा**
>
> गजबजलेल्या या रस्त्यांवर नेहमी वाहतुकीचे तीन तेरा वाजलेले दिसतात. कोर्टातील काम काजासाठी आलेले आशिल तसेच वकील यांची वाहने रस्त्यांच्या दुतर्फा उभी करण्यात येतात. अशातच विविध फेरीवाले व हातगाडे विक्रेत्यांची देखील येथे गर्दी दिसून येते. त्यामुळे रोडवरील वाहतुकीला अडथळा निर्माण होऊन किरकोळ व गंभीर स्वरूपाचे अपघात होत आहेत. या समस्याकडे मात्र वाहतूक शाखेच्या पोलिसांचे सातत्याने दुर्लक्ष होताना दिसत आहे. अशा बेशिस्त वाहनधारकांवर आता कारवाई करण्याची गरज निर्माण झालेली आहे.
>
> **- किरण गायकवाड, जेष्ठ नागरिक**

## आरटीईअंतर्गत ५९५ बालकांनी घेतला नाही प्रवेश



### आरटीईअंतर्गत १,८०७ प्रवेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ मार्च -**

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार (आरटीई) कायद्यांतर्गत मुदतीअखेर शनिवार १५ मार्चपर्यंत जिल्ह्यातील निवड झालेल्या दोन हजार ४४३ पैकी एक हजार ८०७ बालकांनी प्रवेश घेतला. ५९५ बालकांनी प्रवेश नाकारला आहे.

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार (आरटीई) कायद्यांतर्गत दुर्बल वंचित घटकातील बालकांना स्वयं अर्थसहाय्यित शाळा, विनाअनुदानित शाळा, पोलिस कल्याणकारी शाळांतील २५ टक्के राखीव जागांवर प्रवेशासाठी १० फेब्रुवारीपासून प्रक्रियेला सुरवात झाली होती. प्रवेशासाठी २८ फेब्रुवारीपर्यंत अंतिम मुदत होती. मात्र, १० मार्चपर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. जिल्ह्यातील निवड झालेल्या दोन हजार ४४३ पैकी १ हजार ८०७ बालकांनीच प्रवेश घेतला आहे . उर्वरित ५९५ बालकांनी प्रवेश घेतला नाही. दरवर्षी या निवड प्रक्रियेत व पालकांनी देण्याच्या कागदपत्रांबाबत अडचणी येत आहेत. त्यामुळे अनेक बालक पात्र असूनही त्यांना प्रवेश घेता येत नाही. अनेक पालक नाराजी व्यक्त करत या प्रक्रियेला उशीरही होत असल्याचे सांगत आहेत. त्यामुळे या प्रक्रियेचा वेग वाढवून अधिक पारदर्शकता आणावी अशी पालकांमधून मागणी होत आहे.

> **दुसरी प्रतीक्षा यादी २४ मार्चपर्यंत प्रक्रिया**
>
> एकूण २८६ शाळांमधील २,४४३ जागांपैकी १८०७ बालकांनी प्रवेश घेतला आहे, तर ५९५ बालकांनी प्रवेश नाकारला आहे. ७ बालकांचे प्रवेश रद्द करण्यात आली आहेत. आरटीई प्रवेशाची दुसरी प्रतीक्षायादी १८ मार्चपासुन सुरू झाली असून २४ मार्चपर्यंत प्रक्रीया सुरू राहणार आहे. पालकांनी प्रवेश निश्चित करून संबंधित शाळेत प्रवेश घेण्याचे आवाहन प्राथमिक शिक्षण विभागाने केले आहे.

**तालुकानिहाय आकडेवारी**

| तालुका | जागा | प्रवेश घेतलेले | गैरहजर |
|---|---|---|---|
| अक्कलकोट | ८८ | ८८ | २३ |
| बार्शी | ३१० | २२६ | ८४ |
| करमाळा | १५६ | १०७ | ४९ |
| माढा | २३८ | १८४ | ५३ |
| माळशिरस | २७८ | २१९ | ५९ |
| मंगळवेढा | ७७ | ४४ | ३२ |
| मोहोळ | १५१ | ११७ | ३१ |
| पंढरपूर | ३३० | २३२ | ८५ |
| सांगोला | १९२ | १४० | ४६ |
| उत्तर सोलापूर | १५९ | १२४ | ३२ |
| दक्षिण सोलापूर | १३४ | १०४ | ३० |
| सोलापूर शहर | १८१ | १४६ | २८ |
| सोलापूर शहर | १५० | १०० | ४३ |



## महाबोधी महाविहाराचे संपूर्ण व्यवस्थापन बौद्धांच्या ताब्यात द्या

### सोलापुरात रिपाइंच्यावतीने धरणे आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ मार्च-**

महाबोधी महाविहाराचे संपूर्ण व्यवस्थापन बौद्धांच्या ताब्यात द्या या मागणीसाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाच्या वतीने सोलापुरात पक्षाचे प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा परिषदेच्या उपोषण गेट समोर धरणे आंदोलन करण्यात आले. जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

प्रारंभी आंदोलन स्थळी प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांच्या हस्ते तथागत गौतम बुद्ध आणि विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मूर्तीचे पूजन करण्यात आले. सामुदायिक बुद्ध वंदना घेण्यात आली. जय भीम, जग मे बुद्ध का नाम है यही भारत की शान है, महाबोधी म हाविहाराचे व्यवस्थापन बौद्धांच्या ताब्यात द्या आदी घोषणांनी परिसर दणाणून सोडला.

बुद्धगया येथील महाबोधी म हाविहार अतिक्रमण मुक्त करण्यात यावे. बुद्धगया येथील महाबोधी महाविहार १९४९ चा व्यवस्थापन ॲक्ट मध्ये तात्काळ दुरुस्ती करून महाबोधी महाविहाराचे संपूर्ण व्यवस्थापन हे बौद्धांच्या हाती देण्यात यावे. बुद्धगया महाबोधी महाविहार येथे सुरू असलेल्या महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनातील सर्व मागण्या त्वरित मंजूर करण्यात याव्यात आदी मागण्यांकडे यावेळी लक्ष वेधण्यात आले.

या मागण्यांची तात्काळ कार्यवाही करावी अन्यथा महाराष्ट्रभर मोठे आंदोलन उभारण्यात येईल असा इशारा यावेळी प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांनी दिला आहे. या आंदोलनात प्रदेश उपाध्यक्ष के. डी. कांबळे, शहराध्यक्ष अतुल नागटिळक, राजेश उबाळे, रवी गायकवाड, श्याम धुरी, अविनाश मडीखांबे, लक्ष्मण रणदिवे, सुग्रीव जेटीथोर, अरुण भालेराव, सुशील सरवदे, शिवम सोनकांबळे, राजा दावणे, शिवानंद उबाळे, समीर नदाफ, पवन थोरात यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## २० मार्चला रोजगार मेळाव्याचे आयोजन

**सोलापूर, दि. १८ मार्च-**

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, सोलापूर मॉडेल करियर सेंटर, व महात्मा बसवेश्वर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हयातील नोकरी इच्छुक उम ेदवारांसाठी गुरुवार, दि. २० मार्च २०२५ रोजी पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त संगीता खंदारे यांनी दिली. जिल्ह्यातील नोकरी इच्छुक उम ेदवारांना रोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टिने सदर रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला असून,या रोजगार मेळाव्यात १० वी, १२ वी, आय.टी.आय. वेल्डर, फिटर, डिप्लोमा, ग्रॅज्युएट, ऑफिस असिस्टंट, कोणतीही पदवी, इलेक्ट्रीशीय, मशिन ऑपरेटर, बी. कॉम, एम. कॉम, अशा प्रकारची एकुण ३५० पेक्षा जास्त रिक्तपदे १६ उद्योजकांनी ऑनलाईन अधिसुचित केलेली आहेत. नोकरी इच्छुक उमेदवारांनी बायोडेटांच्या तीन प्रती आणि कागदपत्रासह गुरुवारी दिनांक २० मार्च २०२५ रोजी सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत महात्मा बसवेश्वर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, विजापूर रोड, सोलापूर येथे मुलाखतीसाठी उपस्थित रहावे.



## पिरॅमिड स्पिरिच्युयल ट्रस्टतर्फे ध्यान व ज्ञानसत्र कार्यशाळेस उत्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ मार्च-**

ब्रह्मर्षि पितामह सुभाष पत्रीजी यांनी संपूर्ण जगामध्ये भगवान गौतम बुध्दांनी सांगितलेल्या आनापानसती या श्वास ध्यानाचा प्रसार केला. पिरॅमिडवर संशोधन करून त्याच्या उपयोगाने ध्यान अत्यंत प्रभावी होते, हे सिध्द केले. ध्यानामुळे शरीर आणि मनाचे आरोग्य हे औषधांशिवाय उत्तम होते हा अनुभव अनेकांनी घेतला आहे. दि सोलापूर पिरॅमिड स्पिरिच्युअल ट्रस्टतर्फे अंत्रोळीकर नगर येथील रघुनंदन अपार्टमेंट व जुना विडी घरकुल येथील श्री गणेश पिरॅमिड ध्यान मंदिर येथे पाच दिवशीय ध्यान व ज्ञान सत्राचे कार्यशाळा संपन्न झाली.

अंत्रोळीकर नगर येथील रघुनंदन अपार्टमेंट येथे ध्यानसत्राचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी दीपा मेहता यांनी ''ध्यान विज्ञान'' या विषयावर वर्ग घेतले. त्याचबरोबर नेहा मिरजगावकर यांनी ध्यानाचे सत्र घेतले. दुसरा दिवस उन्मनी जंगे यांनी ''श्वास विज्ञान'' या विषयावर माहिती दिली. ब्रह्मर्षि पत्रीजी यांच्या शिकवणीचा आधारस्तंभम्हणजे श्वासच आपला गुरु याची माहिती जंगे यांनी करून देत ब्रेथ वर्कचे छोटे प्रयोग करून घेवून पुढे ध्यानसत्र चालू केले. तिसऱ्या दिवशी कविता मिरजगावकर यांनी पीएसएसएम चा पाया म्हणजे पिरॅमिड यांची माहिती देत पिरॅमिडचे महत्व, फायदे समजावून सांगितले. त्यासोबतच वर्षा कत्ते यांनी पिरॅमिड कसे बनवायचे याचे प्रात्याक्षिक करून दाखवून दिले. चौथा दिवशी पीएसएसएमचे १८ सुत्रे याबद्दलची माहिती स्मिता दुधनकर यांनी दिली. अतिशय सोप्या भाषेत पीएसएसएमचे कार्य त्यांनी समजावून सांगितले. शेवटच्या दिवशी जुना विडी घरकुल येथील श्री गणेश पिरॅमिड ध्यान मंदिर येथे आयोजित करण्यात आले. यादिवशी नेहा मिरजगावकर यांनी पॉवर ऑफ यावर ध्यानसत्र झाले. ब्रह्मर्षि पत्रीजींनी सांगितलेल्या विचारांचे परिणाम, विचारांचे प्रकार, भावनिक व भौतिक पातळीवर होणारे बदल समजून सांगितले. या ध्यान सत्रात जवळजवळ ५० ते ७५ महिला, पुरुष तसेच युवकांनी सहभाग घेतला.

# मराठी नववर्षाची बाजारपेठेत एकच लगबग !

### गुढीपाडव्यानिमित्त साखरेचे हार बनविण्यात कारागीर व्यस्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ मार्च-**

सनातन वैदिक हिंदू धर्मामध्ये गुढीपाडव्याला अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. याच गुढी पाडव्याच्या दिवसापासून मराठी नववर्षाला सुरुवात होते. प्रत्येक मराठी बांधव आपल्या घरावर नववर्षाचे प्रतीक असणाऱ्या गुढीची उभारणी करतात. त्याचपार्श्वभूम ीवर गुढीपाडव्याला आवश्यक असणाऱ्या साखरेंचे हार बनवण्यात सध्या कारागीर व्यस्त असल्याचे चित्र आहे. शहरातील भुई गल्लीमध्ये साखरेचे हार बनवण्याचे कामकाज एक महिन्या अगोदर पासून सुरू झाले आहे. साखरेचे गरम गरम पाक लाकडी नक्षीदार साच्यामध्ये ओतले जाते. त्यानंतर साच्यातून साखरेचे नक्षीदार हार तयार केले जात आहेत. यासाठी विशेष कारागीर आणि महिला कामगार गेल्या



महिनाभरापासून दिवसरात्र राबत आहेत.

दरम्यान, गुढीपाडव्याच्या पार्श्वभूमीवर कारखान्यामध्ये साखरेपासून आकर्षक असे लहान मोठे मध्यम आकाराचे हार बनवले जात आहेत. उकळवलेल्या साखर पाकच्या माध्यमातून सागवानी लाकडावरील नक्षीकामाच्या साह्याने सदरचे लहान मोठे हार तयार केले जातात. घाऊक बाजारामध्ये हारांची म ागणी वाढलेली आहे. यामध्ये चंपाकली, अनारकली, चक्र, जावाईहार, पिंपळ हार, असे विविध प्रकारचे हार बनवण्यात येत आहेत. सोलापूर शहरातील विविध बाजारात सध्या साखरेचे हार विक्रीसाठी उपलब्ध झाले आहेत. त्या अनुषंगाने शहरातील मधला मारुती, कुंभार वेस अशा किरकोळ बाजारात साखरेचे हार १०० ते १५० रुपये किलो याप्रमाणे विक्री केले जात आहेत. गुढीपाडवा हा मराठी नवीन वर्षाचा सण दृष्टीक्षेपात आल्याने सर्वत्र गुढी पाडव्याची लगबग सुरू असल्याचे चित्र दिसून येत आहे.

> **गुढीपाडव्याला साखरेच्या हारांना मागणी**
>
> साडेतीन शुभ मुहूर्तापैकी एक असणाऱ्या गुढीपाडव्याला ग्राहकांमधून जावई हराला सर्वाधिक मागणी असते. नवविवाहित दांपत्यांना खोबऱ्याचे तसेच साखरेचे हार देऊन सण साजरा केला जातो. तसेच पुढारी हार देखील मोठ्या प्रमाणात विक्री केला जातो. चिमुकल्या बालगोपाळांना परिधान करण्यासाठी छोटे हार देखील उपलब्ध असतात

> **साखरेच्या हारांचे दर १०० ते १५० रुपयांपर्यंत**
>
> सध्या सोलापूर जिल्ह्यासह धाराशिव, उमरगा,लातूर, तुळजापूर शहरात हारांची मागणी वाढत आहे. दर १०० रुपयांपासून ते १५० रुपये किलो याप्रमाणे आहेत. तर जावाई आणि पुढारी हारांचे दर ५०० ते १००० रुपये इतके आहेत. यांसह रंगीत हार देखील उपलब्ध आहेत.
>
> **-बंडू सिद्धे, घाऊक व किरकोळ विक्रेते**

> **साखरेच्या हारांना अधिक महत्व**
>
> सनातन वैदिक हिंदू धर्मामध्ये गुढीपाडव्याला अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. गुढी पाडव्याच्या साडेतीन शुभ मुहूर्तापैकी एक शुभ मुहूर्तावर गुढी उभारली जाते. त्या गुढीला साखरेचे हार घालून यथोचित पूजा संपन्न केली जाते. त्याच पद्धतीने नवविवाहित दांपत्यांना साखरेचे खोबऱ्याचे हार दिली जातात. चिमुकल्या बालगोपाळांना देखील नवीन कपडे तसेच खोबऱ्याचे व साखरेचे हार घातले जातात.
>
> **- आनंद जोशी, ग्राहक**

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## शेष बाकी... पांडुरंग या आत्मकथनाचा रविवारी प्रकाशन सोहळा




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ मार्च-**

सेवानिवृत्त उपविभागीय कृषी अधिकारी पांडुरंग जाधव लिखित ''शेष बाकी... पांडुरंग'' या आत्म कथनाचा प्रकाशन सोहळा रविवार दि. २३ मार्च रोजी सकाळी १०.३० वाजता सोलापुरातील शिवस्मारक सभागृह येथे आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती प्रकाशक राजेंद्र भोसले यांनी पत्रकार परिषदेत दिली. माजी आ. विनायकराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आणि ज्येष्ठ विधीज्ञ धनंजय माने यांच्या हस्ते या पुस्तकाचे प्रकाशन होणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ऊर्जा क्षेत्रातील तज्ञ डॉ. मुरहरी केळे, ज्येष्ठ पत्रकार रवींद्र पोखरकर आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. यावेळी माजी कृषी संचालक अशोक लोखंडे, मसापचे जिल्हा प्रतिनिधी पद्माकर कुलकर्णी आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. शिवप्रज्ञा प्रकाशनने हे पुस्तक प्रकाशित केले आहे. शिक्षण कालावधी, नोकरीतील अनुभव आणि कौटुंबिक कलहातील अनेक अविस्मरणीय प्रसंग या आत्मकथनाद्वारे अभिव्यक्त केले आहेत, असे लेखक पांडुरंग जाधव यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस मनीषा जाधव, वैभव जाधव, अशोक महंत आदी उपस्थित होते.



### ▶▶ संक्षिप्त वृत्त...

### सेहान चाँदा याचा पहला रोजा

**सोलापूर, दि.१८ मार्च-**



साखर पेठ येथील व मनपा उर्दू शाळेचा विद्यार्थी महंमद सेहान अ. माजीद चाँदा याने रमजान महिन्यात आयुष्यातील पहिला रोजा पूर्ण केला झाला. सेहान याचा सर्व नातेवाईकांकडून अभिनंदन होत आहे.

### भाच्याकडून मामाला चोप

**सोलापूर, दि.१८ मार्च-**

शहरातील शांती चौकात भाच्याने मामाला चांगलाच चोप दिल्याने मामा जखमी झाला. याबाबत हरिदास राम कांबळे (वय २७, रा. शांती चौक, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरुन विशाल संदीपान सकट (वय २७, रा. मानेवारी, ता. तुळजापूर, जि. धाराशिव, सध्या रा. मुंबई) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशाल सकट याचा हरिदास कांबळे हा मामा आहे. १७ मार्च रोजी दुपारी हरिदास कांबळे हे घरी जात असताना यास विशाल सकट याने शांती चौकात कांबळे यास अडवून माझी आई कोठे आहे व माझ्या आईस कुठे लपवलास असे म्हणून कांबळे यांना शिवीगाळ करून लाथाबुक्क्याने व दगडाने मारहाण करून जखमी केले. म्हणून जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार राठोड पुढील तपास करीत आहेत.



### मंजुनाथ नगरात १६ हजारांची घरफोडी

**सोलापूर, दि.१८ मार्च-**

शहरातील मंजुनाथ नगरमधील बंद घर फोडून चोरट्याने १६ हजारांचे साहित्य चोरून नेले.याबाबत अनुराधा प्रल्हाद जाधव (वय ४४, रा. वसंत नगर, दर्गाजेल, विजापूर, कर्नाटक) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अनुराधा जाधव १५ मार्च रोजी घराला कुलूप लावून परगावी गेल्या होत्या. त्यावेळी चोरट्यानो जाधव यांच्या मंजुनाथ नगरातील चर्चच्या समोर असलेल्या घराचे मुख्य दरवाजाचे कुलूप तोडून घरात प्रवेश करून लोखंडी कपाटाचे लॉक कशानेतरी तोडले. कपाटातील लॅपटॉप, ताब्यांचा हंडा, दोन वापरती भांडी, दोन गॅस टाक्या, पाण्याची इलेक्ट्रिक मोटार असा १६ हजार रुपये किंमतीचे साहित्य चोरून नेले. म्हणून सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस नाईक जाधव पुढील तपास करीत आहेत.

### दुचाकीच्या धडकेत एकजण जखमी

**सोलापूर, दि. १८ मार्च-**

दुचाकीच्या धडकेत एकजण जखमी झाला असून याबाबत एमआयडीसी पोलिस ठाण्यात धडक देणाऱ्या दुचाकीस्वाराविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत सिध्दांत शाम पटणे (वय ४०, रा. कृष्णा नगर, कुमठा नाका, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अथर्वराज तुकाराम कोळी (रा. टिळक नगर, मजरेवाडी, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १७ मार्च रोजी दुपारी मदिना चौकात अथर्वराज कोळी याने त्याच्या ताब्यातील एमएच १३ ईएन ३४५५ ही निष्काळजीपणे चालवून धडक दिली. यामध्ये पटणे हे जखमी झाल्याने याबबात एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार पवार पुढील तपास करीत आहेत.

### महावीर चौकातून २५ हजारांची दुचाकी चोरीस

**सोलापूर, दि.१८ मार्च-**

शहरातील महावीर चौकातून चोरट्याने २५ हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरून नेली. याबाबत सुनिल शंकर विटकर (वय ३०, रा. चिंतलवार वस्ती, मोदीखाना, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुनिल विटकर यांनी त्यांची एमएच १३ डीसी ६४०७ क्रमांकाची दुचाकी ही १५ मार्च रोजी सायंकाळी महावीर चौकात हॅन्डल लॉक करून दंत हॉस्पीटल येथील पार्किंगमध्ये पार्क केली होती. ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद पोलिसांकडे करण्यात आली आहे. पोलिस हवालदार चव्हाण पुढील तपास करीत आहेत.

# १४ महिन्यात जिल्ह्यातील ५० शेतकऱ्यांनी संपविले जीवन

### एकट्या बार्शी तालुक्यातील २८ शेतकऱ्यांच्या आत्महत्या

### बार्शी लोकप्रतिनिधी अन् जिल्हा प्रशासनाने लक्ष देण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ मार्च-**

राज्यात प्रतिवर्षी अडीच ते तीन हजार शेतकरी बांधव नैसर्गिक आपत्ती किंवा इतर विविध कारणांमुळे आत्महत्या करू लागले आहेत; खरंच ही गंभीर बाब आहे. यामध्ये अमरावती, संभाजीनगर भागात सर्वाधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे आकडे समोर येत आहे. याच धर्तीवर सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यातही शेतकऱ्यांचे आत्महत्या करण्याचे प्रमाण वाढल्याने बार्शी तालुक्याचे लोकप्रतिनिधी आणि जिल्हा प्रशासनाने या भागातील शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी पावले उचलण्याची मागणी बार्शी तालुक्यातील जाणकार शेतकरी, नागरिकांची आहे.

कर्जबाजारीपणा, नापिकी, महागाईमुळे बिकट झालेली आर्थिक परिस्थिती, गेल्या वर्षीची अतिवृष्टी, सावकारी कर्जाचा तगादा, जिल्ह्यात पडणाऱ्या दुष्काळाचे संकट अशा विविध कारणास्तव सोलापूर जिल्ह्यातही शेतकरी आत्महत्या वाढू लागल्या आहेत. २०२४ सालात म्हणजेच गतवर्षी पूर्ण ११ तालुक्यात ३५ शेतकऱ्यांनी वर्षभरात आत्म हत्या केल्या आहेत. यामध्ये बार्शी तालुक्यात सर्वाधीक १७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. तर २०२५ या नवीन वर्षात जानेवारी-फेब्रुवारी या दोन महिन्यात १५ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असून, यातील तब्बल ११ शेतकरी बार्शी तालुक्यातील आहेत. तर इतर तालुक्यातील उर्वरित शेतकरी आहेत. एकंदरीत, यंदा अवघ्या २ महिन्यात बार्शी तालुक्यातील ११ शेतकऱ्यांनी आपले जीवन संपविले आहे.



तर १४ महिन्यात जिल्ह्यातील ५० शेतकऱ्यांनी विविध कारणास्तव आपले जीवन संपविले आहे. यातील अवघ्या १० शेतकऱ्यांनी नापिकी, कर्जबाजारीपणा अन् बँकांचा वसुली तगादा या कारणास्तव आत्महत्या केल्याने शासनाकडून या शेतकऱ्यांना मदतीचा हातही देण्यात आल्याची माहिती जिल्हा प्रशासनाच्या आपत्ती विभागातून मिळाली.

### ७/१२ वरील बोजा कमी करण्यासाठी कर्जमाफीची मागणी

आम्ही सत्तेत आल्यानंतर जगाच्या पोशिंद्याला अशी मदत करू, तशी मदत करू, अशा जाहीर बतावण्या प्रत्येक राजकीय पक्षांच्या नेत्यांकडून निवडणुकांत जाहीर व्यासपीठावरून केल्या जात होत्या. मात्र, वास्तविक कोणत्याही पक्षाचे सरकार सत्तेत आल्यानंतर या बतावण्या दूर तर जातात शिवाय शेतकऱ्यांच्या मदतीसाठी अटी आणि नियमांकडे बोट दाखवले जाते. त्यामुळे कधी कधी शेतकऱ्याला आपलं सगळं काही संपलं असं वाटून थेट मृत्यूला कवटाळण्याच्या अनेक घटना घडत आहेत. सोलापूर जिल्ह्यात मागील १४ महिन्यात ५० शेतकऱ्यांनी आपली जीवन यात्रा संपवली आहे. यामुळे आता त्यांच्या डोक्यावरील कर्जाचा बोजा कमी करण्यासाठी सरसकट कर्जमाफी देण्याची मागणी पुन्हा पुढे येत आहे.

### ८० टक्के आत्महत्या सरकारी निकषाबाहेर

आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना दिलासा देण्यासाठी राज्य सरकारच्या वतीने शेतकऱ्यांच्या मृत्यूपश्चात कुटुंबीयांना एक लाख रुपयांची सरकारी मदत देण्याची योजना आहे, मात्र सरकारच्या या योजनेत ७० ते ८० टक्के शेतकरी बसत नाहीत त्यामुळे आत्म हत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना मदतीपासून दूर राहावे लागत आहे. १४ महिन्यात ५० शेतकरी आत्महत्या घडल्या अन् १० शेतकऱ्यांना शासनाकडून मदतीचा हात मिळाला आहे. म्हणजेच ८० टक्केच्यावर शेतकऱ्यांना या मदतीचा लाभ मिळत नसल्याचीही खंत काही शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

## आज सादर होणार जिल्हा परिषदेचा अर्थसंकल्प



### नवीन योजनांकडे जनतेचे लक्ष

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ मार्च -**

जिल्हा परिषदेचा २०२५-२६ सालातील अर्थसंकल्प आज मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम सकाळी यशवंतराव चव्हाण सभागृहात सादर करण्यात येणार आहेत. त्यादृष्टीने जिल्हा परिषद प्रशासनाकडून तयारी करण्यात आली असून सर्वच विभागांकडून आवश्यक ती माहिती मागविण्यात आले आहे. जुन्या योजना व नवीन योजनांचे संगम असताना सर्व विभागांना समान निधि असणारा अर्थसंकल्प सादर होणार असल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे जुन्या योजना सुरू ठेऊन नवीन कोणत्या योजना सुरू करण्यात येणार ? याकडे जनतेचे लक्ष लागले आहे. यंदाच्या अर्थसंकल्पात सेस फंडातून ग्रामीण भागातील जनतेचा फायदा होणाऱ्या योजनांची संख्या वाढणार असल्याची सांगण्यात येत आहे.

एकाच विभागात चार किंवा पाच योजनांसाठी निधीची तरतूद करण्यापेक्षा यंदा प्रत्येक विभागासाठी एक किंवा दोन विशेष योजना सेस फंडातून राबविण्याबाबत विचार सुरू आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी नव्या योजना व उपक्रमा संदर्भातील माहिती गोळा करून त्यावर चर्चा केली असून ग्रामीण भागातील जनतेला नवीन योजना देणार आहेत. सन २०२४-२५ या वर्षाचे ४८ कोटी ११ लाखांचे अंदाजपत्रक सादर केले होते. सन २०२३-२४चे मूळ अंदाजपत्रक ४५०६.६८ लाख होते, त्यात मागील वर्षी अंदाजपत्रकात ३०४.९९ लाखांची वाढ करण्यात आली होती. मागील वर्षी शाळा, दिव्यांग, अपंग, शेतकरी, क्रीडा साहित्य, वीज बचत, प्राथमिक आरोग्य, कृषी विभाग, पशुसंवर्धन विभाग, बांधकाम विभाग, समाजकल्याण विभाग, शिक्षण विभाग, आरोग्य विभाग, महिला व बालकल्याण विभाग, कृषी विभाग, जलसंधारण विभाग, ग्रामपंचायत विभाग आदी विभागांच्या योजनांसाठी विशेष निधी तरतूद करण्यात येणार आहे. नावीन्यपूर्ण योजनांवर भर असणार असून, ग्रामीण भागातील लोकांना फायदा होईल, अशा योजनांचा सर्वाधिक समावेश असल्याची माहिती देण्यात आली आहे.



सोलापूर : रंगपंचमीच्या पूर्वसंध्येला मंगळवारी बालनाट्य कलाकार रंगले. त्यांनी रंगपंचमीचा आनंद लुटला. डॉ निर्मलकुमार फडकुले सभागृहात टिपलेले छायाचित्र. (छायाचित्र : केवल तिवारी)

## चारित्र्याच्या संशयावरून विवाहितेचा छळ; पतीसह चौघांविरुध्द गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १८ मार्च -**

चारित्र्याच्या संशयावरून विवाहितेचा छळ करणाऱ्या पतीसह चौघांविरुध्द विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



याबाबत पलक रोहित कांबळे (वय २२, रा. भालेराव वस्ती, अक्कलकोट रेल्वे स्टेशनजवळ, जि. सोलापूर) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन पती रोहित, नणंद संजीवनी, पूजा जाधव, निकिता बोकेफोडे (रा. सिध्दार्थ नगर, कुमठेगाव, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पलक या ३० डिसेंबर २०२३ ते ११ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत सासरी नांदण्यास होत्या. ट्रकचालक पती रोहित हे कामावर गेल्यावर त्याच्या बहिणींनी मिळून पलक हिस घरातील कामे करायला लावली. ती न केल्यास शिवीगाळ करून हाताने मारहाण करून उपाशी ठेऊन मानसिक व शारीरीक त्रास दिला. तसेच पती रोहित याने दारू पिऊन मारहाण करून त्रास दिला. तसेच पलकच्या चारित्र्यावर संशय घेऊन माहेरून ५ लाख रुपये व ५ तोळे सोन्याची मागणी करून पलकला मारहाण केली. म्हणून विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार बर्हिजे पुढील तपास करीत आहेत.

## फताटेवाडी ग्रामपंचायतीत ४ कोटी ४२ लाखांचा अपहार

### सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवकांवर गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ मार्च,**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील फताटेवाडीचे सरपंच हरिशचंद्र राठोड, उपसरपंच आर. व्ही. जाधव व ग्रामसेवक बी. डी. पाटील यांच्यावर ४ कोटी ४२ लाख ९१ हजार ९९३ रूपयाचा अपहरण केल्याप्रकरणी वळसंग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फताटेवाडी ग्रामपंचायतीमध्ये आर्थिक अपहरण झाल्याप्रकरणी फताटेवाडी येथील विनोद रमेश चव्हाण यांनी लोकआयुक्त व पुणे विभागीय आयुक्त यांच्याकडे तक्रार केली होती. त्या तक्रारीची दखल घेवून जिल्हा परिषद बांधकाम विभाग दोनचे कार्यकारी अभियंता यांनी याप्रकरणी चौकशी करून अहवाल सादर केला. याप्रकरणी विस्तार अधिकारी सदाशिव भिमशा कोळी यांनी फिर्याद दिली आहे. फताटेवाडी ग्रामपंचायतीमध्ये १ एप्रिल २०२३ ते १५ ऑक्टोंबर २०२४ अखेर आर्थिक अपहर झाला आहे.




विशेषतः तांत्रिक मान्यता व मोजमाप नोंदवहीमध्ये मूल्यांकन पूर्वी खर्च करणे, एकाच कामावर दोन वेळा खर्च करणे, एकाच कामाचे दुबार मुल्यांकन नोंदविणे, मुल्यांकन पूर्वी खर्च करणे, रोखीने खर्च, एकाच कामासाठी २ यंत्रणा कार्यरत असणे, महाराष्ट्र ग्राम पंचायत लेखासंहिता नियम २०११चे पालन न करणे, कर्मचारी वेतन व वैयक्तीक लाभाच्या योजनेबाबत प्रशासकीय व तांत्रीक मान्यता न घेणे, सन-२०२३-२०२४ मधील १५ वा वित्त आयोग अंतर्गत लेखा संहिता नियम ५१चे पालन न करणे, व्यक्ती/संस्था/ठेकेदार यांचे नावे निविदा प्रक्रियेची अंमलबजावणी न करता देयके अदा करणे, एकाच ठेकेदारास बीड कॅपेसिटी न तपासता अनेक कामे देणे, कॉक्रीट रस्त्यांचे काम काजात अनियमितता, मोजमाप पुस्तिकामध्ये ऑथोरिटी व्यवस्थित न लिहीणे कॉंक्रीटीकरणावर डांबरीकरण करणे, रस्त्यांच्या व भूमीगत गटारांच्या कामांचे तुकडे पाडणे, मंजुर असलेली कामे ग्रामपंचायत हद्दीच्या बाहेर करणे, साहित्याची खरेदी करताना जीईएम पोर्टलचा वापर न करणे, कामांची काही कामे होटगी स्टेशन ग्रामपंचायतीच्या हद्दीमध्ये करणे, सन-२०२३-२०२४ मधील तांत्रीक मान्यता देण्यात आलेल्या कामांच्या संख्येपेक्षा ग्राम पंचातीकडील झालेल्या कामांची संख्याही ग्राम पंचायतीकडील प्रमाणकानुसार जास्त असणे, पदभार हस्तारीत न करणे, चौकशी समितीस दप्तर उपलब्ध न करून देणे, आर. ओ. प्लॉट एटीएम मधील रक्कम ग्रामपंचायत खात्यात जमा न करणे. हा आर्थिक अपहर सरपंच, ग्रामसेवक व उपसरपंच यांच्या संगनमताने झाल्याप्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे.

## राज्य नाट्य स्पर्धेत अमोल देशमुख यांना रौप्य

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१८ मार्च-**

६३व्या मराठी राज्य नाट्य स्पर्धेत अमोल देशमुख यांनी रौप्य पदक संपादिले. सांस्कृतिक कार्य संचालनालयाची मराठी राज्य नाट्य स्पर्धा अंतिम फेरी मुंबई रंगशारदा- बांद्रा येथे संपन्न झाली. महाराष्ट्र गोवा आणि मध्य प्रदेश या तीन राज्यातील एकूण पाच हजारांहून अधिक कलावंतांमधून विक्रमाचा घातांक क्ष या नाटकातील वेताळ या भूमिकेसाठी अमोल देशमुख यांना सर्वोत्कृष्ट पुरुष अभिनयाचे रौप्य पदक मिळाले. या नाटकाला प्राथमिक फेरीमध्ये प्रथम क्रमांक मिळालेला होता. अंतिम फेरीमध्ये परीक्षक शिवदास घोडके, रवींद्र आवटी, संजय पेंडसे, प्रदीप वैद्य आणि शकुंतला नरे यांनी काम पाहिले. या यशाबद्दल सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार तसेच अपर मुख्य सचिव विकास खारगे यांनी अभिनंदन केले.





सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## ज्ञानामृत आनंदलहरी - १०६०

**अर्थी परमार्थ कैसा घडों शके ।**
**चित्त लोभीं भीकें सोंग वाया ।।**

अध्यात्म हे सत्ता, संपत्तीशी संबंधित नाही तर ते मनाच्या श्रीमंतीशी संबंधित आहे. अध्यात्म समजण्यासाठी व त्यातून आपला आपणाला परीचय होण्यासाठी मनाच्या स्थिरतेची गरज असते. अध्यात्म, परमतत्व, आत्मज्ञान, हे इतरांना समजून सांगायचे असो की स्वत:ला समजून घ्यायचे असो, याची पहिली व महत्वाची पायरी म्हणजे मनाची स्थिरता होय. मनच जर अस्थिर असेल किंवा मन कशातही गुंतले असेल तर खरा परमार्थ कळण्याचे कारणच नाही. व्यवहारात मन अडकलेला व्यक्ती प्रवचन, कीर्तन करीत असला तरी त्याला त्यातून परमार्थ घडत नाही. कारण त्याचे लक्ष परमार्थात नसून आर्थिक देवाण-घेवाणीत अडकलेले असते. ज्याच्या चित्ताला धन, धान्याचा लोभ लागला आहे, त्याचे चित्त व्यवहारासाठी भिकारी झालेले असते. त्यामुळे साधुचे किंवा भक्ताचे घेतलेले हे एक प्रकारचे सोंग असते. अशा व्यावहारीक सोंगी लोकांना परमार्थ घडणारच नाही. या अनुषंगाने बोलतांना तुकाराम महाराज म्हणतात,

**अर्थी परमार्थ कैसा घडो शके।**
**चित्त लोभी भीकें सोंग वाया।।**

परमार्थ ही आत्मिक व्यवहाराची बाब आहे, ती आर्थिक व्यवहाराची नाही. आत्मिक व्यवहारात चांगल्या विचाराची, वर्तनाची देवाण घेवाण होते. या व्यवहारात मनाचा मळ धुतला जातो. मुक्तमनाने समोरच्याला ज्ञान दिले जाते व समोरच्या चेहऱ्यावरील मनसोक्त आनंद मुक्तमनाने समोरच्याला ज्ञान दिले जाते व समोरच्या चेहऱ्यावरील मनसोक्त आनंद मुक्तमानाने स्वीकारला जातो. या आत्मिक व्यवहारात ईर्षा, द्वेष, मोह, मत्सर, अहंकार, काम, क्रोध आदींचा नायनाट केला जातो. पण जेव्हा



वैचारिक देवाण घेवाणीची जागा अर्थ/पैसा घेतो, तेव्हा मनाचे दारिद्रय वाढते. मनाचे दारिद्रय जेथे आहे ते परमार्थ असत नाही. कारण परमार्थाचा आधारस्तंभ हा मनाची श्रीमंती आहे. जे लोक मनाचे दारिद्रय जोपासतात, ते इतरांना व स्वत:लाही सुख, समाधान देऊ शकत नाहीत. आपल्या प्रवचन, किर्तनाला किती लोक आले आहेत. आलेल्या लोकांना आपण मन:पूर्वक कांही देऊ शकत आहोत का? आपल्या बोलण्याने त्यांचे समाधान होत आहे का? त्यांच्या मनावरील ताण कमी होत आहे का? आदि प्रश्नांची उत्तरे शोधण्यापेक्षा व्याख्यान लवकर कसे संपेल? लोक भरपूर कसे हसतील? कार्यक्रमानंतर लगेच आपले मानधन मिळेल का? लोक पाया पडताना आपल्यासमोर पैसे ठेवतील का? इत्यादी प्रश्नांचा विचार मनात घोळत असेल तर येथे परमार्थ घडणारच कसा? दुर्दैवाने व्यावहारिक विचार करणाऱ्यांची संख्या वाढत आहे, हे सत्य असले तरी समाजाला चांगली दिशा देणारे खूप संत, महात्मे, प्रवचन, किर्तनकार आजही समाजात आहेत हे विसरता येणार नाही.

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : बुधवार | दिनविशेष - रंगपंचमी, |
| दि. १९ मार्च २०२५ | चांगला दिवस, कानिफनाथ |
| विक्रम संवत् २०८०-८१ | यात्रा मढी - जि. नगर, |
| शके - १९४६ | ....राहू काल.... |
| संवत्सर - क्रोधी नाम | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - फाल्गुन | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| कृ. पंचमी (२४.३६) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - विशाखा (२०.४९) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - हर्षण (१७.३६) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - कौलव (११.२४) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष :** कोणतेही काम करतांना दोनदा विचार करा. आई वडिलांचे आरोग्य चांगले राहील. नौकरीमध्ये अपक्षेप्रमाणे बदली किंवा बढती मिळण्याचे योग आहे.

**वृषभ :** आपल्या कामात दुसऱ्याची मदत घ्या. समाजात कुटुंबात आपले महत्व वाढेल. व्यावसायिक वाद संपुष्टात येतील. दुसऱ्याचा द्वेष करू नका. व्यापारात प्रगती राहील.

**मिथुन :** सामाजिक स्थिती चांगली राहून कार्यक्षेत्रात वाढ होईल. मनोरंजनाच्या संधी उपलब्ध होतील. व्यापारात अपेक्षीत लाभ होईल. घराच्या संबंधी समस्या वाढतील.

**कर्क :** व्यापारात फायदा होईल. शत्रू परेशान होतील. यश, माान, प्रतिष्ठा यामध्ये वाढ होईल. कौटुंबिक वातावरण समाधानकार राहील. दुसऱ्याची नक्कल करू नका. आनंदी रहा.

**सिंह :** प्रतिस्पर्ध्यावर विजय संपादन कराल. व्यवसायात नवीन संबंध जुळून येतील.कौटुंबिक समस्याची चिंता राहील. नौकरीत आपल्याला बढोत्तरी मिळण्याची शक्यता आहे.

**कन्या :** उत्पन्न व खर्च यामध्ये संतुलन राहील. प्रयत्न केला असता व्यापारात येणाऱ्या अडचणी दुर होतील. कौटुंबिक परिस्थती चांगली राहील्यामुळे आनंदी रहाल.

**तुळ :** आजचा दिवस चांगला जाणार आहे. बुद्धी चातुर्याने येणारे संकट दूर होणार आहे. धार्मिक प्रवास होऊ शकतो. व्यापारात प्रगती राहील.

**वृश्चिक :** कुटुंबातील वातावरण तणावपूर्ण राहील. आज आपणास उत्साह वाटणार नाही. व्यापारात नुकसान होण्याची शक्यता आहे. कर्ज वाढणार आहे. मित्रांचे सहकार्य मिळेल.

**धनु :** सर्वच ठिकाणी आपणास यश मिळणार आहे. नवीन संधी मिळतील. कोणचाही राग करू नका. आरोग्याच्या तक्रारी संपणार आहेत.

**मकर :** दुसऱ्यावर विसंबून राहिल्याने नुकसान होण्याची शक्यता आहे. अचानक आलेल्या अडचणीमुळे निराश रहाल. घरातील सदस्यांची चिंता राहील.

**कुंभ :** व्यापारात अचानक फायदा होईल. अपूण राहीलेले कामे पूर्ण होतील. मित्रांना आपण मदत कराल. उत्पन्नापेक्षा जास्त खर्च करू नका.

**मीन :** श्रम व धावपळ झाल्यामुळे आपल्या कामाची गती वाढणार आहे. नवीन संबंध फायदेशीर ठरतील. विद्यार्थ्यांना शिक्षणात यश मिळेल.मुलांच्या कामामुळे दु:खी रहाल.

# शहरातील ६ हजार ७३ अंत्योदय शिधापत्रिकाधारक महिलांना साडी

### अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पाडोळे यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.१८ मार्च-**

अंत्योदय शिधापत्रिकाधारक कुटुंबाला दरवर्षी एक साडी मोफत देण्यासाठी वस्त्रोद्योग विभागामार्फत कॅप्टिव्ह मार्केट योजना सुरु करण्यात आली आहे. शासनाच्या अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या आदेशान्वये अंत्योदय अन्न योजनेतील शिधापत्रिकाधारकांना प्रतिकुटूंब एक साडी मोफत वितरण करण्यात येणार आहे. सोलापूर शहरातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत चार परिमंडळाच्या अधिनस्त असलेल्या रास्त भाव दुकानातून ६ हजार ०७३ साड्या वितरीत करण्यात येणार असल्याची माहिती अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पाडोळे यांनी दिली.

सदर योजनेंतर्गत साड्यांचे वितरण प्रजासत्ताक दिन (दि. २६ जानेवारी २०२५) ते होळी (दि. १३ मार्च २०२५) या सणांच्या दरम्यान करण्याबाबत शासनाने निश्चित केलेले आहे. त्यानुसार राज्यातील प्रत्येक तालुक्यातील



प्रत्येक गावातील रास्त भाव दुकानापर्यंत विहित वेळेत साडया पोहोचतील, याची दक्षता घेण्याबाबत सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाव्दारे राज्य यंत्रमाग महामंडळास कळविण्यात आलेले आहे. पुरवठा करावयाच्या साडीच्या एका गाठीचे वजन हे (१०० साडया) ४१ ते ४६ किलो इतके राहील. सदर साडयाचे वाटप ई-पॉस मशीनव्दारे करण्यात येणार यावे.

महामंडळाकडून तालुका गोदामापर्यंत ज्याप्रमाणे साडयांचा पुरवठा करण्यात येईल त्याप्रमाणात तात्काळ अंत्योदय शिधापत्रिकाधारकांपर्यंत साडयांचे वाटप करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी. तसेच साठवणूक व हाताळणी करताना साड्या खराब होणार नाहीत याची दक्षता घेण्यात यावी.

> शहरातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत अंत्योदय अन्न योजना शिधापत्रिकाधारकांना प्रतिकुटुंब एक साडी मोफत याप्रमाणे परिमंडळ अधिकारी अ, ब, क व ड यांना एकूण ६०७३ वितरीत करण्यात येत आहेत. सन २०२३-२४ मध्ये चार परिमंडळामध्ये ९८ साड्या शिल्लक असून, सन २०२४-२०२५ मध्ये ५९७५ साड्या मंजूर आहेत असून, अशा एकूण ६०७३ साड्या वितरीत करण्यात येणार आहेत. गोदाम पर्यवेक्षक यांनी साडयांचे परमिट निर्देशन पत्रानुसार संबंधित रास्त भाव दुकानदार यांना त्वरीत साडयांचे वितरण करण्यात यावे, असे आदेश अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे यांनी दिले आहेत.

अशा शासनस्तरावरुन सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच अंत्योदय शिधापत्रिकाधारक कुटूंबांना दोन वेळेस साडयांचे वाटप करण्यात आलेले आहे, अशा शिधापत्रिकाधारक कुटूंबांना या योजनेतून सन २०२४-२५ करीता पुरविण्यात येणाऱ्या साडयांमधून वितरण होणार नाही, याची दक्षता घ्यावी.



# विद्यार्थ्यांनी आपल्या क्षमतांवर विश्वास ठेवून ध्येय गाठावे

### संगमेश्वरच्या क्रीडा पारितोषिक वितरणप्रसंगी विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. लकडे

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १८ मार्च-**

आजच्या स्पर्धेच्या युगात दैदिप्यमान यश मिळविण्यासाठी आपल्यामधील क्षमतांचा शोध घेवून त्यावर परीश्रम करुन ध्येय गाठावे. क्रीडा ही केवळ स्पर्धा नसून ती शिस्त, समर्पण व आत्मविकासाची गुरुकिल्ली आहे. विद्यार्थ्यांनी केवळ शैक्षणिक यशाकडे लक्ष न देता शारीरीक व मानसिक तंदुरुस्तीवरही लक्ष केंद्रित करावे, असे प्रतिपादन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ अतुल लकडे यांनी केले.

संगमेश्वर कॉलेजमध्ये ७२ व्या क्रीडा पारितोषिक वितरण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटी व्यवस्थापन समिती सदस्य मा. अण्णाराज काडादी हे होते. तसेच मंचावर संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष सी. बी. नाडगौडा, शैक्षणिक सल्लागार प्रा. प्रमोद दोपाटील, महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. आर. पी. बुवा, उपप्राचार्य प्रा. पी. एन. कुंटे, संगमेश्वर रात्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस. डी. गोठे, कै. अप्पासाहेब काडादी चित्रकला महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. सचिन गायकवाड, जिमखाना प्रमुख डॉ. आनंद चव्हाण, विद्यार्थी प्रतिनिधी जैद शेख हे मान्यवर उपस्थित होते. तसेच या समारंभास श्री सिध्देश्वर सहकारी कारखान्याचे व्हा. चेअरमन श्री. सिध्दाराम चाकोते व श्री सिध्देश्वर देवस्थान समिती सदस्य श्री. आर. एस. पाटील, श्री. विद्याधर मुलगे, पोलीस निरिक्षक श्री. उमाकांत शिंदे, या मान्यवरांची विशेष उपस्थिती होती.

या कार्यक्रमाची सुरुवात प्रिया पाटील हिच्या ईशस्तवनाने व संगमेश्वर गीताने झाली. स्वागत व प्रास्ताविक प्र. प्राचार्य डॉ. ऋऋतुराज बुवा यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. लिना खमितकर यांनी करुन दिला. जिमखाना विभाग अहवाल वाचन व वरिष्ठ विभाग क्रीडा पारितोषिक यादी वाचन डॉ. आनंद चव्हाण यांनी केले. तसेच विक्रांत विभूते यांनी कनिष्ठ विभाग तर प्रा. शरण वांगी यांनी संगमेश्वर रात्र महाविद्यालयाच्या क्रीडा पारितोषिक यादीचे वाचन केले. याप्रसंगी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते खेळाडूंना मार्गदर्शन करणाऱ्या क्रीडाप्रशिक्षकांचा व यशस्वी खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे आभार विद्यार्थी प्रतिनिधी जैद शेख यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. पुष्पांजली मेत्री, प्रा. कोमल कोंडा, प्रा. संतोष पवार यांनी केले.

# आंतरजातीय विवाह करणाऱ्या ३०१ जोडप्यांना दीड कोटींचे अनुदान

### तीन वर्षांनंतर विवाह अनुदान वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ मार्च-**

आंतरजातीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना केंद्र आणि राज्य शासनाकडून ५० हजार रुपये प्रोत्साहनपर अनुदान देण्यात येते. आंतरजातीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना अनुदानासाठी शासनाने एक कोटी ६१ लाख रुपयांचा निधी समाजकल्याण विभागाला दिला आहे. तीन वर्षांपासून अनुदानाच्या प्रतीक्षेत असलेल्या जोडप्यांना दिलासा मिळाला आहे. ३१ मार्चपूर्वी अनुदान मिळणार आहे.

या योजनेंतर्गत आंतरजातीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना ५० हजार रुपये तर २०१० पूर्वी विवाह झाला असेल आणि त्या जोडप्याने या योजनेचा लाभ घेतला नसल्यास त्या जोडप्याला १५ हजार रुपये प्रोत्साहन अनुदान दिले जाते. यातील ५० टक्के रक्कम केंद्र व ५० टक्के रक्कम राज्य सरकारकडून अनुदान स्वरूपात दिली जाते.

२०२२-२३ ते २०२४-२५ या तीन वर्षांत शासनाकडून अनुदान प्राप्त झाले नव्हते. त्यामुळे आंतरजातीय विवाह केलेल्या जिल्ह्यातील ३०१ जोडपी अनुदानाच्या प्रतीक्षेत होती. शासनाकडून १ कोटी ६१ लाखांचे अनुदान प्राप्त झाले असून अनुदान वाटपाची प्रक्रिया सुरू झाली आहे. जोडप्यांपैकी वधू किंवा वर अनुसूचित जाती जमातीतील असावी अशी अट आहे. २०२२-२३ या आर्थिक वर्षात ७७, २०२३-२४ या आर्थिक वर्षात १०८ तर २०२४-२५ या आर्थिक वा ११६ अशा ३०१ जोडप्यांना मार्च महिन्याच्या अखेरपर्यंत प्रलंबित अनुदान मिळणार असल्याने आंतरजातीय विवाह केलेल्या जोडप्यांमधून समाधान व्यक्त होत आहे.

> **३१ मार्चपूर्वी अनुदान मिळणार...**
>
> शासनाकडून प्रलंबित आंतरजातीय विवाह अनुदान प्राप्त झाले असून वाटप प्रक्रिया सुरू आहे. मंजूरी प्रक्रीया पूर्ण झाल्यानंतर ३१ मार्चपूर्वी जोडप्यांना आंतरजातीय विवाह अनुदान मिळणार आहे.
>
> **-सुलोचना सोनवणे,**
> **समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद**

# सोलापुरातील घरगुती एलपीजीचा बेकायदेशीर वापर थांबवावा

### अनधिकृत रिफिलिंग; सुरक्षेला धोका

### एलपीजी पंप मालक, चालकांची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ मार्च-**

सोलापूर शहरातील अनुदानित घरगुती एलपीजी सिलेंडरचा बेकायदेशीरपणे वापर होत असून तो तत्काळ थांबवावा. यामुळे अनधिकृत रिफिलिंग आणि चोरीमुळे आग, स्फोट आणि प्राणघातक अपघाताचा धोका होऊ शकतो. या सदर्भात तातडीने कारवाई करण्याची मागणी शहरातील एलपीजी पंप मालक - चालक अभय पाटील यांनी केली आहे.

याप्रकरणी शहरातील सर्व एलपीजी पंप मालक ,चालकांनी पत्रकार परिषद घेऊन आपली भूमिका मांडली. अनुदानित घरगुती गॅस सिलेंडरचा वापर वाहनासाठी अधिकृतपणे केला जातो. शहरात ७ एलपीजी गॅस पंप आहेत. त्यातून आवश्यकतेनुसार गॅस विकला जात नाही. केवळ २० टक्के गॅस विकला जातो. उर्वरित गॅस हा वाहनांमध्ये अनधिकृतपणे घरगुती गॅस सिलेंडर मधून भरला जात असल्याचा आरोप अशोक पाटील यांनी केला आहे. मोठी गुंतवणूक करून एलपीजी पंप चालक है व्यवसाय करतात मात्र या अनधिकृत गॅस वापरामुळे मोठा फटका बसत आहे. यामुळे संबंधित प्रशासनाने बेकायदेशीर एलपीजी चोरीच्या ठिकाणी छापे टाकावेत. संयुक्त दक्षता कार्यदल सक्रिय करावे. अनधिकृत वापर आळा घालण्यासाठी तपासण्या आणि डीलर ऑडिट करावे. अनधिकृत व्यवसायांना सील ठोकावे. कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी यावेळी दादाराव मस्के यांनी केली. या पत्रकार परिषदेस सुमित भद्रा, स्वप्नील मुळे, परवेज सिद्दिकी आदी उपस्थित होते.

# बंद असलेले जलतरण तलाव सुरू करा

### संभाजी ब्रिगेडची पालिका आयुक्तांकडे मागणी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १८ मार्च -**

सोलापुरातील बंद असलेले जलतरण तलाव सुरू करण्याची मागणी संभाजी ब्रिगेडच्यावतीने पालिका आयुक्तांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.

सोलापूर शहरांमध्ये मार्कंडेय जलतरण तलाव सावरकर जलतरण तलाव व विजापूर रोडवरील आंतरराष्ट्रीय जलतरण तलाव असून सध्या सावरकर जलतरण तलाव काही प्रमाणात सुरू असून बाकीचे दोन्ही जलतरण तलाव बंद अवस्थेत आहेत आणि जलतरण तलावाची दुरवस्था मोठ्या प्रमाणात झाली आहे. सध्या उन्हाळ्याचा कालावधी सुरू असून शाळांना उन्हाळ्याच्या सुट्ट्या पडल्यावर अनेक विद्यार्थी पोहणे शिकण्यासाठी गर्दी करतात पण दोन्ही तलाव बंद असल्या कारणामुळे त्यांची गैरसोय होत आहे. महानगरपालिका प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे व अधिकाऱ्यांच्या बेफिकीर वृत्तीमुळे हे जलतरण तलाव बंद आहेत. त्यामुळे तात्काळ आपण हे दोन्ही जलतरण तलाव सुरू करण्याबाबत आदेश द्यावेत.



सोलापूर शहरात विजापूर रोडवर आंतरराष्ट्रीय जलतरण तलाव जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्या वतीने बांधण्यात आलेला होता. तो तलाव महानगरपालिकेने काही काळासाठी ताब्यात घेतला होता पण कर्मचाऱ्यांच्या व प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे तलावाला गळती लागून व त्याची दुरावस्था होऊन तो बंद आहे. याबाबत जिल्हा क्रीडा अधिकारी यांचे संपर्क साधला असता त्यांनी असे उत्तर दिले की आम्ही महानगरपालिकेकडे वर्ग करताना सुस्थितीत जलतरण तलाव हस्तांतरित केला होता. जर महानगरपालिकेला तो चालवणे होत नसल्यास आम्हाला आम्ही दिलेल्या सुस्थितीमध्ये तलाव आमच्याकडे वर्ग करावे तरच आम्ही तो जलतरण तलाव सुरू करू तर महानगरपालिकेने आम्ही जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्याकडे तो जलतरण तलाव वर्ग केला आहे असे सांगितले. दोघांच्या चालढकलीमध्ये सर्वसामान्य जनतेचे नुकसान होत असून तात्काळ जलतरण तलाव सुरू केल्या संभाजी ब्रिगेड स्टाईलने आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे.

यावेळी संभाजी ब्रिगेडचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष शाम कदम, जिल्हाध्यक्ष संभाजी राजे भोसले, संपर्कप्रमुख छत्रगुण माने, शहराध्यक्ष शिरीष जगदाळे, कार्याध्यक्ष दिलीप निंबाळकर, लखन पारसे, अकबर शेख, संघटक शेखर स्वामी, राजेंद्र माने, उपाध्यक्ष सतीश वावरे, चंद्रशेखर कंटीकर, सिद्धाराम साबळे आदी उपस्थित होते.

# कडक उन तरी बर्फाला मागणी नाहीच

### बर्फाची मागणी घटल्याने शहरातील बर्फ विक्रेत्यांवर संक्रांत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ मार्च-**

सोलापूरचे तापमान दिवसेंदिवस चाळीस अंशा पलिकडे जात आहे. गेल्या काही दिवसांपासून सोलापूर हे शोलापूर बनले आहे. या कडक उन्हापासून थंडावा मिळावा यासाठी सोलापूरकर थंड पेय सेवन करतात. शहरातील विजापूरवेस येथे घाऊक बर्फ विक्रेत्यांची दुकाने आहेत. येथे उन्हाळा सुरू झाला की किरकोळ विक्रेते बर्फ घेण्यासाठी गर्दी करतात. यंदा मात्र रखरखीत उन्हाचा पारा वाढत असताना दुसरीकडे मात्र बर्फाला मागणी नसल्याने विक्रेत्यांवर ऐन हंगामात संक्रांत ओढवलेली दिसत आहे.

दरम्यान, लिंबू सरबत, कलिंगड, मस्तानी, असे विविध फेरीवाले आपल्या व्यवसायासाठी येथे बर्फ खरेदी करतात. मात्र यंदा विक्रेत्यांकडून बर्फाची खरेदी होत नसल्याचे दिसत आहे. त्यामुळे घाऊक बर्फ विक्रेते हैराण झाले आहेत. ऐन हंगामात बर्फाची मागणी कमी झाली आहे. त्यामुळे व्यापार करावा का नको ?असा प्रश्न आता घाऊक बर्फ विक्रेत्यांसमोर उपस्थित झाला आहे. दरवर्षी उन्हाळ्यामध्ये लिंबू सरबत, मस्तानी, मठ्ठा, लस्सी, ताक, कलिंगड, मिक्स फ्रुट, आदींसह ज्यूस



सेंटरमध्ये बर्फ घेतला जातो.

मात्र यंदा या फेरीवाल्यांकडून बर्फाची मागणी कमी झालेली आहे. ग्राहकांनी थंड पेय घेण्याकडे कल कमी केला आहे का ? असा प्रश्न उपस्थित होत आहे. ग्राहकांची संख्या रोडवल्यानंतर किरकोळ दुकानदार देखील बर्फ खरेदीकडे स्वारस्य दाखवत नाहीत. त्यामुळे यंदा बर्फाची मागणी कमीच आहे. अशी माहिती बर्फ विक्रेत्यांकडून देण्यात आली. बर्फाची लादी १०० रुपयाला २०० पाउंड याप्रमाणे असून देखील ग्राहक खरेदी करत नाहीत. दरवाढ झालेली नसताना देखील बर्फातील मागणी कमीच आहे. उन्हाचा तडाखा आणखीन वाढल्यानंतर ग्राहकांमधून थंडपेय सेवन करण्यासाठी मागणी वाढेल. त्यानंतर विविध किरकोळ विक्रेत्यांकडून बर्फाची मागणी येईल, अशी शक्यता आहे. मात्र सध्या तरी बर्फाच्या मागणीमध्ये म्हणावा तसा उठाव नाही. त्यामुळे व्यवसाय कसा करावा असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. असेही विक्रेत्यांनी यावेळी सांगितले.

## संघ हीच जीवनगाथा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा.



ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.

**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक
प्रमुख राष्ट्र सेविका समिती,
मो. ९९६००५३५२१

### अलकः- (८२) अमर

एकदा एका गृहिणीने गुरुजींना विचारले गुरुजी तुम्ही सतत भ्रमण करत असता. दररोज एक नवे गाव , नवा प्रदेश, नवी भाषा व नव्या वाटा असतात तुमच्या. पण रोज नव्याला सामोरे जाताना अपरिचितासारखे वाटत असेल.

गुरुजी तात्काळ उत्तरले कधीच नाही. एक वेळा भारतमातेला आपला समजलो आहे, मग सारेच देशवासी आपला परिवार आहे असेच वाटते तुम्ही पण माझ्याबरोबर एकदा चला. आत्मीयता अनुभवा. तुम्हाला पण सारा देश एक कुटुंब वाटेल.

गृहिणी:- गुरुजी पन्नास वर्षानंतर संघाचे भविष्य काय असेल ?

गुरुजी :- पुढील पन्नास वर्षेच का पन्नास हजार वर्षानंतर सुद्धा संघ विचारांची आवश्यकता साऱ्या देशालाच नव्हे विश्वाला असेल. आपली भारत माता विश्वगुरू होईल. कारण संघाचे कार्य व्यक्तीनिर्माण करणे हे आहे. संस्कृती व जीवनमूल्यवर आधारित संस्कारांची निर्मिती संघात होते. युगयुगांतराची आमची निरंतर प्रार्थना आहे सर्वेऽपि सुखिनः संन्तु । सर्वे संन्तु निरामयः ।। (सभी सुखी हो और सबकी सभी अनिष्टोसे मुक्ती हो) हा याचा अर्थ. आज वर्तमानातील इतर देश 'अधिकतम संख्या का अधिकतम हित' यालाच आदर्श मानतात. तेव्हा संघ विश्वातील सर्वच प्राणीमात्रांचे पूर्ण कल्याण हाच उदात्त आदर्श सर्वांना समजावून सांगत असतो. संघाची ही विचारधारा अनमोल आहे. संघाची ही साधना संघाला अमर बनवेल. जसे गणपती बाप्पाला आवडणाऱ्या दूर्वा कधीच नष्ट होत नाही. जेव्हा जेव्हा अवसर मिळतो, गरज उत्पन्न होते, तेव्हा तेव्हा दूर्वा परत हलू डोलू लागतात. अशा रीतीने आम्ही 'वाहतो ही दुर्वांची जुडी' ही जुडी भविष्यातही अमर आहे.

**क्रमशः**

## संक्षिप्त वृत्त



### ठाकरे शिवसेनेच्या वतीने पिलीव येथे छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन

**पिलीव, दि.१८ मार्च-**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शिवसेना उद्धवजी बाळासाहेब ठाकरे गटाच्या वतीने अभिवादन करण्यात आले.यावेळी शिवसेनेचे माजी जिल्हा उपप्रमुख अशोक भाऊ घोंगडे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज व बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी संजय रोकडे, मल्हारी कोळी तुषार राऊत, प्रवीण वाघमारे , संजय पाटील, गणेश देशमुख, भैस, अजिनाथ शिंदे उपस्थित होते.



### फोंडशिरसचे बाणलिंग विद्यालय आदर्श शाळा पुरस्काराने सन्मानित

**नातेपुते, दि.१८ मार्च-**

सोलापूर जिल्हा माध्यमिक शिक्षक व सेवक सहकारी पतसंस्था मर्यादित बाळे सोलापूर यांच्यावतीने देण्यात येणारा आदर्श शाळा पुरस्कार शिक्षण प्रसारक मंडळ अकलूज संचलित बाणलिंग विद्यालय फोंडशिरस या शाळेला मिळाला. सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षांमध्ये शाळेने विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास केलेला लक्षात घेऊन पुरस्कार देण्यात आला. जिल्ह्यातील अनेक शाळांची माहिती घेण्यात आली श्री बाणलिंग विद्यालय फोंडशिरस या शाळेने सामाजिक, क्रीडा, गुणवत्ता,बौद्धिक, भावनिक क्षेत्रात केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल हा पुरस्कार देण्यात आला. माजी शिक्षक आमदार मा.दत्तात्रय सावंत यांचे शुभ हस्ते हुतात्मा स्मृती मंदिर सोलापूर या ठिकाणी आदर्श शाळा पुरस्कार देऊन प्रशालेचे मुख्याध्यापक, पर्यवेक्षक, सर्व शिक्षक शिक्षिका व सेवक वर्ग यांचा गौरव करण्यात आला. पुरस्काराचे स्वरूप सन्मानचिन्ह व सन्मानपत्र असे होते. पुरस्कार प्राप्त झाल्यामुळे शिक्षण प्रसारक मंडळ अकलूज संस्थेचे मार्गदर्शक जयसिंह मोहिते पाटील, अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते पाटील व संचालिका स्वरूपाराणी मोहिते पाटील यांनी विद्यालयाचे सभापती हनुमंत कुंभार, उपसभापती शंकर वाघमोडे, सदस्य नानासाहेब शेंडे, विजय पाटील, श्रीकांत दाते व पालक सुभाष गोरे, मुख्याध्यापक पांडुरंग देशमुख, पर्यवेक्षक तात्या पाटील, शिक्षक प्रतिनिधी प्रकाश जाधव या सर्वांचे अभिनंदन केले.

### आकाश खुर्द हत्येच्या निषेधार्थ पिलीवमध्ये रंगपंचमी साजरी न करण्याचा निर्णय

**पिलीव, दि.१८ मार्च-**



माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील आकाश अंकुश खुर्द या युवकाची अमानुषपणे निघृण हत्या करण्यात आली. त्याच्या निषेधार्थ व आकाशच्या कुटुंबीयावर कोसळलेल्या दुःखात सहभागी होणयासाठी रंगपंचमीचा सण व उत्सव साजरा न करण्याचा निर्णय गावातील विविध संघटना व हितचिंतकांनी घेतला आहे. यामध्ये आकाशच्या मारेकऱ्यांना कठोर शिक्षा होऊन त्याला न्याय मिळावा अशी आकाशच्या मित्र परिवाराची मागणी आहे.



### अणदूरचे सुपुत्र निलंग्यांचे तहसीलदार प्रसाद कुलकर्णी यांचा सन्मान

**अणदूर दि.१८ मार्च -**

शासनाच्या १०० दिवसाच्या सात कलमी कार्यक्रमांमध्ये उत्कृष्ट काम केल्याबद्दल प्रथम क्रमांक मिळालेले अणदूरचे सुपुत्र लातूर जिल्ह्यातील निलंगा येथील तहसीलदार प्रसाद कुलकर्णी यांना लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. एक उत्तम महसूल प्रशासकीय अधिकारी म्हणून प्रसाद कुलकर्णी यांची ओळख असून याअगोदरही त्यांनी उत्कृष्ट कामगिरीचे अनेक पुरस्कार प्राप्त केले आहेत. राज्यस्तरीय, विभागस्तरीय, जिल्हास्तरीय, प्रशासन हे लोकाभिमुख, गतिमान, पारदर्शक पद्धतीने चालावे याकरिता ७ जानेवारी ते १६ एप्रिल २०२५ या १०० दिवसाच्या कालावधीत कार्यालयीन कामाच्या सुधारणांची विशेष मोहीम संपूर्ण राज्यात राबविण्यात येत आह. या मोहिमेचा आढावा नुकताच घेण्यात आला. त्यामध्ये निलंगा तहसील कार्यालयास प्रथम क्रमांक मिळाला आहे. त्यांच्या या यशाबद्दल खडकाळी मॉर्निंग क्लब, फार्मा ग्रुप व जयमल्हार पत्रकार संघाने अभिनंदन केले आहे

### भिमनगर येथे १३० लाभार्थ्यांचे भरले ऑनलाईन कार्ड

**अक्कलकोट, दि.१८ मार्च-**

अक्कलकोटच्या भिमनगर येथील आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेतून घेतलेल्या शिबिरात १३० लाभार्थ्यांचे ऑनलाईन कार्ड भरण्यात आले. रिपाईचे तालुका अध्यक्ष अविनाश मडिखांबे यांच्या नेतृत्वाखाली हे शिबिर यशस्वी पार पडले. नगरपरिषदेचे शैलेश बिराजदार व आरोग्य विभागाचे डॉ. मंजुनाथ पाटील, डॉ ओंकार मशाळकर,आरोग्य सेवक गुरुशांत बिराजदार,यलप्पा कोटी, विनय विजापुरे,अमर क्षिरसागर, हाजी शेख, स्वेता जाधव, रवी श्रीमान यांचे सहकार्य लाभले.शिबीर यशस्वीतेसाठी अजय मुकणार, शुभम मडीखांबे, सचिन बनसोडे, रोमित मडीखांबे, नितेश मडीखांबे, नागेश मडीखांबे, भीम मडीखांबे, अभिजित मडीखांबे, विजय मडीखांबे, काजल मडीखांबे, आकाश मंडीखांबे यांनी मदत केली.

# बठाण येथे भीमानदी पात्रातून बेसुमार वाळू उपसा; पर्यावरणाची हानी

## महसूल अधिकाऱ्याचे जाणीवपुर्वक दुर्लक्ष, जिल्हाधिकाऱ्यांकडे शरद कोळींची लेखी तक्रार

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि.१८ मार्च -**

बठाण येथील भीमा नदी पात्रातून गाळ काढण्याच्या नावाखाली रात्रंदिवस बेसुमार वाळू उपसा सुरू आहे. त्याकडे महसूल अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत असून भविष्यात मंगळवेढा शहर, भोसे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना, जलजीवन योजना आदीवर जलसंकट निर्माण होणार असल्याने सदर ठेकेदारावर व महसूल अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते शरद कोळी यांनी निवेदनाव्दारे जिल्हाधिकारी व पोलीस अधिक्षकांकडे केली आहे.

बठाण येथील भीमा नदीतील गाळमिश्रीत वाळू काढण्याच्या नावाखाली दररोज हजारो ब्रास वाळू उपसली जात आहे. येथे सी.सी. टीव्ही.कॅमेरे लावले नसल्यामुळे किती उपसा होतो हे समजणे कठीण आहे. मुळात भीमा नदीत कुठलाही गाळ आला नाही, केवळ वाळूचा साठा आहे. ही वाळू नदी पात्रात पाणी टिकवून ठेवण्याचे काम करत असताना चक्क गाळमिश्रीत वाळू काढण्याचे षडयंत्र रचून शासनाच्या मुद्देमालावरच अधिकाऱ्यांना हाताशी धरुन संबंधीत ठेकेदार दरोडे टाकत असल्याचे तक्रारीत म्हटले आहे. येथून दररोज आठशे ते हजार ब्रास वाळू उपसा होत असून





> महसूल अधिकाऱ्यांकडे वारंवार तक्रारी करुनही मिलीजुलीमुळे महसूल अधिकारी सदर ठेकेदाराविरुध्द कारवाई करण्यास धजत नाहीत. वाळू भरुन जाणाऱ्या वाहनांचे फोटो व व्हिडीओ अधिकाऱ्यांना पाठवूनही दुर्लक्षच आहे. महसूल अधिकारी व संबंधीत ठेकेदार यांच्याविरुध्द मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्याची प्रक्रीया सुरु आहे.
>
> **- शरद कोळी, सामाजिक कार्यकर्ते**

नदी पात्रात दहा ते बारा फुटापर्यंत खोलीचे खड्डे पडले आहेत. या गाड्यांना कुठलीही पावती दिली जात नाही. ऑनलाईन बुकींगही केले जात नाही. गाड्यांचे मोजमाप वजन काट्यावर केले जात नाही. वाळू ठेकेदार प्रत्येक गाडीला पंधरा हजार रुपये आकारत आहेत. गौण खनिजचे सर्व नियम धाब्यावर बसवून सदर ठेकेदार वाळू उपसण्याचे काम करीत आहे. सदर ठेका तात्काळ न थांबल्यास नागरिकच रस्त्यावर येण्याची शक्यता असल्याचा इशारा देण्यात आला आहे. वाळू वाहतूक करणारी वाहनेही जी.पीएस. शिवाय तसेच बिगर नंबर गाड्यांचा वापर होत आहे. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी तसेच वाहतूक शाखेचे पोलीस मोटर सायकलला नंबर प्लेट नसल्यानंतर तात्काळ दंडाची आकारणी करतात. मात्र चक्क वाळू घेवून जाणारी वाहने बिगर नंबरची जात असताना त्यांना कशी काय दिसत नाहीत? असा संतापजनक सवालही सुज्ञ नागरिकांमधून विचारला जात आहे. मागील चार महिन्यापुर्वी पोलीसांनी एका वाळूच्या वाहनाचा पाठलाग केल्याने वाळूचे वाहन पलटी होवून पंढरपूर तालुक्यातील एकाचा मृत्यू झाल्याची तक्रारही शरद कोळी यांनी पोलीस अधिक्षक यांच्याकडे केली आहे.



## शिक्षकांनी विज्ञानाभिमुख विद्यार्थी घडवावेत : डॉ. काळे

**कल्याणशेट्टी महाविद्यालयात विज्ञान अभ्यास मंडळातर्फे व्याख्यानाचे आयोजन**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि १८ मार्च-**

विज्ञानाने नवनवीन शोधाद्वारे जगात क्रांती केली आहे, विज्ञाननिष्ठ समाज हाच देशाचे परिवर्तन करू शकतो त्यामुळे विज्ञानाचे बदलते स्वरूप विद्यार्थ्यांना सांगून शिक्षकांनी विज्ञानाभिमुख विद्यार्थी घडविण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावेत, असे प्रतिपादन कृष्णा मेडिकल कॉलेजचे माजी अधिष्ठाता डॉ साहेबराव काळे कराड यांनी येथे व्यक्त केले.

येथील मातोश्री गुरुबसवा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील विज्ञान विभागाने आयोजित केलेल्या व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी समन्वयक मलकप्पा भरमशेट्टी होते. यावेळी प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, प्रा. डॉ. आरुषा नंदीमठ, प्रा राजशेखर पवार, विभावरी काळे उपस्थित होते. ते पुढे म्हणाले, शास्त्रज्ञांनी विज्ञानाचा आधार घेऊन उपग्रहाची निर्मिती केली. विज्ञानामुळेच मानवाचे आयुष्यमान वाढले.दैनंदिन जीवनात वेगाने परिवर्तन झाले आहे. त्यामुळे शिक्षकांनी विज्ञानाचे बदलते स्वरूप विद्यार्थ्यांना सांगितले पाहिजे. विज्ञाननिष्ठ समाज हाच देशाचे परिवर्तन करेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. मनिषा शिंदे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. नेहा गंदमल यांनी केले. तर आभार प्रा. हर्षदा गायकवाड यांनी मानले.

**विद्यार्थी विज्ञानाचा केंद्रबिंदू**

विज्ञानातून शोध लावणारे शास्त्रज्ञ दररोज नवीन आव्हानाला सामोरे जात असतात. विद्यार्थ्यांनी त्यांचा आदर्श घेतला पाहिजे. कारण विद्यार्थीच खरा विज्ञानाचा केंद्रबिंदू आहे असे मत झाडबुके महाविद्यालयातील सूक्ष्म शास्त्र विभाग प्रमुख डॉ आरुषा नंदीमठ यांनी व्यक्त केले.

## दोन दुकानाचे पत्रे उचकावून ३१ हजार रुपयाची धाडसी चोरी

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि १८ मार्च-**

अक्कलकोट बसस्थानकाच्या समोरील कालिका मोटर्स या दुकानाच्या छतावरील पत्रे उचकटून चोरट्यांनी काऊंटरचे दोन ड्रॉव्हर फोडून ३० हजाराची रोकड पळवली. या घटनेने बस स्टॅन्ड परिसरातील व्यापारी बांधवात खळबळ उडाली आहे.

बस स्थानकासमोर कै. सदाशिव मोरे यांच्या मालकीचे दुकान गाळे आहेत. यात सुरेश रामचंद्र वेदपाठक यांच्या मालकीचे कालिका मोटर्स या नावाचे तीन व चार चाकी वाहनाचे स्पेअर पार्टस विक्रीचे दुकान आहे. शनिवार दि. १५ मार्च रात्री दुकानाच्या पाठीमागील भागातून चोरट्यानी दुकानाच्या छतावर चढून पत्रे उचकटून दुकानात प्रवेश केला. दुकानाच्या काऊंटरचे दोन ड्रॉव्हार फोडून त्यामधील ३० हजाराची रोकड पळवली. हा चोरीचा प्रकार रविवारी सकाळी दुकान उघडल्यावर मालक सुरेश वेदपाठक यांना

> अक्कलकोट सारख्या शहरांत अश्या घटना घडूच नयेत याची खबरदारी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी घेणे गरजेचे आहे अशी मागणी स्वराज्य पत्रकार संरक्षण व माहिती अधिकार संघटनेचे अक्कलकोट तालुका अध्यक्ष चंद्रकांत वेदपाठक यांनी केली आहे.



लक्षात आला. याच दुकानाचे शेजारी भूषण टोणे यांचे शेती खताचे दुकान आहे. याही दुकानाचे पत्रे उचकटून दुकानातील ड्रॉव्हर फोडून त्यातील पाचशे रुपये रोकड व ३७० रुपयाची हेड टॉर्च असे ८७० रुपयाची चोरी चोरट्यांनी केली, याबाबत उत्तर पोलीस ठाण्यात बी. एन. एस. ३३४ (१) अन्वये गुन्हा दाखल झाला असून रमजान पाटील व एच. सी. चव्हाण हे अधिक तपास करीत आहेत. बसस्थानाका सारख्या रात्रंदिवस गर्दीच्या परिसरात असे दुकान फोडण्याचे प्रकार घडून चोऱ्या झाल्याने सर्वत्र आश्चर्य व्यक्त होत आहे.

## भगवंत अभियांत्रिकिच्या १४ विद्यार्थ्यांची कन्स्ट्रलॉजिक कंपनीमध्ये झाली निवड

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.१८ मार्च**

जयवंत शिक्षण प्रसारक मंडळ पुणे संचलित बार्शी येथील भगवंत अभियांत्रिकी महाविद्यालय (बीआयटी कॉलेज) मधील सिव्हील इंजिनिअरिंग डिप्लोमामध्ये तृतीय वर्षात शिकणाऱ्या १४ विद्यार्थ्यांची कॅम्पस इंटरव्युव्हद्वारे कन्स्ट्रलॉजिक या कंपनीमध्ये निवड झाली असल्याची माहिती महाविद्यालयचे ट्रेनींग व प्लेसमेंट अधिष्ठाता प्रा. गजानन बुरगुटे यांनी यावेळी दिली.

महाविद्यालयांमध्ये आयोजित करण्यात आलेल्या कन्स्ट्रलॉजिक या आंतरराष्ट्रीय कंपनीच्या कॅम्पसमध्ये सिव्हिल इंजिनिअरिंग डिप्लोमाच्या तृतीय वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. कंपनीच्या निवड समितीने विविध निकष व चाचण्यांच्या आधारावर विद्यार्थ्यांची निवड केली. यामध्ये प्रांजल चेंडगे, आश्का अत्तार,



तनुजा जाधव, स्वप्नील कडावकर, समरजित शिंदे, अनिकेत कदम, रणजित गरदाडे, दत्तात्रय गवारे, निखिल तौर, रिद्धी जाधव, शुभांगी सुरवसे, नंदिनी सुरवसे, आरती सातपुते, श्वेता मिंढे,या १४ विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. संकुल संचालक ऋतुराज सावंत यांच्या सूचनेनुसार विद्यार्थ्यांना शिक्षण घेत असतानाच नोकरीच्या संधी मिळाव्यात, यासाठी विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्यांचे कॅम्पस इंटरव्युव्ह ड्राईव्ह सातत्याने आयोजित केले जातात. त्यासाठी विविध मार्गदर्शन शिबिरे, कार्यशाळा, कौशल्य विकास कार्यक्रम यांचे आयोजन केले जाते शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये आतापर्यंत शंभरहून अधिक विद्यार्थ्यांची निवड या प्रक्रियेतून विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्यांमध्ये झाली आहे. सदर विद्यार्थ्यांना ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाचे अधिष्ठाता प्रा. बुरगुटे, प्रा.चोपडे यांच्यासह प्रा. ठोकळ, प्रा. मारडकर, प्रा.श्रीमती माने आर्दीचे मार्गदर्शन लाभले. संचालक ऋतुराज सावंत, प्राचार्य रणजित शिराळ, विभागप्रमुख, शिक्षक यांच्यासह पालकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## अभिषेक ऐवळेची सहाय्यक रासायनिक विश्लेषकपदी निवड

**तभा वृतसेवा**
**पिलीव दि १८ मार्च -**

पिलीव (ता. माळशिरस) येथील अभिषेक ऐवळे यांची न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचलनालय, मुंबई (गृह विभाग) अंतर्गत मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन करिता सहाय्यक रासायनीक विश्लेषकपदी निवड झाली आहे.

अभिषेक याचे शिक्षण पिलीव येथील कर्मवीर भाऊराव पाटील विदयालयात झाले आहे. लहानपणीच वडिलांचे छत्र हरपल्यानंतर आईने बँकेत



नोकरी करित मुलाचे शिक्षण पूर्ण केले.अभिषेकच्या या यशाबद्दल पिलीव परीसरातील विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिषेकचे अभिनंदन व कौतुक होत आहे.

## बचेरीच्या महिला सरपंच २२ मार्चपासून बसणार उपोषणाला

**• पाणीटंचाईबाबत दिले निवेदन, टँकर सुरु करण्याची मागणी**

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि १८ मार्च -**

बचेरी (ता.माळशिरस) येथे सध्या पिण्याच्या पाण्याची तीव्र पाणीटंचाई जाणवत आहे. पाण्यासाठी चार-पाच किलोमीटर पायपीट करावी लागत आहे. पाणीपुरवठा विहीरीतून एक तास सुद्धा पाणीपुरवठा करणे मुश्किल झाले आहे. प्रशासनाकडे टँकर मागणीचा रितसर प्रस्ताव पाठविला तरी या मागणीचा गांभीर्याने विचार केला जात नाही. त्यामुळे येत्या चार दिवसात जर बचेरी गावात टँकर सुरु केला नाही तर २२ मार्च पासून मी पंचायत समिती कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसणार असल्याचा



इशारा बचेरीच्या सरपंच राणीताई गोरड यांनी दिला आहे. याबाबतचे निवेदन त्यांनी गटविकास अधिकाऱ्यांकडे दिले आहे.

माळशिरस तालुक्यात सध्या बचेरी, सुळेवाडी, गारवाड, मगरवाडी या चार गावात पाण्याची भीषण टंचाई जाणवत आहे. या गावातून प्रशासनाकडे रितसर टँकरची मागणी आहे.

## स्त्रीचे समर्पण व त्याग हाच कुटुंब संस्थेचा पाया : नीलिमा क्षत्रिय

**ब्राह्मण महासंघाच्या वतीने महिला दिन साजरा**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १८ मार्च-**

निसर्गाने मातृत्वाची आणि बालसंगोपनाची जबाबदारी स्त्रीवर टाकली. त्याचवेळी कुटुंबाचे पालनपोषण आणि अर्थार्जन ही जबाबदारी पुरुषांवर टाकली. कालांतराने पुरुषांच्या जबाबदाऱ्या स्त्रियांनी वाटून घेतल्या पण स्त्रियांच्या जबाबदाऱ्या मात्र कोणीच वाटून घेऊ शकत नाही. परिणामी स्त्रीला दोन्ही आघाड्यांवर लढावे लागते. आपल्या कुटुंबासाठी ती हे करते. त्यामुळे स्त्रीचे समर्पण आणि त्याग हाच कुटुंब संस्थेचा पाया आहे, असे उद्गार साहित्यिक नीलिमा क्षत्रिय यांनी नुकतेच येथे काढले. ब्राह्मण महासंघाच्यावतीने महिला दिनानिमित्त आयोजित 'नाच ग घुमा' या विषयावर प्रमुख पाहुण्या या नात्याने व्याख्यान देताना त्या बोलत होत्या.

यावेळी व्यासपीठावर स्वप्ना केसकर, अर्चना धर्माधिकारी आणि डॉ. संध्या साने उपस्थित होते. प्रारंभी श्री भृगवंत, भगवान परशुराम आणि स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमांच्या पूजनाने कार्यक्रमाचा प्रारंभ झाला.



त्यानंतर प्रसाद सहस्त्रबुद्धे यांचे संगीत संयोजन असलेले आणि त्यांनीच गायलेले तिच्यामुळे हे जीवन सुंदर'' हे स्त्रीची महत्ता अधोरेखित करणारे मुकुंदराज कुलकर्णी यांचे गीत सादर करण्यात आले. शुभांगी काळे यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची महती सांगणारे स्वरचित गीत सादर केले. यावेळी महिला दिनानिमित्त समाजातील शीतल अघोर, ॲड. संगीता देशपांडे, कीर्ती कुलकर्णी, पूजा नेर्लेकर आणि सुखदा नाईक या स्त्री उद्योजकांचा सन्मान करण्यात आला.

प्रास्ताविक व परिचय अमिता कुलकर्णी यांनी करुन दिला तर गौरी पाटील यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे निवेदन अमिता कुलकर्णी आणि गौरी पाटील यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ब्राह्मण महासंघाचे तालुका अध्यक्ष दिनकर सापनाईकर, ज्योती सापनाईकर, सुधीर टंकसाळे, राजीव बडवे, मुकुंदराज कुलकर्णी, लक्ष्मीकांत कुलकर्णी, भरतरी कुलकर्णी, पांडुरंग कुलकर्णी, पूजा शिरसीकर, शिल्पा कुलकर्णी, प्रेरणा कुलकर्णी, सारिका कुलकर्णी, दीपा मराठे, अलका माचवे, अलका जोशी, पूजा कोरफळकर, महेश कुलकर्णी, डॉ. हेमंत साने, एम.डी. कुलकर्णी, मुकुंद कुलकर्णी, अंजली बडवे, विकास कोरफळकर, सुरेखा कुलकर्णी, जगदिश कुलकर्णी, पल्लु कुलकर्णी, रविद्र माचवे, मेधा जोशी, अलका कुलकर्णी कोडगावकर यांनी परिश्रम घेतले.



## आ. कल्याणशेट्टी यांच्या हस्ते सह्याद्री ट्रॅक्टर्स शोरूमचे उद्‌घाटन

**संत तुकाराम महाराजांचे वंशज श्रीगुरू कान्होबा महाराज देहूकरांची उपस्थिती**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर दि.१८ मार्च -**

उळेगावचे उपसरपंच व बांधकाम व्यावसायिक नेताजी खंडागळे यांनी शिवाजीनगर बाळे येथे सुरू केलेल्या सह्याद्री ट्रॅक्टर्स शोरूमचे उदघाटन रविवारी दि.१६ मार्च रोजी आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी यांच्या हस्ते झाले.

यावेळी जगद्‌गुरू श्रीसंत तुकाराम महाराजांचे वंशज श्रीगुरू कान्होबा महाराज देहूकर, भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य शहाजीभाऊ पवार, प्रल्हाद काशीद, सोलीस यानमार कंपनीचे राज्य प्रमुख महेश इथापे, शुभम डिंगर, नागेश कांबळे, अजय भोसले, हेमंत पिंगळे, महादेव गवळी आदी मान्यवर उपस्थित होते. या वेळी इथापे यांनी सोलिस यानमार ट्रॅक्टर्स अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज असल्याचे सांगितले. आ. कल्याणशेट्टी यांनी चांगल्या कंपनीसोबत चांगला डीलर असणे महत्त्वाचे असते असे सांगून नेताजीभाऊ खंडागळे यांच्यासारखा उत्तम डीलर लाभला आहे. शेतकऱ्यांना योग्य सेवा आणि विश्वासार्हता मिळेल, याची खात्री असल्याचे सांगितले.

## आज महावितरणतर्फे ग्राहक तक्रार निवारण दिनाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १८ मार्च-**

महावितरणतर्फे जिल्ह्यातील सर्व विभागीय कार्यालयांमध्ये दि.१९ मार्च रोजी ग्राहक तक्रार निवारण दिनाचे आयोजन केले असल्याची माहिती अ.भा. ग्राहक पंचायतीचे जिल्हा अध्यक्ष शशिकांत हरिदास यांनी दिली.

वीज ग्राहकांच्या विविध प्रकारच्या तक्रारी निवारण्यासाठी महावितरणतर्फे दर महिन्याच्या तिसऱ्या बुधवारी आयोजन करण्यात येते त्याप्रमाणे १९ मार्च रोजी ग्राहक तक्रार निवारण दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. मार्चमधील ग्राहक तक्रार निवारण दिनाचे आयोजन दि.१९ मार्च रोजी जिल्ह्यातील पंढरपूर, बार्शी, अकलूज, सोलापूर शहर व सोलापूर ग्रामीण अशा सर्व विभागीय कार्यालयांमध्ये सकाळी १० ते दुपारी १ वा.पर्यंत करण्यात आले आहे.

तरी वरीलप्रमाणे प्रत्येक कार्यकारी अभियंता, म हावितरण यांचे कार्यालयात उपस्थित राहून आपल्या तक्रारी मांडून, त्यांची सोडवणूक करून घ्यावी. कोणत्याही स्वरुपातील लिखित तक्रार अर्जासह उपस्थित राहावे असे आवाहन अ.भा.ग्राहक पंचायतीचे जिल्हा संघटक दीपक इरकल, प्रांत कोषाध्यक्ष विनोद भरते, सदस्य सुभाष सरदेशमुख, जिल्हा सचिव सुहास निकते, जिल्हा महिला प्रमुख सौ.माधुरी परदेशी पंढरपूर तालुकाध्यक्ष विनय उपाध्ये, जिल्हा सदस्य अण्णा ऐतवाडकर, पांडुरंग अल्लापूरकर, संतोष उपाध्ये यांनी केले आहे.

## संक्षिप्त वृत्त...



### माण नदीवरील बंधाऱ्याची दुरुस्ती करण्याकरिता निधीची तरतूद करा

**सांगोला, दि.१८ मार्च-**

मुंबई येथे चालू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची आ. डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी विधानभवनात भेट घेत सांगोला तालुक्यातील माण नदीवरील बंधाऱ्याची दुरुस्ती करण्याकरिता निधीची तरतूद करण्यात यावी अशी मागणी केली. सांगोला तालुक्यातील माण नदीवरील पुरामुळे नुकसान झालेल्या ११ कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्याच्या विशेष दुरुस्तीचा प्रस्ताव महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांच्याकडून शासनास प्राप्त झालेला आहे. मात्र त्यास मंजुरी न मिळाल्याने दुष्काळी तालुक्यातील बंधाऱ्यांचा पूर्ण क्षमतेने वापर होत नाही. त्यासाठी सांगोला तालुक्यातील माण नदीवरील पुरामुळे नुकसान झालेल्या ११ कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्याच्या विशेष दुरुस्तीचा प्रस्तावास तात्काळ मान्यता देऊन बंधाऱ्याची दुरुस्ती करण्याकरिता निधीची तरतूद करण्याची आग्रही मागणी यावेळी आ.बाबासाहेब देशमुख यांनी केली. यावेळी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी संबंधित विभागातील अधिकाऱ्यांना तातडीने सूचना करत लवकरात लवकर निधी उपलब्ध करून देण्याची ग्वाही दिली.

### दहिगाव उपसाचे २० मार्च पासून उन्हाळी आवर्तन दिले जाणार

**करमाळा, दि.१८ मार्च-**

धाराशिव येथे पार पडलेल्या कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत आपण सीना कोळगाव उपसा सिंचन योजनेचे उन्हाळी आवर्तन देण्याची मागणी केली होती. त्यानुसार आता या योजनेतुन शेतीसाठी पाणी देणे सुरू झाले आहे. तर अधिवेशन काळात मंत्रालयात पार पडलेल्या उजनी धरण कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत आपण दहिगाव



उपसा सिंचन योजनेच्या उन्हाळी आवर्तनाची मागणी केली होती. काही दिवसांपूर्वी दहिगाव उपसा सिंचन योजनेचे रब्बी आवर्तन संपले होते. पुर्व भागातील काही ठिकाणी तांत्रिक अडचणी असलेले अपवाद वगळता सर्वत्र मुबलक पाणी दिले गेले. यामुळे थोडासा अवधी लोटल्यानंतर आता गुरुवार पासून परत एकदा दहिगाव उपसा सिंचन योजनेचे उन्हाळी आवर्तन सुरु करण्याच्या सुचना आपण संबंधित विभागास दिल्या आहेत. त्यानूसार या विभागाकडून उन्हाळी आवर्तनासाठी तयारी सुध्दा करण्यात आली आहे. इलेक्ट्रिक पंप दुरुस्ती तसेच मुख्य कालवा संबंधित अडचणी दुर करण्यात आल्या असुन नियोजना प्रमाणे पाणी वाटप करण्याची सुचनाही आपण अधिकाऱ्यांना दिली आहे. पाटबंधारे अधिनियमानुसार योग्य त्या सुचना अंमलात आणुन दहिगाव उपसा सिंचन योजनेचे हे आवर्तन दिले जाईल. तसेच उन्हाळ्यात होणारी संभाव्य पाणी टंचाई लक्षात घेऊन या आवर्तनाच्या माध्यमातून काही प्रश्न सोडवले जातील. शेतकऱ्यांनी या आवर्तनात सहकार्य करावे असे आवाहन आमदार नारायण आबा पाटील यांनी केले.




### शहर आणि तालुक्यातील ३०० महिलांची तपासणी

**पंढरपूर, दि.१८ मार्च-**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून वरद विनायक म ल्टीस्पेशलिटी हॉस्पिटलचे डॉ. मनोज भायगुडे व ड. तेजश्री भायगुडे यांच्या संकल्पनेतून पंढरपूर शहर व तालुक्यातील महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी व मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबीराच्या माध्यमातून शहर आणि तालुक्यातील ३०० महिलांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. यावेळी सीमा परिचारक तसेच अंजली आवताडे, सौ सुमित्रा पाटील,सौ विनया परिचारक,सौ शैला सावंत, सौ तृप्ती खरे,सौ साधना भोसले,सौ श्रीमती उज्वला भालेराव, सौ संगीता काळे, स्मिता आधठराव,सौ स्वाती धोत्रें,अनिता पवार यांची उपस्थिती होती. शिबिरात ड. तेजश्री भायगुडे यांनी महिलांना आरोग्यविषयक मार्गदर्शन केले. यावेळी शहरातील तज्ञ डॉ. श्वेता सुडके,डॉ .महेश सुडके,डॉ. स्वाती बोधले, डॉ.एकनाथ बोधले, डॉ. संग्राम गायकवाड, डॉ.स्नेहा नागणे, डॉ.राहुल नागने, उर्मिला उवरे,डॉ. मयुरी तटक यासह अनेक डॉक्टरांनी शिबीरास भेट दिली. यावेळी आलेल्या सर्व डॉक्टरांचा यशोचित सन्मान भायगुडे परिवार यांच्या वतीने करण्यात आला. तसेच यावेळी डॉ. अजित जाधव,सौ. अश्विनी जाधव,डॉ.दिपा घाडगे,डॉ. प्रवीण बाबर,डॉ. अंजली बाबर,डॉ. धवल सावताडे,डॉ.शितोळे आदी उपस्थित होते.

## चंद्रभागा स्वच्छतेसंदर्भात आ. पाटलांनी उठविला विधानसभेत आवाज

**● नदी पात्रातील पाणी स्वच्छतेसाठी ३४ कोटी ६५ लाख खर्चून कार्यान्वीत केलेल्या यंत्रणेच्या कार्यक्षमेवर उपस्थित केला सवाल**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१८ मार्च -**

पंढरपूरच्या चंद्रभागा नदीच्या स्वच्छते संदर्भात आमदार अभिजीत पाटील यांनी विधानसभेत मंगळवारी (ता.१८) आवाज उठवून नमामी चंद्रभागा योजनेसंदर्भात शासनाला जाब विचारला. या बरोबरच चंद्रभागा नदी पात्रात बसविण्यात आलेल्या ३४ कोटी ६५ लाख रुपये खर्चुन फ्लोटींग बोटीव्दारे स्वच्छतेसाठी कार्यान्वीत केलेली यंत्रणा कुचकामी ठरते आहे काय ? असा सवाल देखील यावेळी आमदार पाटील यांनी सभागृहात उपस्थित केला.

पंढरपूरच्या चंद्रभागा नदीच्या स्वच्छते संदर्भातील प्रश्नास आमदार पाटील यांनी विधानसभेत वाचा फोडली. पिंपरी चिंचवड, पुणे येथून येणारे घाण पाणी भीमा अर्थात चंद्रभागा नदीव्दारे थेट उजनी धरणात येते. या घाण पाण्यावर प्रक्रिया होणार का ? या पाण्याची गुणवत्ता तपासण्यात आलेली आहे का ? पंढरपूर येथे नगरपालिकेने चंद्रभागा नदी पात्रातील पाण्याच्या स्वच्छते संदर्भात जी यंत्रणा बसविलेली आहे ती कुचकामी झालेली आहे का ? या बरोबरच नमामी चंद्रभागा म्हणून नमामी गंगेच्या धर्तीवर जो महत्वकांशी प्रकल्प आहे. या प्रकल्पा संदर्भात आत्तापर्यंत फक्त बैठकांच पार पडलेल्या आहेत. प्रत्यक्षात या योजनेसाठी निधी उपलब्ध झाला नाही. त्यामुळे या योजनेसाठी निधी उपलब्ध होईल का ? या प्रकल्पा संदर्भात या अगोदर किती बैठका झाल्या आहेत. पुढची बैठक कधी होणार आहे ? अशी एक ना अनेक प्रश्नांची सरबत्ती केली.

दरम्यान आमदार पाटील यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांवर शासनाच्या वतीने सभागृहात उत्तर देताना




पर्यावरण मंत्री पंकजा मुंढे यांनी सांगितले की, नमामी चंद्रभागा योजने मध्ये आत्तापर्यंत ४८ कोटींच्या प्रमा दिलेल्या आहेत. त्यामध्ये ३४ कोटी रुपये जे नगरपालिकेला दिलेले असून त्यामध्ये केवळ १५ कोटी रुपये खर्च करण्यात आलेले आहते. एप्रिल अखेरपर्यंत जे एसटीपीचे काम आहे ते पुर्ण केले जाईल असा अंदाज आहे. या संदर्भात प्रदूषणाची तक्रार कुठेही असेल तर त्यावर तात्काळ कारवाई केली जाईल. पण अशी कोणतीही प्रदूषणासंदर्भातील तक्रार आमच्या विभागाला तेव्हा प्राप्त झाली नसल्याचे देखील पर्यावरण मंत्री पंकजा मुंढे यांनी विधानसभेत सांगितले. चंद्रभागेच्या पावित्र्या विषयी अधिवेशन संपल्या नंतर स्वतः मी पंढरपूरला भेट देवून नमामी चंद्रभागा योजनेचा पुर्ण रिव्हिव्ह घेणार आहे. त्याचे ऑडिट करणार आहे. नदी संवर्धना संदर्भात जलसंपदा, पाणीपुरवठा आणि नगरविकास विभाग आहे त्यांच्या आधिकाऱ्यांना देखील त्यावेळी बोलविणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## उन्हाळी आवर्तनाचे पाणी प्राधान्याने कोंढेज तलावाला द्या

**अनिल फाटके यांची मागणी**

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि.१८ मार्च,**

दहिगाव उपसा सिंचन योजनेच्या लाभक्षेत्रातील कोंढेज हा सर्वात मोठा तलाव आहे.या तलावावरती वरकटणे आणि कोंढेज ही दोन गावे अवलंबून आहेत. कोंढेज ५०२ हेक्टर व वरकटणे ७९२ हेक्टर असे १२९४ हेक्टर क्षेत्र दहिगाव योजनेच्या लाभक्षेत्रामध्ये येते.



यापूर्वी दहिगाव योजनेचे रब्बी आवर्तन ५० दिवस चालूनही कोंढेज तलावाला पाणी मिळालेले नव्हते. परवा दि.२० मार्चपासून दहिगाव चे उन्हाळी आवर्तन सुरू होत आहे. या आवर्तनाचे पाणी कोंढेज तलाव व रब्बी आवर्तनाम ध्ये वंचित राहिलेल्या ५ हजार हेक्टर क्षेत्राला प्राधान्याने पाणी द्यावे अशी मागणी कोंढेज गावचे नागपूर महापौर केसरी पैलवान अनिल फाटके यांनी केली आहे.

याविषयी अधिक बोलताना ते म्हणाले की,कोंढेज व वरकटणे येथील ग्रामस्थांनी पाच लाख लोक वर्गणी गोळा करून पाच वर्षांपूर्वी कोंढेज तलावात पाणी आणलेले आहे. तलावातील पावसाच्या पाण्याच्या भरोशावर व नियमित सुटणाऱ्या दहिगाव योजनेच्या आवर्तनाम ुळे दोन्ही गावातील शेतकऱ्यांनी केळी व ऊस या बारमाही पिकांची लागवड केलेली असून सध्या पाण्याअभावी ही पिके आता सुकू लागलेली आहेत. हे पाणी शेतकऱ्यांना मिळाले नाही तर शेतकऱ्यांचे कोट्यावधी रुपयांची नुकसान होईल त्यामुळे उन्हाळी आवर्तनाचे पाणी प्राधान्याने कोंढेज तलावाला द्यावे अशी आग्रही म ागणी ग्रामस्थांच्या वतीने पैलवान फाटके यांनी केली आहे.

## 'तिमिर छेदताना' पुस्तकाचे रविवारी प्रकाशन

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. १८ मार्च-**

येथील लेखक सचिन वायकुळे लिखित डॉ. सुनीलकुमार लवटे जीवन चित्र 'तिमिर छेदताना' या पुस्तकाचे येत्या रविवारी सोलापुरातील डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात दुपारी दोन वाजता प्रकाशन होत आहे.

कोल्हापूरच्या अविष्कार फाऊंडेशनतर्फे हा सोहळा होणार आहे. मागासवर्गीय आयोगाच्या माजी सदस्या सुरेखा लांबतुरे व अविष्कार फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष संजय पवार यांच्या उपस्थितीत प्रकाशन होणार आहे. या कार्यक्रमास माजी सहाय्यक पोलीस आयुक्त दीपक आर्वे, डॉ. अनिल देशमाने, जब्बार शिकलगार आदी उपस्थित राहणार आहेत. सामाजिक कार्यकर्ते तथा लेखक सचिन वायकुळे यांचे हे सहावे पुस्तक असून एका अनाथ मुलाची प्रेरक यशोगाथा यात रेखाटण्यात आली आहे.

## गांजा ओढू नका म्हटल्याने अपंग व्यक्तीसह त्याच्या अल्पवयीन मुलावर प्राणघातक हल्ला

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. १८ मार्च-**

घराशेजारी गांजा ओढत बसलेल्या दोघांना येथे गांजा ओढू नका म्हटल्याने संतप्त झालेल्या दोन तरुणांनी अपंग व्यक्ती आणि त्याच्या अल्पवयीन मुलावर धारदार कुकरी व लाकडी दांडक्याने प्राणघातक हल्ला केल्याची धक्कादायक घटना बार्शी शहरातील संतोषीमाता चौक, सुभाषनगर येथे घडली.



दत्तात्रय संभाजी सावंत (वय ४५) हे अपंग असून, त्यांचा लाकडाचा व्यवसाय आहे. दि. १५ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास ते आणि त्यांचा मुलगा समर्थ सावंत (वय १६) हे आपल्या घरासमोर बसले होते. त्यावेळी राजू रमेश पारडे व विशाल रमेश पारडे (दोघे रा. नागवाली गल्ली, झाडबुके मैदान, बार्शी) हे सावंत यांच्या घराशेजारीच गांजाची नशा करत बसले होते.

सावंत यांनी त्यांना येथे गांजा ओढू नका असे सांगितल्यावर विशाल पारडे याने संतापून शिवीगाळ करत लाकडी दांडक्याने समर्थ सावंत यांच्या डाव्या हाताच्या कोपराजवळ जोरात मारले, त्यामुळे ते जखमी झाले. त्यावेळी सावंत यांनी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला असता राजू पारडे याने कमरेला लावलेली धारदार कुकरी काढून त्यांच्या डोक्यावर वार केला. विशाल पारडे याने सावंत यांना अपशब्द वापरले, आम्हाला येथून जायला सांगतो काय? असे म्हणत शिवीगाळ करत लाकडी दांडक्याने डावा हात आणि मनगटावर जोरदार वार केले. तसेच, राजू पारडे याने कुकरीने डोक्यावर वार करत असताना सावंत यांनी तो वार अडवण्याचा प्रयत्न केला असता त्यांचे उजव्या हाताच्या बोटाला गंभीर इजा झाली.

या घटनेनंतर दोघांनीही आमच्या वाटेला गेला तर तुला सोडणार नाही अशी धमकी दिली आणि घटनास्थळावरून पळ काढला. घटनेनंतर सावंत यांनी डायल ११२ वर फोन करून पोलिसांना माहिती दिली. जखमीवर जगदाळे मामा हॉस्पिटल, येथे उपचार सुरू केले आहेत.

या प्रकरणी दत्तात्रय सावंत यांनी राजू रमेश पारडे आणि विशाल रमेश पारडे यांच्या विरोधात तक्रार दिली असून, पुढील तपास बार्शी पोलीस करत आहेत.

## सामाईक विहिरीच्या पाण्यावरुन वाद; शेतकऱ्यावर हल्ला

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. १८ मार्च**

तालुक्यातील श्रीपतपिंपरी येथे सामाईक विहिरीच्या पाण्याच्या पाळीवरुन झालेल्या वादातून तिघांनी मिळून एका शेतकऱ्यावर प्राणघातक हल्ला केल्याची घटना घडली. या हल्ल्यात पांडुरंग विठ्ठल घाडगे (वय ५२) हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर सध्या जगदाळे मामा हॉस्पिटल, बार्शी येथे उपचार सुरु आहेत.

याबाबत बार्शी पोलीस ठाण्यातील माहितीनुसार, दि. १५ मार्च रोजी ज्ञानेश्वर दत्तात्रय घाडगे, शंकर अरुण घाडगे व राहूल अरुण घाडगे हे श्रीपतपिंपरी येथील हरी घाडगे यांच्या किराणा दुकानासमोर आले आणि पांडुरंग घाडगे यांच्याशी पाण्याच्या पाळीवरुन वाद घालू लागले. वाद विकोपाला गेल्यानंतर तिघांनी मिळून त्यांना शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. त्यानंतर शंकर आणि राहूल यांनी पांडुरंग घाडगे यांना खाली पाडून ठेवले आणि ज्ञानेश्वर घाडगे याने जवळच पडलेला दगड त्यांच्या डोक्यात मारला. यामुळे त्यांच्या डोक्यातून रक्तस्राव सुरु झाला.

पांडुरंग घाडगे यांच्या मुलाने आणि पत्नीने घटनास्थळी धाव घेत भांडण सोडवण्याचा प्रयत्न केला, परंतु आरोपींनी त्यांना धमकी देत सांगितले की, सामाईक विहिरीवरुन आम्हाला पाणी नाही दिले, तर तुमचे हातपाय मोडू. जखमी पांडुरंग घाडगे यांना तातडीने बार्शी ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले. मात्र, प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी जगदाळे मामा हॉस्पिटल, बार्शी येथे हलवण्यात आले. या घटनेची जोतीराम पांडुरंग घाडगे यांनी बार्शी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून, ज्ञानेश्वर दत्तात्रय घाडगे, शंकर अरुण घाडगे आणि राहूल अरुण घाडगे यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बार्शी पोलिसांकडून पुढील तपास सुरु आहे.

## बायपास रोड झाल्याने शहरातील व्यवसायावर परिणाम

**तभा वृत्तसेवा**
**माळशिरस, दि.१८ मार्च**

माळशिरस नजीक पंढरपूर, शिंगणापूर, गोंदवले, आदी देवस्थाने असल्याने शहरातून जाणाऱ्या मार्गावरील हॉटेल, मेडिकल, फ्रूट स्टॉल यासारख्या दुकानांना यात्रेकरूंची गर्दी असायची त्यामुळे शहरातून जाणाऱ्या आळंदी पंढरपूर पालखी मार्गावरील व्यवसाय करणाऱ्या दुकानदाराचा व्यवसाय चहाला चालत होता.परंतु बायपास रस्ता झाल्याने या व्यावसायिकांच्या व्यवसायावर परिणाम झाला असून व्यवसाय चालविणे मुश्किल झाले आहे.

माळशिरस हे आळंदी पंढरपूर मार्गावरील तालुक्याचे गाव आहे. माळशिरस पासून पंढरपूर ५५ किमी अंतरावर तर मोठ्या महादेवाचे शिखर शिंगणापूर ३० किमी अंतरावर आहे.त्यामुळे या व्यावसायिक अडचणीत आले आहेत.

## डॉ. अंधारे यांच्या रुपाने झाले विठ्ठलाचे दर्शन

**● बोर्डीच्या ७५ व्या वर्षीय बाळासाहेब सावधनकर यांची प्रतिक्रिया**

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.१८ मार्च-**

बोर्डी येथील ७५ वर्षांचे वारकरी बाळासाहेब सावधनकर पंढरपूरला वारीसाठी जात होते. प्रवासात त्यांना कुर्डूवाडीजवळ हृदयविकाराचा झटका आाला. तेथील खासगी रुग्णालयात नेले मात्र तेथील डॉक्टरांनी पुढील उपचारासाठी बार्शी येथील डॉ.संजय अंधारे यांच्या सुश्रुत हॉस्पिटलमध्ये पाठवले अन डॉ. अंधारे व डॉ. विकास खामकर यांनी त्या वारकऱ्यास ॲन्जियोप्लास्टीसह इतर उपचार करून जीवनदान मिळवून दिले.



वेळेवर उपचार मिळाल्याने आणि त्यांच्या शरीराने देखील उपचारास योग्य प्रतिसाद दिल्याने श्री. सावधनकर यांची तब्येत झपाट्याने सुधारली व पाच दिवस अतिदक्षता विभागामध्ये उपचार घेतल्यानंतर त्यांना डिस्चार्ज देण्यात आला. त्यांचे करण्यात आलेले सर्व उपचार महाराष्ट्र शासनाच्या महात्मा फुले जन आरोग्य योजने अंतर्गत मोफत करण्यात आले. सदरील पेशंट हे आरोग्य राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांच्या गावातील आहेत हे सम जल्यानंतर डॉ. अंधारे यांनी त्यांच्या स्वीय सहाय्यकास परिस्थितीची माहिती दिली. आरोग्य राज्यमंत्री यांचे मेहुणे असलेले बार्शीतील अप्पर जिल्हाधिकारी अमोल यादव यांच्याशीही डॉ.अंधारेनी रुग्णाच्या परिस्थितीविषयी चर्चा करुन त्यांना योग्य ते उपचार सुरु असल्याचे सांगितले. रुग्णाच्या नातेवाईकांना परिस्थितीची माहिती दिली आणि त्यांना पुढील उपचारांची दिशा सांगितली. त्यांना धीर दिला आणि पैशाची काळजी करु नका आपल्या हॉस्पिटलमध्ये उपचार महात्मा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत मोफत होतात असे सांगितले. बार्शीतील हृदयरोगतज्ञ डॉ. विकास खामकर यांनी त्यांच्या हृदयाच्या रक्तवाहिनीमध्ये एक मोठी गुठळी झाली आहे असे दिसून आले. ती गुठळी काढून टाकण्यासाठी लगेच ॲन्जियोप्लास्टी करण्यात आली. आणि त्यानंतर त्यांना अतिदक्षता मध्ये ठेवण्यात आले. वेळेवर उपचार मिळाल्याने आणि त्यांच्या शरीराने देखील उपचारास योग्य प्रतिसाद दिल्याने त्यांची तब्येत झपाट्याने सुधारली व पाच दिवस अतिदक्षता विभागामध्ये उपचार घेतल्यानंतर त्यांना डिस्चार्ज करण्यात आला. डिस्चार्ज करताना विश्व हिंदू परिषदेचे प्रखंड मंत्री बापूसाहेब कदम यांच्या हस्ते पेशंटचा सत्कार करण्यात आला.रुग्णाच्या नातेवाईकांनी त्यांना मिळालेल्या उपचारांबद्दल व सुश्रुत हॉस्पिटल मधील सहकार्याबद्दल डॉ. संजय अंधारे यांच्या बद्दल कृतज्ञता व्यक्त केली व सर्व कर्मचाऱ्यांचे आभार मानले.

## माता बालक उत्कर्ष प्रतिष्ठानतर्फे आरोग्यावर कार्यशाळेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१८ मार्च -**


सांगोल्यातील माता बालक उत्कर्ष प्रतिष्ठानतर्फे आरोग्य प्रकल्पांतर्गत शुक्रवारी दि.२१ मार्च रोजी सकाळी १० वाजता उत्कर्ष विद्यालय येथे महिला व मुलींसाठी 'आरोग्य' यासंबधी मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

प्रतिष्ठानतर्फे महिलांचे शारीरिक व मानसिक आरोग्य सदृढ राहावे यासाठी वेगवेगळे आरोग्य विषयक शिबिरांचे आयोजन करून तज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन करण्यात येते. सध्या सर्व्हायकल कॅन्सरचे प्रमाण वाढते आहे. अश्विनी रुरल मेडिकल कॉलेजच्या निवृत्त अधिष्ठाता डॉ. माधवी रायते, सोलापूर सिव्हील हॉस्पिटल येथील डॉ. विद्या तिरणकर या उपस्थित राहून आरोग्याचे महत्व व पिशवीच्या तोंडाचा कॅन्सर, स्तनाचा कॅन्सर यासंबंधी रुटीन तपासणी, पॅपस्मिअरचे महत्व, प्रतिबंधक लस याचे महत्व याबद्दल सविस्तर माहिती देणार आहेत. तरी सर्व किशोरवयीन मुली व महिला, पालक यांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन संस्था अध्यक्षा प्रा.निलिमा कुलकर्णी, आरोग्य व किशोरी विभाग प्रमुख डॉ.केतकी देशपांडे, डॉ.सुपर्णा केळकर यांनी केले आहे.



### मुला-मुलींना मार्गदर्शन

सांगोला तालुक्यात माता बालक उत्कर्ष प्रतिष्ठान संस्थेचे १२ ते १८ वयोगटातील किशोर किशोरींसाठी सांगोल्यामध्ये ८ किशोरी व सांगोला, महूद, गार्डी, आचकदानी येथे ५ किशोर वर्ग सुरु आहेत. समाजातील वाढती गुन्हेगारी, विद्यार्थ्यांचे आत्महत्येचे प्रमाण, मुलांमधील वाढते व्यसनांचे प्रमाण, लैंगिक शोषण, अशा अनेक नवीन पिढीच्या नवीन समस्या आपल्याला रोज दिसून येतात. या समस्या पासून आपल्या मुलांना कसे दूर ठेवायचे याबाबत मार्गदर्शन केले जाते.



धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## सार्वजनीक ठिकाणी थुंकण्यावर आणि धुम्रपानावर प्रतिबंध

तभा वृत्तसेवा
तुळजापूर, दि.१८ मार्च -

धाराशिव जिल्ह्यात सार्वजनीक ठिकाणी थुंकण्यावर आणि धुम्रपानावर प्रतिबंध करण्यात आले आहे. त्यानुसार जिल्हयातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालय, कार्यालयीन

परिसर, शासकीय व खाजगी आस्थापना, शासकीय व खाजगी शैक्षणीक



संस्था तसेच शहरातील सर्व सार्वजनीक ठिकाणे

तंबाखूमुक्त करण्यासाठी केंद्र शासनाच्या सिगारेट आणि अन्य तंबाखूजन्य उत्पादने (जाहिरात प्रतिबंध, व्यापार विनियमन

आणि वाणिज्य उत्पादन, पुरवठा आणि वितरण) कायदा, २००३ च्या कलम ४ मधील तरतुदीची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी करण्याचे आदेश जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी १८ मार्च रोजी दिले आहेत.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

### संक्षिप्त वृत्त...



#### महात्मा बसेश्वरमध्ये वासंतीक वर्गाचे उद्घाटन

उमरगा, दि.१८ मार्च -

महात्मा बसवेश्वर विद्यालयातील इयत्ता १० वी च्या उन्हाळी वर्गाचे उदघाटन डॉक्टर कपिल महाजन कार्यवाही यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी विद्यार्थ्यांनी जिद्द चिकाटी मेहनत केल्याशिवाय ध्येय प्राप्त होणार नाही ध्येय प्राप्तीसाठी दैनंदिन अभ्यासाचे सातत्य राखून मेहनतीच्या बळावर गुणवत्ता संपादन करावी व सर्व क्षेत्र पदाकांत करावे असेही ते म्हणाले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक नेताजी गायकवाड व शिक्षक सुनील बटगिरे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय कोथळीकर यांनी तर आभार प्रदर्शन रूपाली वेदपाठक यांनी केले. या कार्यक्रमास शाळेतील सर्व शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

#### नंदकुमार पवार यांची निवड

उमरगा, दि.१८ मार्च -




उमरगा तालुकातील गुंजोटी येथील रहीवाशी तथा श्रीकृष्ण महाविद्यालयातील प्रा. नंदकुमार पवार यांची महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र याच्या संयुक्त विद्यमाने करीअर कट्टा या उपक्रमाअंतर्गत सन २०२५-२०२६ शैक्षणिक वर्षासाठी धाराशिव जिल्ह्यातील उमरगा तालुका समन्वयकपदी निवड करण्ययात आल्याचे पत्र महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्राचे प्रदेशाध्यक्ष यशवंत शितोळे यांनी नंदकुमार पवार यांना निवडीचे पत्र दिले. निवडीबद्दल श्रीकृष्ण महाविद्यालय मित्र परिवार यांनी नंदकुमार पवार यांचे अभिनंदन केले.



#### जि.प. शाळेच्या विद्यार्थ्यांची प्रवेश दिंडी

इटकळ, दि.१८ मार्च -

गुढीपाढवा नववर्षाच्या निमित्ताने इटकळ येथील जि.प.च्या शाळेत पहिली वर्गासह इतर सर्व वर्गात प्रवेशपात्र विध्यार्थ्यांचे प्रवेश व्हावेत. तसेच ६ ते १४ वयोगटातील एकही विद्यार्थी शाळाबाह्य राहू नये यासाठी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाच्या वतीने 'गुढीपाडवा प्रवेश वाढवा हे अभियान संपूर्ण जिल्हात राबविण्यात येत आहे. यास तुळजापूर तालुक्यात प्रतिसाद मिळत आहे.महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे राज्य राष्ट्रीय उपाध्यक्ष बाळकृष्ण तांबारे यांच्या संकल्पतेतून हे अभियान राबविण्यात येत आहे. अभियांना अंतर्गत जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा इटकळ गावातून प्रवेश दिंडी काढण्यात आली. यावेळी प्रवेशपात्र विध्यार्थ्यांचे प्रवेश फॉर्म भरून घतले. अभियासाठी शाळेचे मुख्याध्यापक तानाजी गायकवाड, बालाजी कदम, सुधाकर कांबळे, नागेश स्वामी, संगीता घुगे, वैशाली देशमाने या सर्व सहशिक्षकांने पुढाकार घेतला.



#### रुपामाता शाखेचा वर्धापन दिन साजरा

नळदुर्ग, दि.१८ मार्च -

नळदुर्ग येथिल रुपामाता मल्टीस्टेट शाखेचा १२ वा वर्धापन दिन दि.१७ मार्च रोजी उत्साहाने साजरा करण्यात आला. यावेळी रुपामाता यांच्या प्रतिमेचे पुजन पत्रकार विलास येडगे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सुहास येडगे, शिवाजी नाईक, दादासाहेब बनसोडे, डुकरे, प्रभाकर घोडके, संजय जाधव, रघुनाथ नागणे, अमर भाळे, पद्माकर घोडके, चितरंजन पाटील यांच्यासह नागरीक व शाखेतील कर्मचारी रघुवीर तिवारी, अनिता पाटील, पार्थ कुलकर्णी, शरद पाटील, मिलींद कुलकर्णी, सुरज बिराजदार उपस्थित होते.

#### प्रा.डॉ. मनोज सोमवंशी यांची निवड

लोहारा, दि.१८ मार्च -

लोहारा शहरातील शंकरराव जावळे पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय लोहारा येथील डॉ. मनोज सोमवंशी यांची महाराष्ट्र राज्य माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र व उच्च व तंत्रशिक्षण मंत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने चालणाऱ्या करीअर कट्टा तालुका समन्वयक म्हणून नियुक्ती करण्यात आली. करीअर कट्टा उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना मोबाईल पच्या माध्यमातून तज्ञ व्यक्तीचे स्पर्धापरीक्षा व उद्योगधंदे यांच्या विषयी दररोज माहिती दिली जाते. या निवडीबद्दल यशवंत शितोळे, रमेश पाटील, डॉ. शेषेराव जावळे पाटील, डॉ. संजय अस्वले, डॉ. हरिदास फेरे, डॉ. दत्तात्रय साखरे, डॉ. मंगेश खराटे यांनी अभिनंदन केले आहे.

### धाराशिवात जागतिक ग्राहक हक्क दिन साजरा...

# ग्राहक संरक्षण कायद्यामुळे ग्राहकाला जलदगतीने न्याय मिळण्यास मदत

### जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार...

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.१८ मार्च -

ग्राहकांची कर्तव्ये, हक्क व जबाबदाऱ्याबाबत जनजागृती करण्याचे काम जागतिक ग्राहक हक्क दिनाच्या निमित्ताने होत आहे. विविध घटकांचा समावेश करुन ग्राहक संरक्षण कायदा तयार करण्यात आला आहे. ग्राहक संरक्षण कायदयामुळेच ग्राहकाला जलदगतीने न्याय मिळण्यास मदत झाली आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अन्न व नागरी पुरवठा विभागाच्यावतीने आज १८ मार्च रोजी जागतिक ग्राहक हक्क दिनानिमित्त नियोजन भवनातील सभागृहात आयोजित ग्राहक जनजागृती कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरुन जिल्हाधिकारी पुजार बोलत होते. यावेळी जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचच्या अध्यक्ष प्रज्ञा हेंदरे, प्रभारी अपर जिल्हाधिकारी शिरीष यादव, निवासी उपजिल्हाधिकारी शोभा जाधव, जिल्हा पुरवठा अधिकारी स्वाती शेंडे, उपजिल्हाधिकारी अरुणा गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी जिल्हाधिकारी पूजार व हेंदरे यांनी नियोजन भवन परिसरात जागतिक ग्राहक हक्क दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयाकडुन आयोजित ग्राहक जनजागृती प्रदर्शनाचे फित कापून उद्घाटन केले. या प्रदर्शनात तहसिल कार्यालय, धाराशिव यांचा रेशनकार्ड ई-केवायसी करणेबाबत, अन्न व औषध प्रशासन विभाग, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, दुग्ध विकास अधिकारी, वैधमापनशास्त्र विभाग एलआयसी, उमेदच्या बचतगटांचे स्टॉल, गॅस एजन्सी आणि सेंद्रिय निविष्ठा निर्मिती व विक्रीचे स्टॉल लावण्यात आले.

जिल्हाधिकारी पूजार मार्गदर्शन करतांना पुढे म्हणाले की, ग्राहक तक्रार निवारण मंचच्या माध्यमातून ग्राहकाला न्याय देण्याचे काम होत आहे. ग्राहक संरक्षण कायदयाअंतर्गत विविध सेवा येतात. ग्राहकाने केलेल्या तक्रारीवरुन त्याला न्याय देण्याचे काम या कायदयामुळे होत आहे. ग्राहक संरक्षण कायदयाबाबत जिल्ह्यातील शाळा व महाविद्यालयाच्या माध्यमातून जनजागृती करण्यात यावी. तसेच तालुकास्तरावर ग्राहक जनजागृती शिबीरांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

वीज वितरण कंपनीचे एन.आर. देशमुख यांनी पी.एम. सुर्यघर योजनेची माहिती देतांना सांगितले की, पारंपारीक उर्जेचे स्त्रोत हे खर्चिक व पर्यावरणाला हानी पोहचविणारे आहे. कोळशातून मोठया प्रमाणात वीज निर्मिती होत असतांना दुसरीकडे प्रदुषणात वाढ होते. सन २०२५ चा विचार केल्यास कोळसा हा संपणार आहे. अपारंपारीक उर्जेकडे आपण वळत आहोत. सौर



उर्जा ही न संपणारी आहे.आज जे इंधन म्हणून आपण कोळसा, गॅस, आईलचा वापर करतो, हे उर्जेचे स्त्रोत पर्यावरणाला हानी पोहचवित आहे. पी.एम. सूर्यघर योजनेच्या माध्यमातून सौर उर्जेची निर्मिती आपण घरीच करुन आपली वीजेची गरज भागवू शकतो. सौर उर्जेमुळे पर्यावरणाला हानी पोहचत नाही. त्यामुळे जास्तीत जास्त कुटुंबांनी पी.एम. सुर्यघर योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन त्यांनी केले. मान्यवरांच्या हस्ते जिल्हा ग्राहक संरक्षण समितीचे अशासकीय सदस्य अजित बगाडे व अशोक घोडके यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी शरद वडगावकर, अजित बगाडे, सचिन कवडे, आशिष पाथरकर, संतोष केंद्रे, अंकुश उबाळे, अनिल पाटील, दिलीप पाटील, गजानन कुलकर्णी, रविशंकर पिसे यांच्यासह अन्य जिल्हा ग्राहक परिषदेच्या अशासकीय सदस्यांचा पुष्प देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा पुरवठा अधिकारी स्वाती स्वाती शेंडे यांनी केले.

संचालन धाराशिव तहसीलदार मृणाल जाधव यांनी, उपस्थितांचे आभार सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी निकिता साकळे यांनी मानले. यावेळी ग्राहक चळवळीत काम करणारे कार्यकर्ते, विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी, स्वस्त धान्य दुकानदार, नागरिक तसेच विविध शाळा महाविद्यालयाचे विद्यार्थी उपस्थित होते.

## दोनशे होतकरू, गरजू विद्यार्थिनींना सायकलींचे वाटप

### मुंबईच्या गेम्स फौंडेशनचा पुढाकार...

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.१८ मार्च -

ग्रामीण भागातील गरजू, होतकरू विद्यार्थिनींना शाळेत येण्यासाठी मदत व्हावी, गरीबांच्या मुली शिक्षणाच्या प्रवाहात याव्यात, यासाठी सामाजिक संस्थांनी पुढाकार घेतला पाहिजे, असे मत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष यांनी व्यक्त केले.

मुंबई येथील २४-७ फौंडेशनच्यावतीने धाराशिव जिल्ह्यातील २०० विद्यार्थिनींना प्राथमिक स्वरूपात सायकलींचे वाटप करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमास फौंडेशनच्या उपाध्यक्ष स्नेहा संगवी, प्राथमिक शिक्षणाधिकारी अशोक पाटील, उपशिक्षणाधिकारी रंजना मैंदर्गी, तुळजाभवानी सैनिकी विद्यालयाचे प्राचार्य वैजीनाथ घोडके, तुळजापूरचे गटशिक्षणाधिकारी अर्जून जाधव, उमरग्याचे गटशिक्षणाधिकारी युवराज



पडवळ, वाशीचे घोलप, धाराशिवचे हसराल यांच्यासह शिक्षण विस्तार अधिकारी, मुख्याध्यापक यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते गरजू व होतकरू मुलींना प्राथमिक स्वरूपात सायकल वाटपाचा शुभारंभ करण्यात आला. जिल्ह्यातील धाराशिव, कळंब, तुळजापूर, लोहारा, उमरगा, परंडा या सहा तालुक्यांसाठी प्रत्येकी २८ सायकली तर भूम तालुक्यातील होतकरू मुलींसाठी २४ व वाशीसाठी आठ, याप्रमाणे दोनशे सायकलींचे वाटप यावेळी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

फौंडेशनच्यावतीने ज्या-त्या तालुक्यांना सायकली वाटपासाठी पाठवून देण्यात आल्या आहेत. दरम्यान ग्रामीण भागातील गरजू मुलींना दररोज शाळेत ये-जा करण्यासाठी सायकल मिळाल्याने मुलींमध्ये आनंदाचे वातावरण तर पालकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी तुळजापूर पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी कार्यालयातील अधिकारी, कर्मचार्यांनी परिश्रम घेतले.

## आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी दोघांवर गुन्हा

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.१८ मार्च -

एका २० वर्षीय तरुणीला मानसिक त्रास देत धमकी दिल्याने तिने आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. याप्रकरणी धाराशिव शहर पोलीस ठाण्यात दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




साक्षी संतोष कांबळे (वय २०, रा. नागसेनगर, धानोरा रोड, बीड) हिने १८ ऑक्टोबर २०२४ ते १४ मार्च २०२५ दरम्यान भिमनगर, धाराशिव येथील मामा मेसा जानराव यांच्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. आरोपी अभिषेक कदम (रा. मांडवजाळी, जि. बीड) आणि शितल कदम (रा. मुंबई) यांनी तिला फोन व मेसेजद्वारे मानसिक छळ केला. तसेच तू दुसरीकडे लग्न कसे करू शकतेस? असे म्हणत धमक्या दिल्या आणि दोघांचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी दिली. या मानसिक तणावाला कंटाळून साक्षीने आपले जीवन संपवले.

या प्रकरणी फिर्यादी कोयना सतीश विटकर (वय ४०, रा. नागसेनगर, धानोरा रोड, बीड) यांनी १७ मार्च रोजी दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

## लातूर-बार्शी रोडवरील अपघातात तीन जण ठार

धाराशिव, दि.१८ मार्च -

ढोकी गावाजवळ भीषण अपघातात तीन जणांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. हा अपघात १६ मार्च रोजी रात्री १०.३० वाजता राधिका हॉटेलजवळ घडला.

नितिन जटाळ, केशव वाघमारे आणि रामेश्वर सुरवसे हे तिघे होंडाई वेरणा (क्र. एमएच. १४ ईक्यु ११२२) गाडीतून प्रवास करत असताना आयशर ट्रक (क्र. एमएच.२४ यु ६७२२) च्या चालकाने ट्रक हायगयी व निष्काळजीपणे चालवून समोरून धडक दिली. या अपघातात तिघे गंभीर जखमी होऊन जागीच मृत्युमुखी पडले. या दुर्घटनेबाबत रामेश्वर व्यंकटराव जटाळ (वय ३७, रा. कामखेडा, ता. रेणापूर, जि. लातूर) यांनी दिलेल्या तक्रारीवरून ढोकी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवला आहे.

## पो.नी. अश्विनी भोसलेंच्या तत्परतेमुळे मुस्कानला भेटला 'आसरा'

तभा वृत्तसेवा
उमरगा, दि.१८ मार्च -

दि.१६ मार्च रोजी रात्री ८ वाजण्याच्या सुमारास गुंजोटी रोडवरील राजधानी पेट्रोल पंप आणि बायपास कॉर्नरवर १५ ते १६ वयोवर्षीय एक मुलगी मानसिक तणावात वावरताना दिसली. ती अज्ञात कारणामुळे रस्त्याच्या मध्यभागी चालत होती, आणि गाड्या तिच्या बाजूने जात होत्या. या घटनेची माहिती शहरातील व्यवसायीक फेरोज मुरशद यांनी सचिन बिद्री यांना दिली. बिद्री यांनी पोलिस निरीक्षक अश्विनी



भोसले यांना याबाबत सविस्तर माहिती दिली.

घटना समजल्यावर पोलिस निरीक्षक अश्विनी भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली एक पथक घटनास्थळी पोहोचले. मुलगी घाबरलेली आणि मानसिक तणावात असल्याचे दिसत होते. फेरोज मुरशद, दिलीप सगर आणि मुस्तफा कारभारी यांनी मुलीला चहा, बिस्कीट आणि वडापाव दिल्यानंतर ती थोडीफार बोलू लागली. तिने सांगितले की, तिचे आई-वडील मरण पावले असून, ती चाचा-चाची कडे राहते. तिला घरातील छळाची सुस्पष्ट माहिती दिली.

त्यानंतर, पोलिस पथकाने मुस्कानला धाराशिव जिल्हा महिला व बालकल्याण यांच्याकडे सोपवले. तेथून, मुस्कानला नळदुर्ग येथील 'आपलं घर' या संस्थेतील शेल्टर होममध्ये ठेवण्याचे आदेश देण्यात आले. दुसऱ्या दिवशी, पहाटे ५ वाजता मुस्कानला नवा आसरा मिळाला आणि ती 'आपलं घर' येथे राहू लागली. अश्विनी भोसलेंच्या तत्परतेमुळे मुस्कानला एका सुरक्षित आणि संरक्षित वातावरणात आश्रय मिळाला आहे.

## रामनवमीपर्यंत रस्त्याचे काम पूर्ण करण्याची ग्रामस्थांची मागणी

तभा वृत्तसेवा
नळदुर्ग, दि.१८ मार्च -

नळदुर्ग (राष्ट्रीय महामार्ग) ते लोहगाव या रस्त्याचे काम गेल्या वर्षभरापासुन रेंगाळत ठेऊन भाविक, नागरीक व शेतकरी यांना वेठीस धरणाऱ्या ठेकेदार व संबंधित विभागावर जिल्हाधिकाऱ्यांनी तात्काळ कडक कारवाई करुन रस्त्याचे काम करण्यात कुचराई करणाऱ्या ठेकेदारकडुन हे काम काढुन घ्यावे व या रस्त्याचे काम येणाऱ्या श्री रामनवमी पर्यंत पुर्ण करुन घ्यावे, अशी मागणी होत आहे.

आमदार राणाजगजितसिंह यांच्या प्रयत्नामुळे राष्ट्रीय महामार्ग (नळदुर्ग) श्रीक्षेत्र रामतीर्थ मार्गे लोहगाव या रस्त्याच्या कामास



मंजुरी मिळाली आहे. हा रस्ता वाहतुकीसाठी अतिशय धोकादायक व खराब झालेला आहे. याची दखल घेऊनच आमदार राणाजगजितसिंह पाटील या रस्ता कामासाठी मंजुरी मिळवुन निधीही उलब्ध करून आणला आहे. यारस्त्याचे काम पुर्ण झाल्यानंतर श्रीक्षेत्र रामतीर्थ येथे येणारे भाविक तसेच या रस्त्यावरून लोहगावसह इतर ठिकाणी जाणाऱ्या नागरीकांना अतिशय सोईचे होणार आहे. सध्या या रस्त्याची अवस्था अतिशय वाईट झाली आहे. राष्ट्रीय महामार्ग ते श्रीक्षेत्र रामतीर्थ पर्यंत तर रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले आहेत. या खड्ड्यातून जाताना भाविकांना कमालीचा त्रास होत आहे.

या रस्त्याचे गेल्या एक वर्षापासुन काम रेंगाळत पडले आहे याला जबाबदार संबंधित ठेकेदार व संबंधित विभागाचे अधिकारी आहेत. वास्तविक पाहता हे काम पुर्ण करण्यासाठी कुठल्याच प्रकारची आडकाठी नाही असे असताना संबंधित ठेकेदाराने हे काम का पुर्ण केले नाही? याची चौकशी होणे गरजेचे आहे. २०२४ च्या श्री रामनवमी रोजी या रस्त्याचे काम करण्यासाठी संबंधित ठेकेदाराने या रस्त्याच्या बाजुला खडी आणुन टाकली आहेही खडी एक वर्षांपासुन तशीच त्याठिकाणी पडुन आहे. आता दि.६ एप्रिल रोजी या वर्षातील श्री रामनवमी आली आहे.

त्यामुळे प्रशासनाने दि.६ एप्रिलपर्यंत निदान राष्ट्रीय महामार्ग ते श्रीक्षेत्र रामतीर्थ पर्यंतच्या रस्त्याचे तरी काम पुर्ण करून घ्यावे अशी मागणी श्रीक्षेत्र रामतीर्थ देवस्थान व भाविकांनी केली आहे.

## खासापूरीस विद्युत केंद्रास मंजूरी

तभा वृत्तसेवा
परंडा, दि.१८ मार्च -

खासापूरी येथे नवीन ३३ के. व्ही. विद्युत केंद्रास मंजूरी देऊन उभारणीचे काम तातडीने करण्याचे आदेश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले आहेत.

खासापूरी मध्यम प्रकल्पात पाणी असूनही दरवर्षी शेतकऱ्यांना वीजेच्या समस्येचा सामना करावा लागतो. खासापूरी व परिसरातील गावचे बागायती क्षेत्र खूप मोठ्या प्रमाणात आहे. मात्र तेथील शेतकऱ्यांच्या शेतीपंपास पुरेशा दाबाने वीज पुरवठा होत नाही. अत्यंत कमी दाबाने व सतत खंडीत होणारा वीज पुरवठा यामुळे खासापूरी व परिसरातील शेतकरी त्रस्त असून शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते.

धाराशिव
जिल्हा
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## माजी मंत्री तानाजीराव सावंत यांच्या वाढदिवसानिमित्त १०५ जणांचे रक्तदान

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१८ मार्च -**

महाराष्ट्र राज्याचे माजी आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री तानाजीराव सावंत यांच्या वाढदिवसानिमित्त भैरवनाथ शुगर वर्क्स सोनारी तालुका परंडा येथे भव्य रक्तदान शिबिर संपन्न झाले. या शिबिरामध्ये एकूण १०५ जणांनी रक्तदान केले.

रक्तदान केलेल्या प्रत्येक रक्तदात्यांना वीस लिटर पाण्याचे जार भेट म्हणुन देण्यात आले. तसेच भगवंत रक्तपेढीच्या वतीने संचालक गणेश जगदाळे, प्रसाद जगदाळे, सुयोग निकम, विजय तोडकरी राधिका बेले, साक्षी वाडकर यांनी रक्त संकलन केले. या शिबिरावेळी धाराशिव जिल्हा परिषदचे माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष धनंजय सावंत यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी ठोंबरे, काळे, हुलगे, कुलकर्णी, गडगे, भोसले, सिंग, बोरकर, दादा काळे, संदीप पाटील उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीकरणेसाठी सोमनाथ सूर्यवंशी, सुभाष भोसले, बाबा भुई, बाबासाहेब बालगुडे यांनी परिश्रम घेतले.



प्रसंगी भैरवनाथ शुगर सोनारी कारखामधील सर्व पदाधिकारी व खातेप्रमुख कर्मचारी यावेळी शिवसेना पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्यने उपस्थित होते.



# माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांच्या पक्षातील नेत्याच्या भेटीगाठी वाढल्या

### पक्षाकडून जबाबदारी मिळण्याची शक्यता कार्यकर्त्यांमध्ये चर्चेला उधान...

**तभा वृत्तसेवा / सुधीर घोलप**
**तेरखेडा, दि.१८ मार्च -**

भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांच्या पक्षातील नेत्यांच्या भेटीगाठी वाढल्या आहेत. त्यांनी दि.१७ मार्च रोजी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष तथा राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, पणन व राज्य शिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, मंत्री पंकजा मुंडे, गिरीश महाजन, आमदार सुरेश धस, आमदार विक्रांत पाटील, आमदार श्रीकांत भारतीय, आमदार अतुल भातकळकर यांची विधानभवन मुबंई येथे भेट घेतली.





याप्रसंगी त्यांच्यासोबत भाजप जिल्हाध्यक्ष संताजी चालुक्य पाटील, प्रदेश कार्यकारणी सदस्य अनिल काळे उपस्थित होते. मागच्या काही दिवसांपासून ठाकूर यांच्या पक्षातील दिग्गज नेत्यांचा भेटीगाठी वाढल्याने येत्या काळात पक्ष त्यांना मोठी जबाबदारी देणारा असल्याची जिल्ह्यातील कार्यकर्त्यांमध्ये चर्चा सुरू झाली.

मध्यंतरी काही काळात ठाकूर आजारपणात होते मात्र, त्यांचा कार्यकर्त्याशी असलेला संपर्क कमी झाला नाही. सुजितसिंह ठाकूर आजारपणातून बरे झाल्यापासून पक्ष संघटनेच्या कामात ते पायाला भिंगरी लावून फिरत आहेत. ठाकूर हे गेली ४५ वर्ष झाली संघपरिवारात सक्रिय आहेत. त्यांचा सर्वपक्षीय जनसंपर्क आणि उत्तम संघटन कौशल्य, दमदार भाषण ही त्यांच्या राजकीय कामाची मोठी ओळख आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विश्वासू निकटवर्तीय म्हणून ओळख आहे.



भाजपचे जेष्ठ नेते उपपंतप्रधान स्व. लालकृष्ण अडवाणी, स्व. गोपीनाथ मुंडे, स्व. प्रमोद महाजन यांच्यासारख्या देशातील दिग्गज नेत्यांसोबत पक्ष संघटनेचे काम केले आहे. त्यामुळे ठाकूर यांना येत्या काळात मोठी जबाबदारी मिळण्याचे संकेत बोलते जात आहेत.

दरम्यान सुजितसिंह ठाकूर यांच्याशी मुंबई येथील नेत्यांच्या भेटी बाबत संपर्क साधला असता त्यांनी सदिच्छा भेट व धाराशिव जिल्ह्यातील विविध विकास कामावर मंत्र्यांच्या भेटी घेतल्याचे सांगितले.

असले तरी ठाकूर यांना येत्या काळात पक्षाकडून जबाबदारी मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही. आणि तशी मागणी देखील जिल्ह्यातील भाजप कार्यकर्ते करत आहेत.

## महिला पोलीस पाटलाला बडतर्फ करा

### सलगरा ग्रामस्थांची पालकमंत्र्याकडे मागणी...

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.१८ मार्च -**

तुळजापूर तालुक्यातील सलगर (म) येथील महिला पोलीस पाटलाला बडतर्फ करून नेहमी गावात उपलब्ध होणाऱ्या व्यक्तीची पोलीस पाटील पदावर निवड करावी, अशी मागणी सलगरा(म) च्या ग्रामस्थांनी जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

सलगर (म) येथील ग्रामस्थांनी परिवहन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक, जिल्हाधिकारी,

उपविभागीय अधिकारी व जिल्हा पोलीस अधीक्षक यांना लेखी निवेदन देण्यात आले असून, या निवेदनात महिला पोलीस पाटील यांना बडतर्फ करण्याची मागणी करण्यात आली आहे. सलगरा (म)

ग्रामस्थांनी लेखी निवेदनात म्हटले आहे की, सलगरा (म) ता. तुळजापूर) या गावच्या महिला पोलीस पाटील आहेत. पोलीस पाटील हे गावात राहत नसून

त्या कोणत्याही कर्तव्य बजावत नाहीत. सन २०१८ पासून पोलीस पाटील ह्या आपल्या कुटुंबासह अक्कलकोट रोड, पाण्याच्या टाकीजवळ, सोलापूर येथे कायमस्वरूपी राहण्यास आहेत. गावात

फक्त १५ ऑगस्ट व २६ जानेवारी रोजी झेंडावंदनला येतात. पोलीस पाटील यांचे पती हे गावात येऊन दोन नंबर वाल्याकडून हप्ते घेतात. किराणा दुकान, भाजीवाले आदींना दमदाटी करून पैसे देत नाहीत. माझी पत्नी पोलीस पाटील आहे. मी पैसे देणार नाही.

असा दम देतात. आमच्या गावामध्ये कायम स्वरूपी पोलीस पाटील नसल्यामुळे गावातील कायदा व

सुव्यवस्था मोडकळीस आली आहे. आमच्या गावात सरकारी व्यक्ती आल्यानंतर त्यास मदत करण्यासाठी पोलीस पाटील उपलब्ध होत नाही.

अशा कर्तव्यशून्य महिला पोलीस पाटील यांची सखोल चौकशी करून त्यांना बडतर्फ करावे व योग्य अशा

कायमस्वरूपी व गावात नेहमी उपलब्ध होणाऱ्या व्यक्तीची पोलीस पाटील म्हणून निवड करावी, अशी मागणी सलगरा (म) ग्रामस्थांनी केली आहे. या लेखी निवेदनावर ५८ ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## जिल्ह्यात रंगपंचमीच्या दिनानिमित्त आज मद्यविक्रीची दुकाने बंद राहणार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ मार्च -**

जिल्ह्यात रंगपंचमी उत्सवाच्या पार्श्वभूमीवर १९ मार्च २०२५ रोजी मद्यविक्रीची दुकाने बंद राहणार आहे. जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी महाराष्ट्र दारूबंदी कायदा, १९४९ मधील कलम १४२ (१) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून सार्वजनिक शांतता कायम राखण्यासाठी हा निर्णय घेतला आहे.



या आदेशानुसार जिल्ह्यातील सर्व प्रकारच्या देशी व विदेशी मद्यविक्री अनुज्ञप्त्या (लायसन्स) बंद ठेवण्याचे आदेश दिले आहे. या आदेशाचे उल्लंघन झाल्यास संबंधित अनुज्ञप्तीधारकाविरोधात कठोर कारवाई केली जाईल.

महाराष्ट्र दारूबंदी कायदा, १९४९ आणि त्याअंतर्गत असलेल्या नियमांनुसार संबंधितांचे अनुज्ञप्ती कायमस्वरूपी रद्द करण्याची कारवाई करण्यात येईल, असे जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी आदेशात नमूद केले आहे.

## मुलींनी बौद्धिक आणि मानसिक परिपक्वता प्राप्त करावी : डॉ. संजय अस्वले

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१८ मार्च -**

आजच्या मुलींनी एक चांगली बहीण, कन्या, अत्या, आई, सासू बनण्यासाठी बौद्धिक आणि मानसिक परिपक्वता प्राप्त करावी. द्वेष आणि लोभ यापासून दूर राहावे. कि ज्यामुळे नातीगोती जपली जातील आणि कुटुंब व्यवस्था मजबूत होईल. यालाच महिला सबलीकरण म्हणावं, असे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय अस्वले यानी केले.

येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय वाणिज्य विभागातील वाणिज्य मंडळाच्या महिला सबलीकरण मुलीच्या कक्षा अंतर्गत जागतिक महिला दिन सप्ताह समारोपात मुलींची महिला सबलीकरणसाठी भूमिका या विषयावर चर्चा सत्राच्या अध्यक्षीय समारोपात डॉ. अस्वले बोलत होते.

यावेळी महिला सबलीकरण या विषयावर मार्गदर्शन करताना आजच्या काळात खरच महिला अबला आहेत की सबला या प्रश्नावर आपण चर्चा केली पाहिजे.

महिला म्हणुन जीवनाच्या प्रवासात अनंत अडचणी येतात. पण त्या अडचणीवर कशी मात करता येईल यासाठी मुलीनी अभ्यास आणि निरीक्षण करावे, असे प्रतिपादन प्रमुख मार्गदर्शक अँड. शुभदा पोतदार यानी केले. पुढे बोलताना अँड. पोतदार यानी विद्यार्थिनींना कसे वागावे, आणि आपल्या संरक्षण साठी असलेले विविध कायदे यावर सविस्तर मार्गदर्शन केले.



यावेळी योगिता इंगळे, विशाखा शेळके या विद्यार्थिनीनी आपली मनोगते मांडली.

त्यानंतर खुल्या चर्चा सत्रात हुंडा, अत्याचार, न्यायालयीन विलंब, राजकीय हस्तक्षेप अशा अनिष्ट प्रथा आणि चालीरीती याबद्दल विद्यार्थिनीनी प्रश्न मांडले. त्याला या चर्चासत्रात मान्यवरांनी उत्तर दिले.

या कार्यक्रमात सई भोसले या विद्यार्थिनीने दांड पट्टा आणि तलवार बाजीचे सादरीकरण केले. यावेळी डॉ. अजित अष्टे, विजयकुमार मुळे, खंडू मुरलीकर, ओमप्रकाश पवार, अक्षता बिरादार, राणी बेंबळगे यांची उपस्थिती होती

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिता मोरे, प्रास्ताविक श्रेजल पाटील आणि उपस्थितांचे आभार मंजुषा बिराजदार यानी केले.

सदरील कार्यक्रमासाठी वाणिज्य मंडळाच्या महिला सबलीकरण समितीच्या सदस्यांनी पुढाकार घेतला.

## राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ओबीसी सेल पदाधिकारी संपर्क अभियान बैठक व ओबीसी विभागाच्या निवडी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ मार्च -**

ओबीसी सेल प्रदेशाध्यक्ष कल्याणजी आखाडे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाध्यक्ष महेंद्र धुरगुडे यांच्या अध्यक्षतेखाली यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये ओबीसी सेल जिल्हाध्यक्ष बाळासाहेब स्वामी यांनी संघटनात्मक बांधणी यासंदर्भात संपर्क अभियान बैठक आयोजित केली होती. जिल्हाध्यक्ष महेंद्र धुरगुडे यांनी जिल्ह्यातील पदाधिकारी यांच्या वतीने पक्षाची वाटचाल अडीअडचणी समस्या पदाधिकारी यांच्या वतीने प्रदेशाध्यक्ष कल्याणजी आखाडे यांच्या समोर कथन केले.

प्रदेशाध्यक्ष कल्याणजी आखाडे यांच्या मार्गदर्शनाखाली संघटनात्मक बांधणी व पदाधिकारी संपर्क अभियान मधून महत्वाच्या विषयावर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी जिल्हा धाराशिवचे महत्वाची बैठक पार पडली. प्रदेशाध्यक्ष कल्याणजी आखाडे यांनी उपस्थित पदाधिकारी यांना मार्गदर्शन केले व संपूर्ण जिल्ह्यामध्ये ओबीसी विभागची ताकत मोठ्या प्रमाणात वाढवावी यासाठी प्रत्येक पदाधिकाऱ्याने जोमाने कामाला लागावे, असे यावेळी सांगितले.

यावेळी ओबीसी पदाधिकारी यांच्या निवडी पार पडल्या. प्रदेशाध्यक्ष कल्याणजी आखाडे यांच्या हस्ते व जिल्हाध्यक्ष महेंद्र धुरगुडे, सचिन आवटे, जिल्हा निरीक्षक संतोष राजगुरू, ओबीसी



जिल्हा कार्याध्यक्ष राजकुमार गळाकाटे यांच्या उपस्थितीत ओबीसी जिल्हा उपाध्यक्षपदी रवींद्र पवार, जिल्हा चिटणीसपदी विकास भारती, लोंढे कृष्णा, ओबीसी जिल्हा संघटकपदी मुकेश चव्हाण, महेश जाधव, तर परंडा युवा तालुकाध्यक्ष धनंजय आदलिंगे, परंडा तालुका कार्याध्यक्ष चोरमळे किरणयांची नियुक्ती पत्र देऊन नियुक्ती करण्यात आली. व पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी प्रदेश कार्याध्यक्ष ओबीसी अॅड. सचिन आवटे, ओबीसी विभाग प्रदेश उपाध्यक्ष संतोष भाकरे, सामजिक न्याय विभाग जिल्हाध्यक्ष अतुल जगताप, माजी सैनिक विभाग जिल्हाध्यक्ष मच्छिंद्र क्षीरसागर, सेवादल सेल जिल्हाध्यक्ष सतीश घोडेराव, महिला जिल्हा कार्याध्यक्ष अप्सरा पठाण, जिल्हा उपाध्यक्ष बालाजी वगरे, ओबीसी जिल्हा उपाध्यक्ष भाऊसाहेब ननवरे, गणेश सांगोळे, ओबीसी जिल्हा सरचिटणीस शिवाजी येवारे, सोमनाथ इथापे, ओबीसी तालुकाध्यक्ष लक्ष्मण राऊत, बाळू परताळे, अभिजीत वनवे, अर्जुन सायकर, प्रताप शिंदे, दुष्यंत बनसोडे, अनिल कुमार शिंदे, फुलचंद चव्हाण, भानुदास राठोड, सुरेश राठोड, प्रशांत पवार, आकाश पवार, कैलास पवार, प्रदीप राठोड, ताराचंद फार, सुजित पवार, दत्ता क्षीरसागर, श्याम चव्हाण, किरण चोरमुले, मधुकर जाधवर, ज्ञानेश्वर वाघमारे, शिवाजी सांगवे, राहुल वाघमारे, सलीम भाई पठाण, महेश राऊत आदी पदाधिकारी, कार्यकर्ते, सहकारी उपस्थित होते.

* **तुळजापूर, दि.१८ मार्च -**

माहेरा अमीर शेख या पाच वर्षीय चिमुरडीने रमजान महिन्यातील पवित्र असा आपला पहिला रोजा अर्थात उपवास पुर्ण केला.

## मुर्शदपुरात महिलांचा स्नेह मेळावा साजरा



**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.१८ मार्च -**

गावात विविध क्षेत्रात काम करणाऱ्या महीलांनी एकत्र येऊन स्वखर्चाने या महीला मेळाव्याचे आयोजन केले होते. लोहारा तालुक्यातील मुर्शदपचर येथील विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या एकत्र आल्या. व महीलांचा सन्मान करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे आपापसात वर्गणी जमा करून गावातील स्त्री शक्तीचा सन्मान करण्याचा निर्णय घेतला.

कार्यक्रमासाठी जिजाऊ ब्रिगेड जिल्हा उपाध्यक्षा सत्यवती इंगळे, करदोरा (ता. उमरगा) येथील सरपंच सुनंदा रणखांब, होळीच्या सरपंच संयोजा बिराजदार, मुर्शदपुरच्या उपसरपंच संगीता माने, अंगणवाडी पर्यवेक्षिका संगीता क्षीरसागर सामाजिक कार्यकर्त्या नागिनी सुरवसे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी जिजाऊ ब्रिगेड जिल्हा उपाध्यक्षा सत्यवती इंगळे व सामाजिक कार्यकर्त्या नागिनी सुरवसे यांनी आपल्या मार्गदर्शनातून स्त्रीयांना आत्मसन्मान जागा केला. विविध सामाजिक प्रश्न, जिजाऊ, सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आधारित घटनांचे दाखले देत आदर्श समाज निर्मितीसाठी स्त्रियांचे योगदान या विषयावर मार्गदर्शन केले. यावेळी उपस्थीत महीलांचा सत्कार, सन्मान करण्यात आला. दरम्यान उपस्थित महीलांची संगीत खुर्ची स्पर्धा घेण्यात आली. यात वैष्णवी बलसुरे यांनी प्रथम, स्वाती पाटील यांनी द्वितीय तर प्रतीक्षा मोरे यांनी तृतीय क्रमांक पटकावला. त्याबद्दल त्यांना पारितोषिक देवून गौरविण्यात आले.

यावेळी मुर्शदपुर येथील महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन नितीन मोरे यांनी केले. तर मुर्शदपुरच्या पोलीस पाटील तथा महाराष्ट्र राज्य गाव कामगार पोलीस पाटील संघाच्या महीला आघाडी तालुकाध्यक्षा मनिषा चाकुरे यांनी आभार मानले.

## लोकअदालतीत प्रलंबित खटले तडजोडीने मिटवावेत

### प्रमुख जिल्हा न्यायाधीश यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ मार्च -**

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, दिल्ली आणि राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा विधी सेवा प्राधिकरणतर्फे राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. २२ मार्च रोजी शनिवारी सकाळी १० वा. जिल्हा न्यायालय आणि सर्व तालुका न्यायालयांमध्ये ही लोकअदालत भरविण्यात येणार आहे.

जिल्ह्यातील न्यायालयीन प्रलंबित तसेच वादपूर्व प्रकरणांमध्ये तडजोडीच्या माध्यमातून जलद न्यायनिर्णय व्हावा, या उद्देशाने लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये दिवाणी प्रकरणे, तडजोडपात्र फौजदारी खटले, मोटार अपघात प्रकरणे, कौटुंबिक वाद, धनादेशाशी संबंधित प्रकरणे तसेच जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग येथील तडजोडीस पात्र प्रकरणांचा सामावेश असेल. लोकअदालतीत समेटाद्वारे प्रकरणे निकाली काढण्यात येतात. न्यायालयीन लढ्याचा खर्च, वेळ व त्रास टाळण्यासाठी पक्षकारांनी आपल्या प्रकरणांचा निपटारा करून न्यायाचा जलद लाभ घ्यावा, संबंधित पक्षकारांनी आपल्या वकिलांशी संपर्क साधून लोकअदालतीत सामोपचाराने तडजोड करण्यासाठी पुढे यावे आणि या संधीचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन प्रमुख जिल्हा न्यायाधीश एस.सी. खटी आणि वरिष्ठ न्यायाधीशे सचिव वसंत यादव यांनी केले आहे.

## बावची विधालयात शाळा स्तरावरील विज्ञान प्रदर्शनातील विजेत्यांना बक्षीस वितरण



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१८ मार्च -**

बावची विद्यालय, परंडा येथे २८ फेब्रुवारी रोजी विद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करण्यात आला होता. या निमित्ताने विद्यालयात विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.

या विज्ञान प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी नाविन्यपूर्ण आणि सर्जनशील वैज्ञानिक प्रयोग सादर केले. विविध प्रयोगांच्या कल्पकतेच्या आधारे विजेत्यांची निवड करण्यात आली. प्रत्येक गटातून प्रथम आणि द्वितीय क्रमांक विजेते जाहीर करण्यात आले. विजेत्या विद्यार्थ्यांना आज बक्षीस वितरण मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले. पाचवी वर्गातून प्रथम क्रमांक पाटील शालवी हिने वॉटर सायकल हा प्रयोग सादर करून पटकावला. तर द्वितीय क्रमांक वळवी शौर्य याने कार पार्किंग या प्रयोगासाठी मिळवला.

सहावी वर्गात प्रथम क्रमांक संभव काशीद आणि संभव पवार यांनी रॉंग वे या प्रयोगासाठी तर द्वितीय क्रमांक शंभवी गोडगे आणि जिया पठाण यांनी चंद्रयान-३ या प्रयोगासाठी मिळवला. सातवी वर्गातून जाधव दक्ष याने स्मार्ट इरिगेशन सिस्टीम या प्रयोगासाठी प्रथम क्रमांक मिळवला. तर देवकर संस्कृती हिने होलोग्राम या प्रयोगासाठी द्वितीय क्रमांक मिळवला. आठवी वर्गात प्रथम क्रमांक शेळवणे श्रावणी, शिंदे तनवी, आरेकर अनुष्का, लटके कार्तिकी आणि पठाण आलिया यांनी रेन वॉटर हार्वेस्टिंग या प्रयोगासाठी मिळवला. तर द्वितीय क्रमांक मी स्किन पृथ्वीराज आणि पवार सोहम यांनी इलेक्ट्रिक जनरेटर या प्रयोगासाठी पटकावला. नववी वर्गातून प्रथम क्रमांक पल्ला अली आणि मुजावर अकीब यांनी हायड्रॉलिक ब्रिज या प्रयोगासाठी मिळवला.

तर द्वितीय क्रमांक कांबळे यशराज आणि बनसोडे विराज यांनी पुरिफिकेशन प्लांट्स अँड जीएम क्रॉप्स या प्रयोगासाठी मिळवला. संस्थापक अध्यक्ष बिभिषण रोडगे व मुख्याध्यापक नारायण खैरे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना त्यांना पुढील वैज्ञानिक उपक्रमांसाठी प्रोत्साहन दिले.

भविष्यात असे उपक्रम घेतल्यास विद्यार्थ्यांच्या प्रयोगशीलतेला चालना मिळेल आणि त्यांच्यातील सर्जनशीलता वाढेल, असे मत शिक्षकांनी व्यक्त केले.

राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या निमित्ताने आयोजित केलेले हे विज्ञान प्रदर्शन विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरले असून भविष्यात अशा कार्यक्रमांच्या माध्यमातून विज्ञानाची आवड अधिक बळकट होईल, असा विश्वास आहे.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## 'दयानंद'च्या विद्यार्थ्यांनी साधला आजी-आजोबांशी संवाद

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १८ मार्च -**
आधुनिक काळात कुटुंब व्यवस्था ढासळत आहे. अशा स्थितीत लोकसंख्येच्या दृष्टीने एक मोठा वर्ग म्हणजे ज्येष्ठ नागरिक आहेत. त्यांच्याकडे मात्र सध्या प्रचंड दुर्लक्ष होताना दिसत आहे. आई-वडिलांची कावड खांद्यावर घेऊन जाणाऱ्या श्रावण बाळाच्या या भूमीमध्ये वृद्धाश्रमाची संख्या वाढते आहे. ही एक मोठी समस्या आहे. या समस्याची जाणीव व्हावी, ज्येष्ठ आजी आजोबांशी संवाद साधावा यासाठी दयानंद कला महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मातोश्री वृद्धाश्रमाला भेट दिली.

मातोश्री वृद्धाश्रमातील आजी आजोबांशी मुलांनी मुक्त संवाद साधला. त्यांचे दुःख, त्यांच्या व्यथा, त्यांच्या अडचणी समजून घेताना कोवळ्या मनाच्या विद्यार्थ्यांच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले. पोरांनो आई वडिलांना सांभाळा व मुलींनो सासू-सासऱ्यां



चांगला सांभाळ करा हा कानमंत्र त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. ज्येष्ठांना नक्की सांभाळू असे अभिवचन त्यांना विद्यार्थ्यांनी दिले.

इयत्ता अकरावीच्या विद्यार्थ्यांनी मातोश्री वृद्धाश्रमातील आजी आजोबांना फळे देऊन आशीर्वाद घेतला. त्याबरोबरच विद्यार्थ्यांनी वृद्धाश्रमाच्या परिसराची स्वच्छता केली. यावेळी उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे, पर्यवेक्षक डॉ. प्रशांत दीक्षित, डॉ. संदिपान जगदाळे उपस्थित होते. यासाठी अधिराज जगदाळे, योगेश टिकम, ऋतिक मस्के, रेणुका जोशी, पायल गिरी, स्वाती बचाटे, दिव्यांजली गायकवाड, प्रणिता शेळके यांनी परिश्रम घेतले.




https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

सोलापूर तरुण भारत


### संक्षिप्त वृत्त...

## 'महात्मा बसवेश्वर'मध्ये एनसीसीबी सर्टिफिकेट परीक्षा उत्साहात

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १८ मार्च -**
श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात ५३ महाराष्ट्र बटालियन, लातूर संलग्न असलेल्या सर्व महाविद्यालयातील एनसीसी कॅडेटची बी सर्टिफिकेट परीक्षा बहिस्थ परीक्षक कर्नल राजेश आणि कर्नल वाय.बी.सिंग यांच्या मार्गदर्शनाखाली दि. १५ व १६ मार्च २०२५ रोजी महाविद्यालयाच्या खुल्या मैदानावर प्रात्यक्षिक परीक्षा आणि विज्ञान इमारतीमध्ये लेखी परीक्षा संपन्न झाली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर डॉ. संजय गवई, सुभेदार मेजर शंभू सेन, सुभेदार नरेंद्र सिंह, सुभेदार शेख, सुभेदार संजय, सुभेदार उत्तम पाटील, नायक सुभेदार बाजीराव पाटील, इतर पीआय स्टार, केअरटेकर डॉ. सुजित हंडीबाग, ए एन ओ व सी टी ओ यांची उपस्थिती होती.

## शरद झरे यांना महाराष्ट्र लोकविकास मंचचा जीवनगौरव पुरस्कार जाहीर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १८ मार्च -**
महाराष्ट्र लोकविकास मंचतर्फे दरवर्षी सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना पुरस्कार देऊन सन्मानित केले जाते. यावर्षीच्या पुरस्कारांची घोषणा नुकतीच मंचच्या पदाधिकाऱ्यांनी केली असून महाराष्ट्रातील नामांकित समाजसेवकांसोबत लातूर जिल्ह्यातील माणूस प्रतिष्ठान संचलित माझं घर प्रकल्पाचे प्रमुख शरद केशवराव झरे यांचा समावेश आहे.
महाराष्ट्र लोकविकास मंचतर्फे दिला जाणारा यंदाचा जीवन गौरव पुरस्कार शरद झरे यांना जाहीर झाला आहे. हा पुरस्कार वितरण सोहळा कळंब येथे २३ मार्च रोजी प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडणार आहे. शरद झरे यांनी पर्यावरण, वृक्षारोपण चळवळ तसेच शिक्षणापासून वंचित मुलांसाठी भरीव असे योगदान दिले आहे. लातूर जिल्ह्यात ऑक्सिजन ग्रुपच्या माध्यमातून पहिली वृक्षारोपण चळवळ राबवून जिल्ह्यात पाच लक्ष वृक्षांची लागवड त्यांनी केली आहे. सध्या माझं घर प्रकल्पाच्या माध्यमातून समाजातील शिक्षणापासून वंचित मुलामुलींचा सांभाळ ते करत आहेत. महात्मा गांधीच्या नई तालीम या संकल्पनेवर आधारित असणाऱ्या प्रकल्पात मुलांना भविष्यात स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी शरद झरे स्वावलंबनाचे धडे शिकवत असतात. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन महाराष्ट्र लोकविकास मंचच्या वतीने यावर्षीचा जीवनगौरव पुरस्कार त्यांना जाहीर झाला आहे. पुरस्कार जाहीर झाल्याचे पत्र नुकतेच त्यांना प्राप्त झाले आहे.

## सिकंदरपूर ग्रामपंचायतीला पाणी गुणवत्ता पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १८ मार्च -**
संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानचा (२०२२, २३) विभागीय स्तरावरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पाणी गुणवत्ता पुरस्काराचा मान पुन्हा सिकंदरपूर ग्रामपंचायतीस मिळाला. या पुरस्काराने स्मार्ट व्हिलेज सिकंदरपूरच्या सन्मानात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला.

राज्य शासनाच्या ग्रामविकास, पंचायतराज आणि छत्रपती संभाजीनगरातील विभागीय आयुक्त कार्यालयाच्या वतीने मराठवाड्यातल्या आठ जिल्ह्यांतून प्रथम, द्वितीय, तृतीय आलेल्या गावांची तपासणी करून संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धा २०२२, २३ मध्ये झाली. या स्पर्धेचा निकाल नुकताच जाहीर झाला. त्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर पाणी गुणवत्ता विशेष पुरस्कार सिकंदरपूर ग्रामपंचायतीस जाहीर होऊन त्याचे वितरण विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांच्या हस्ते छत्रपती संभाजीनगरात झाले. याप्रसंगी महावितरणचे व्यवस्थापकीय संचालक राहुल गुप्ता, अपर आयुक्त के आर. परदेशी, उपायुक्त सुरेश बेदमुथा, साधना जगताप यांची प्रमुख उपस्थिती होती. रोख ७५ हजार रूपये, प्रमाणपत्र, असे पुरस्काराचे स्वरूप होते. हा पुरस्कार सिकंदरपूरच्या उपक्रमशील सरपंच रेश्मा माधवराव गंभीरे यांना सन्मानाने दिला. यावेळी ग्रामपंचायत अधिकारी के बी. कलबुने, यशदाचे प्रवीण प्रशिक्षक माधवराव गंभीरे, ग्रामपंचायत कर्मचारी गहिनीनाथ बोयने उपस्थित होते. ग्राम संसद, अंगणवाडी, समशानभूमी आयएसआय करून २०२२, २३ मध्ये ग्राम संसद सिकंदरपूरने वेळोवेळी प्रयोगशाळेच्या पाणी तपासणीत चंदेरी कार्ड व ग्रीन कार्ड मिळविले.

## मोहोळचा रोहन पवार ठरला 'सिध्देश्वर केसरी'चा मानकरी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १८ मार्च -**
संपूर्ण मराठवाड्याचे लक्ष लागून असलेल्या लातूरचे ग्रामदैवत श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर देवस्थान यात्रेतील कुस्ती स्पर्धेत मोहोळ येथील मल्ल रोहन पवार याने मानाची 'सिध्देश्वर केसरी'ची चांदीची गदा पटकावली. दिंडेगाव येथील फिरोज शेख हा उपविजेता ठरला.

श्री सिध्देश्वर यात्रेतील कुस्ती स्पर्धा हे सर्वांसाठी आकर्षण असते. रविवारी (दि.१६) सकाळी ११ वाजता सुरू झालेल्या या स्पर्धेतील शेवटची कुस्ती मध्यरात्रीनंतर झाली. राज्यभरातून आलेल्या सुमारे ५०० मल्लांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला. विशेष म्हणजे यंदा आठ महिला मल्लांनीही स्पर्धेत भाग घेतला. अटीतटीच्या झालेल्या या स्पर्धेत सहभागी मल्लांनी प्रेक्षकांच्या डोळ्यांचे पारणे फेडले. मानाच्या 'सिध्देश्वर केसरी'साठी रोहन पवार व फिरोज शेख यांच्यात अटीतटीची लढत झाली. यात रोहन पवार यांनी फिरोज शेख यास चितपट केले.

विजेता रोहन पवार यास देवस्थानचे प्रशासक सचिन जांबुतकर, विश्वस्त अशोक भोसले, सुरेश गोजमगुंडे, बाबासाहेब कोरे, रमेशसिंह बिसेन, व्यंकटेश हालिंगे, विशाल झांबरे,ओम गोपे यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत चांदीची गदा प्रदान करण्यात आली. मानाच्या गदेसह इतरही अनेक पारितोषिके यावेळी देण्यात आली. गतवर्षी पावसामुळे काही स्पर्धा झाल्या नव्हत्या. तसेच पारितोषिकांचे वितरण रखडले होते. यावर्षी त्या स्पर्धा घेत पारितोषिके देण्यात आली. महापालिकेकडून ५१ तोळे चांदीचे कडे पारितोषिक म्हणून दिले जाते. वायगाव येथील गणेश साळुंके व पानचिंचोली येथील भैरवनाथ जोगी यांनी हे कडे जिंकले.

रायगड ग्रुपचे अमर कोकाटे यांच्याकडून दिले जाणारे ५१ तोळे चांदीचे कडे आष्टा येथील विष्णू तातपुरे व हासेगाव वाडी येथील तुषार लवटे यांना प्रदान करण्यात आले. ओम गोपे, जयप्रकाश गोपे यांच्या वतीने देण्यात येणारे २१ तोळे



चांदीचे कडे शिवप्रसाद खरोसेकर तर केतन हलवाई यांच्यातर्फे दिले जाणारे २१ तोळे चांदीचे कडे आष्टा येथील महेश तातपुरे यांनी जिंकले. विजेत्या मल्लांची मंदिरापर्यंत मिरवणूक काढण्यात आली.

## 'माझं घर' प्रकल्पातील मुलांची मोफत आरोग्य तपासणी




**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १८ मार्च -**
शिक्षणापासून वंचित असलेल्या मुलांसाठी उभारण्यात आलेल्या औसा तालुक्यातील बुधोडा-वांगजेवाडी येथील माझं घर प्रकल्पातील ६१ विद्यार्थ्यांची विठ्ठल मल्टिस्पेशालिस्ट आयुर्वेद क्लिनिक व पंचकर्म सेंटर लातूरच्या वतीने मोफत आरोग्य तपासणी करून त्यांच्यावर औषधोपचार करण्यात आले.

यावेळी प्रकल्पातील मुलांची संपूर्ण आयुर्वेदिक पद्धतीने तपासणी करून त्यांच्या निकोप वाढीसाठी तसेच भविष्यात या मुलांचे आरोग्य निरोगी तसेच सुदृढ राहण्यासाठी आयुवेर्दिक पध्दतीने उपचार करण्यात आले.

डॉ. जोतिराम पिसाळ यांच्या हस्ते या शिबीराचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी डॉ. पिसाळ यांनी मुलांना आयुर्वेदिक उपचार पध्दती आणि त्याचे फायदे या विषयावर अत्यंत सोप्या शब्दात मार्गदर्शन केले. या वेळी माणूस प्रतिष्ठान आणि माझं घर चे संस्थापक अध्यक्ष शरद झरे तसेच प्रकल्प संचालिका सौ. संगीता झरे उपस्थित होत्या.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विठ्ठल आयुर्वेद क्लिनिक चे डॉ. गणेश चौव्हाण डॉ. मिरा तळेकर, डॉ. निळकंठ सोनटक्के यांनी यांनी परिश्रम घेतले.



## छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त ठाकरे सेनेचे विविध कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १८ मार्च -**
शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौक लातूर येथे पक्षाच्या वतीने अभिषेक व पुजन जिल्हाप्रमुख संतोष सोमवंशी व सहसपर्कप्रमुख नामदेव चाळक यांच्या हस्ते संपन्न झाले यानंतर मोफत खिचडी वाटप करण्यात आली.

जयंती निमित्त पक्षाच्या वतीने छावा चित्रपट मोफत दाखवण्यात आला या चित्रपटाचा शुभारंभ जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी जिल्हाप्रमुख संतोष सोमवंशी, सहसंपर्कप्रमुख नामदेव चाळक, महिला जिल्हा संघटक सौ जयश्रीताई उटगे, सुनीता चाळक, उपजिल्हाप्रमुख बालाजी जाधव, महानगर प्रमुख सुनील बसपुरे, विष्णू साठे, रमेश माळी, राहूल रोडे, अविनाश रेशमे, शंकर रांजणकर, आबासाहेब पवार, शिवाजी चव्हाण, मुकेश सुडे, संजय उजळबे, किशोर जाधव, शेखर चव्हाण, बसवराज मंगरूळे, अण्णासाहेब मिरगाळे आदी सह शिवसैनिक मोठय़ा संख्येने उपस्थित होते.

## शॉर्टसर्किटने हॉटेलला भीषण आग; ५० लाखांचे नुकसान

### नागरिकांच्या दक्षतेमुळे टळली जिवीतहानी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १८ मार्च -**
येथील खोरी गल्ली परिसरात असलेल्या हॉटेल गरम मसाला या हॉटेलला सोमवारी (दि.१७) सकाळी साडेआठ वाजेच्या सुमारास शॉर्टसर्किटमुळे भीषण आग लागली. बघता बघता आगीने तीन मजल्यांची इमारत व्यापून टाकली. दरम्यान, शेजारचे नागरिक व अग्निशामक दलाच्या जवानांनी तत्काळ याच हॉटेलच्या शेवटच्या मजल्यावर राहणाऱ्या कुटुंबीयातील पाच ते सहा जणांचे प्राण वाचविले आहेत. या आगीत सुमारे ५० ते ६० लाखांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात आला आहे.

शहरातील खोरी गल्ली परिसरात गफार घावटी यांचे गरम मसाला नावाचे हॉटेल आहे. सोमवारी सकाळी साडेआठ वाजेच्या सुमारास हॉटेलमधून धूर निघत असल्याचे शेजाऱ्यांच्या लक्षात आले.

त्यांनी तत्काळ अग्निशामक दलाशी संपर्क साधून अग्निशामक दलाला पाचारण केले. घावटी कुटुंबीय याच इमारतीत शेवटच्या मजल्यावर राहत होते. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन शेजारचे नागरिक व अग्निशामक दलाने शिडी आणून इमारतीच्या पाठीमागून व समोरून अगोदर परिवारातील महिला, मुले व पुरुष यांना बाहेर काढले.

आग या हॉटेलच्या तळघरात लागली होती. अग्निशामक दलाच्या जवानांनी पहिल्या मजल्यावरील खिडक्यांच्या काचा फोडल्याने धूर बाहेर जाऊ शकला. या परिसरात राहणारे दक्ष नागरिक व अग्निशामक दलाच्या जवानांनी वेळीच दक्षता घेऊन घावटी परिवारातील सदस्यांना इमारतीच्या बाहेर सुरक्षित काढले. नागरिकांच्या दक्षतेमुळे मोठी जिवीतहानी टळली आहे. या आगीमध्ये हॉटेलमधील फर्निचर व अन्य साहित्य जळून खाक झाले. या घटनेत हॉटेलचे सुमारे ५० ते ६० लाख रुपयांचे नुकसान झाले असल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात आला आहे.



## दयानंद महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १८ मार्च -**
येथील दयानंद वाणिज्य महाविद्यालयात येत्या २० आणि २१ मार्च रोजी 'उत्कर्ष २०२४-२५' या वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. या वार्षिक स्नेहसंमेलन निमित्ताने विविध स्पर्धा आणि उपक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती प्रभारी प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर आणि विद्यार्थी कल्याण मंडळाचे प्रभारी उपप्राचार्य डॉ. गणेश लहाने यांनी दिली.

२० मार्च रोजी सकाळी १० वाजता छत्रपती संभाजीनगर येथील सुप्रसिद्ध कवी, कीर्तनकार अविनाश भारती यांच्या हस्ते या स्नेहसंमेलनाचे उद्घाटन होणार आहे. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार होणार आहे.

## प्रशिक्षणार्थी तरुण-तरुणींचा रोजगार कायम करावा : देशमुख

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १८ मार्च -**
मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत प्रशिक्षण घेतलेल्या राज्यातील तरुण-तरुणींना त्याच ठिकाणी कायम सेवा देण्याचे आश्वासन मागील सरकारने दिले होते. मात्र, आता त्यांना वाऱ्यावर सोडण्याचे धोरण शासन अवलंबत आहे. आम्हाला सेवेत कायम करावे या मागणीसाठी सदर युवक कुटुंबासह आझाद मैदानावर बेमुदत उपोषणाला बसले आहेत. अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान सोमवारी विधानसभेत सदरील विषय उपस्थित करून या बाबीकडे शासनाचे लक्ष वेधत या तरुण मंडळींना न्याय देण्याची मागणी माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांनी केली.



महाराष्ट्र विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात सोमवारी (दि. १७) आमदार अमित देशमुख यांनी मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण कौशल्य अंतर्गत प्रशिक्षण पूर्ण केलेल्या राज्यातील तरुण-तरुणींचा रोजगार कालावधी ठराविक न ठेवता कायम करण्याची मागणी पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशनद्वारे सभागृहात मांडली. विधानसभा निवडणुकीपूर्वी महायुती सरकारने राज्यातील १ लाख २० हजार सुशिक्षित बेरोजगार तरुण-तरुणींची मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेत निवड केली. ऐन निवडणूक काळात शासनाच्या विविध योजनांचा प्रचार आणि प्रसार त्यांच्याकडून करून घेतला.

निवडणुकीचा कालावधी संपल्यानंतर सत्ता मिळताच त्यांना कमी करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. युवा मंडळीने आवाज उठल्यानंतर आता आणखीन ५ महिन्यांचा कालावधी त्यांना वाढवून दिला असला तरी निवडणुकीपूर्वी दिलेल्या आश्वासनाप्रमाणे आम्हाला कायम सेवेत घ्यावे, अशी या युवकांची मागणी आहे. शासनाने या युवकांना न्याय द्यावा, अशी मागणी आमदार देशमुख यांनी केली. या विषयाकडे शासनाने गांभीर्यपूर्वक लक्ष द्यावे, अशी सूचना विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी केली आहे.

## शिवसेनेतर्फे वाचनालयास ग्रंथ भेट

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १८ मार्च -**
हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांच्या तिथीनुसार ३९५ व्या जयंतीदिनाचे औचित्य साधून शिवसेना लातूर शहर शाखेतर्फे सोमवारी (दि. १७) छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारुढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कृतीतून शिवजयंती साजरी करण्याचा पायंडा पुढे सुरू ठेवताना लातूरच्या शिवछत्रपती ग्रंथालयास छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावरील ऐतिहासिक ग्रंथ भेट देण्यात आले.

हा उपक्रम शहरप्रमुख दिनेश बोरा, ॲड. परवेज पठाण, शहर संघटक संदीप जाधव, चंद्रकांत शिंदे यांनी राबविला. यावेळी संपर्क प्रमुख ॲड. बळवंत जाधव, जिल्हाप्रमुख सचिन दाणे, महिला जिल्हाप्रमुख कल्पना बावगे,



उपजिल्हाप्रमुख सतीश देशमुख, युवा सेना जिल्हाप्रमुख कुलदीप सूर्यवंशी, ओबीसी सेलचे जिल्हा संघटक विशाल देवकते यांची प्रमुख उपस्थिती होती.

शिवछत्रपती ग्रंथालयास ग्रंथ भेट देण्यात आल्याबद्दल ग्रंथपाल डॉ. अमित म्हेत्रे यांनी या उपक्रमाचे स्वागत करून प्रशस्तीपत्र दिले. शिवजयंती साजरी करताना अवास्तव खर्च न करता भावी पिढीला इतिहासाचे वास्तव ज्ञान मिळावे या उद्देशाने प्रतिवर्षी हा उपक्रम प्राधान्याने राबविला जातो. छत्रपतींच्या जीवनावरील ग्रंथ ग्रंथालयात स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या हस्ते भेट देण्यात आले. यानिमित्त शिवसेना संपर्क कार्यालयात शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी विजयकुमार कांबळे, दीपक बडगिरे, विष्णू साबदे, सदाशिव गव्हाणे, गोविंद जाधव, हरिभाऊ डोपे, संतोष पाटील, श्याम साबळे, साहेब गायकवाड, कृष्णा सरवदे, वर्षा धडे, वंदना गोरे, शिवनंदा दानाई, संगीता शेटे, सुमन राऊत आदी उपस्थित होते.

## मालमत्ता करदात्यांसाठी व्याजात १०० टक्के सूट

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १८ मार्च -**
कर संकलन व कर आकारणी विभाग लातूर शहर महानगरपालिका यांच्या वतीने वर्षाच्या शेवटच्या महिन्यात अधिकाधिक कर संकलन होण्याच्या दृष्टीने मालमत्ताधारकांसाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्यानुसार वेळोवेळी विविध प्रकारचे सुटची योजना लागू करण्यात आली होती.

वर्षाच्या सुरुवातीस व शेवटच्या महिन्यात चालू आर्थिक वर्षातील मालमत्ताधारक यांना प्रोत्साहन देण्यासाठी योजना लागू करण्यात आले आहेत.सध्या चालू वर्षातील मालमत्ताधारकसाठी महानगरपालिकेमार्फत दिं १८ मार्च २०२५ ते २४ मार्च २०२५ पर्यंत फक्त चालू मागणीवर (सन २०२४-२५) आकरण्यात आलेल्या व्याज/शास्तीमध्ये १०० टक्के सूट देण्यात येत आहे. तसेच सदरील योजना थकबाकीदार मालमत्ता धारक यांना लागू राहणार नाही . तसेच आर्थिक वर्ष संपत आल्याने या आर्थिक वर्षातील मालमत्ताधारक कराचा भरणा करणार नाही अशा मालमत्ताधारकांची सुद्धा मालमत्ता जप्त करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे .तसेच यापूर्वी जप्त केलेल्या मालमत्ताची लिलाव प्रक्रीया राबवून , थकबाकीधारकांची नावे वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करून कर वसूल करण्यात येणार आहे. चालू वर्षातील मालमत्ताधारकांनी वरील देण्यात आलेल्या मुदतीमध्ये आपल्याकडील देय असलेल्या कराचा भरणा एक रक्कमी करावा. व जप्तीसारखी कटू कार्यवाही टाळावी असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक बाबासाहेब मनोहरे यांनी केले आहे.